
४१ वा वर्धापन दिन

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह
४१ वा वर्धापन दिन

सोलापूर | रविवार, ३ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६५ | पाने १२+१२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

### विचारपुष्प



भगवा ध्वज हा शतकानुशतके भारतीय संस्कृती आणि परंपरेचे श्रद्धेचे प्रतीक आहे. जेव्हा डॉ. हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली तेव्हा त्यांनी हा ध्वज सर्व राष्ट्रीय आदर्शांचे सर्वोच्च प्रतीक म्हणून स्वयंसेवकांसमोर ठेवला आणि नंतर व्यास पौर्णिमेच्या दिवशी गुरू म्हणून भगव्या ध्वजाचे पूजन करण्याची परंपरा सुरू केली.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# देशहित सर्वोपरी, स्वदेशीला प्राधान्य

**ट्रम्प यांना मोदींचे प्रत्युत्तर ● भारतावर वार करणारा वाचणार नाही**



दिव्यांग युवकाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिलचेयरचे वितरण करण्यात आले

### ड्रोन, क्षेपणास्त्रे स्वावलंबी भारताची ताकद

ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताच्या स्वदेशी शस्त्रांची शक्ती जगाने पाहिली. ड्रोन, क्षेपणास्त्रे, हवाई संरक्षण प्रणाली यांनी स्वावलंबी भारताची ताकद सिद्ध केली. पाकिस्तानमध्ये इतकी भीती आहे की ब्रह्मोसचा आवाज ऐकू आला तरी पाकिस्तान खड्कन जागा होतो, असे पंतप्रधान म्हणाले.

**वाराणसी, २ ऑगस्ट**

जागतिक अस्थिरतेच्या वातावरणात सर्व देश स्वतःच्या हितांवर लक्ष केंद्रित करत आहेत. भारत लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणार आहे. त्यामुळेच आपल्याला आर्थिक हितांबद्दल जागरूक राहावे लागेल. आमच्या सरकारसाठी देशहित सर्वोपरी असून स्वदेशी वस्तूंना प्राधान्य आमची प्राथमिकता आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. पंतप्रधानांचे हे उद्गार म्हणजे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दिलेले जोरदार प्रत्युत्तर आहे.

पंतप्रधान मोदी शनिवारी वाराणसीच्या दौऱ्यावर होते. त्यांनी २१८३.४५ कोटी रुपयांच्या एकूण ५२ प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केले आणि किसान सन्मान निधीचा २० वा हप्ता लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ऑनलाईन पद्धतीने जमा केला. मेक इन इंडिया उत्पादनांना प्रोत्साहन देण्याचा संकल्प करताना मोदी म्हणाले, आमचे सरकार देशाच्या हितासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करत आहे. मतभेद विसरून आपण केवळ भारतीयांनी बनवलेल्या वस्तूच खरेदी करू, अशी प्रतिज्ञा घ्यावी. कुणाच्याही दबावापुढे भारत झुकला नाही आणि यापुढे झुकणार नाही, राष्ट्राच्या हितासाठी आवश्यक असलेला निर्णय घेतला जाईल. माझ्या मुलींच्या सिंदूरचा बदला घेण्याचे दिलेले वचन केवळ महादेवाच्या आशीर्वादाने साध्य झाले. ऑपरेशन सिंदूरचे यश मी त्यांच्या चरणी समर्पित करतो. जर पाकिस्तानने पुन्हा कोणतेही पाप केले तर आमची क्षेपणास्त्रे दहशतवाद्यांचा नाश करण्यासाठी सज्ज आहेत, असा इशारा त्यांनी यावेळी दिला. (वृत्तसंस्था)

### मतपेढीसाठी विरोधकांचे तुष्टीकरणाचे राजकारण

काँग्रेसने ऑपरेशन सिंदूरला तमाशा म्हटले आहे. आपल्या सैन्याचे शौर्य आणि आपल्या बहिणींच्या सिंदूरचा बदला याला तमाशा म्हणण्याचे धाडस करणे निर्लज्जतेचे लक्षण आहे. मतपेढीसाठी विरोधक तुष्टीकरणाचे राजकारण करत आहे. समाजवादी पक्षाच्या राजवटीत उत्तर प्रदेशात गुन्हेगार निर्भय होते. आता गुन्हेगार घाबरत असल्याचे मोदी म्हणाले.

### महत्त्वाचे

## 'हिंदुत्ववादी' किंवा 'सनातन' दहशतवाद म्हणा

**मुंबई :** भगव्या दहशतवादाऐवजी सनातन किंवा हिंदुत्ववादी दहशतवाद म्हणा, असे वादग्रस्त विधान काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. त्यांच्या या विधानाचे देशाच्या राजकारणात तीव्र पडसाद उमटत आहेत. विशेषतः मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेने मोर्चा काढून आपला रोष व्यक्त केला आहे.



पृथ्वीराज चव्हाण यांनी शुक्रवारी वृत्तसंस्थेशी संवाद साधला होता. त्यात त्यांनी मालेगाव बॉम्बस्फोटप्रकरणी विशेष एनआयए कोर्टाने दिलेल्या निर्णयावर भाष्य करताना कथित भगव्या दहशतवादावर भाष्य केले होते. माझी व भाजप व काँग्रेसच्या लोकांना नम्र विनंती आहे की, कृपया भगवा दहशतवाद हा शब्द वापरू नका. कारण, भगवा रंग हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या लढ्याचा हा ध्वज आहे. भगवा रंग हा संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर व वारकरी पंथाचा रंग आहे, तो महाराष्ट्राला प्रिय असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.

## यवत दंगल प्रकरणी ५०० जणांविरुद्ध गुन्हे दाखल

**पुणे :** फेसबुक पोस्टवर आक्षेपार्ह पोस्ट केल्याने पुणे जिल्ह्यामधील दौंड तालुक्यातील यवत गावात उसळलेल्या दंगल प्रकरणी पोलिसांनी ५०० जणांविरोधात गुन्हा दाखल केला आणि १७ जणांना अटक केली, यात आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या तरुणाचा समावेश आहे. गावातील परिस्थिती अजूनही तणावाची असल्याने संचारबंदी कायम आहे. पुण्याचे पोलिस अधीक्षक संदीप सिंग गिल यांनी शनिवारी सांगितले की, प्राथमिक तपासात कोणताही पूर्वनियोजित कट असल्याचे दिसून आले नाही. गावातील परिस्थिती आता नियंत्रणात आहे आणि मोठ्या संख्येने पोलिस दल आणि राज्य राखीव पोलिस तैनात करण्यात आले आहे.

# जनसुरक्षा अंतर्गत अटक करून दाखवाच

**मनसेप्रमुख राज ठाकरेंचे सरकारला आव्हान**

**पनवेल, २ ऑगस्ट**

राज्यातील एखाद्या प्रकल्पाला विरोध केला किंवा सरकारच्या विरोधात भूमिका मांडली तर जनसुरक्षा कायद्यांतर्गत अटक करणार असे बोलले जाते. हिंत असेल तर अटक करून दाखवावी, असे आव्हान मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी शनिवारी राज्य सरकारला दिले. पनवेल येथे झालेल्या शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन कार्यक्रमाला राज संबोधित करीत होते.



मंचावर शेतकरी कामगार पक्षासह उबाठाचे खासदार संजय राऊत उपस्थित होते. राज यांनी चौफेर टोलेबाजी करीत राज्य सरकारवर जोरदार टीका केली. हिंदी-मराठीच्या मुद्यावर बोलताना राज म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री हे शाळांध्ये मुलांना हिंदी शिकविल्या जावू शकते, असे बोलतात पण कामासाठी परराज्यांधून महाराष्ट्रात येणाऱ्यांनी कशाप्रकारे मराठी भाषा शिकावी यावर काहीच बोलत नाहीत. येथील भूमिपूत्र आणि मराठी माणूस यांच्याबाबत कुणीही विचार करीत नाही, हे रायगड जिल्ह्यातील उदाहरणांवरून दिसून येत आहे. शेतकऱ्यांकडून जमिनी घेतल्या जात आहेत. मराठी माणसाच्या थडग्यावर तुम्हाला उद्योग उभारायचे आहेत का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पुढील वर्षी नवी मुंबई विमानतळ सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. येथे शंभर टक्के मराठी कामगारांचीच भरती करावी, अशी मागणी राज यांनी केली.

### 'अर्बन नक्षलसारखे वागाल तर अटक करू'

जनसुरक्षा कायदा कायद्यांतर्गत अटक करून दाखवा असे आव्हान राज ठाकरे यांनी सरकारला दिले. यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कायदा हा सर्वांसाठी समान आहे, राज असो वा कुणीही अर्बन नक्षलसारखे वागाल, तर अटक केली जाईल. जे लोक कायद्याच्या विरोधात वागतात त्यांच्यासाठी हा कायदा आहे. आंदोलकांच्या विरोधात हा कायदा नाही. सरकारच्या विरोधात बोलायची पूर्ण मुभा आहे.



# माजी खासदार रेवण्णाला जन्मठेपेची शिक्षा

**बलात्कार प्रकरणी विशेष न्यायालयाचा निर्णय**

**११ लाखांचा दंडही ठोठावला**

**बंगळुरू, २ ऑगस्ट**

कर्नाटकच्या बंगळुरू येथील जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी खासदार आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्वल रेवण्णा यांना ४७ वर्षीय मोलकरणीवर बलात्कार प्रकरणात शनिवारी विशेष न्यायाधीश संतोष भट यांनी जन्मठेपेची शिक्षा आणि ११ लाखांचा दंड ठोठावला.

यातील सात लाख रूपये पीडित महिलेला नुकसान भरपाई म्हणून दिले जातील. फार्म हाऊसमध्ये काम करणाऱ्या महिलेवरील बलात्कारप्रकरणी रेवण्णावर विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले होते. गेल्या वर्षभरापासून याप्रकरणी न्यायालयीन खटला सुरू होता. अखेर बंगळुरू येथील विशेष न्यायालयाने त्यांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. विशेष सरकारी वकील अशोक नायक यांनी सांगितले की, त्यांनी २६ साक्षीदारांची चौकशी केली. मुख्य पीडितेला न्यायालयाने अत्यंत विश्वासार्ह मानले, हे तिच्या लढ्याचे यश आहे. आम्ही केवळ मौखिक साक्षींवर नव्हे, तर डिजिटल, तांत्रिक, डीएनए आणि फॉरेन्सिक अहवालांवरही भर दिला. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा पुरावा घटनेच्या वेळी पीडितेने घातलेली साडी ठरली. तपासात त्या साडीवर शुक्राणूंचे (स्पर्मचे) डाग आढळून आले. जे फॉरेन्सिक तपासणीमध्ये रेवण्णाचे असल्याचे समोर आले. याशिवाय बलात्काराची चित्रफीत देखील कोर्टात सादर करण्यात आली.



### चित्रफीत प्रसारित करण्याची धमकी

रेवण्णा यांच्यावर पीडितेने २०२१ पासून अनेकवेळा बलात्कार केल्याचा आणि या घटनेबद्दल कोणालाही सांगितल्यास चित्रफीत प्रसारित करण्याची धमकी दिल्याचा आरोप केला. रेवण्णावर बलात्कार, धमकी देणे आणि अश्लील चित्रफीत प्रसारित करणे अशा कलमांखाली आरोप ठेवण्यात आले होते.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### एक आठवडा आधीच अमरनाथ यात्रा बंद

**श्रीनगर :** अमरनाथ यात्रा थांबवण्यात आली आहे. ही यात्रा ९ ऑगस्टपर्यंत होती, परंतु मुसळधार पावसाने रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे ३ ऑगस्ट रोजीच ती थांबवण्यात आली. पावसामुळे यात्रा मार्गांचे बरेच नुकसान झाले आहे. बालटाल आणि पहलगाम दोन्ही मार्गांवर दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. परिणामी यात्रा थांबवावी लागली आहे. मार्गांवर सतत मशीन आणि कर्मचारी तैनात असल्याने यात्रा पुन्हा सुरू करणे शक्य नाही, असे काश्मीरचे विभागीय आयुक्त विजय कुमार बिधुरी यांनी सांगितले. अमरनाथ यात्रा ३ जुलै रोजी सुरू झाली आणि ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी संपणार होती. यावर्षी आतापर्यंत ४.१० लाख भाविकांनी अमरनाथ गुहेला भेट दिली. मागील वर्षी ५.१० लाखांहून अधिक भाविक आले होते. अमरनाथ यात्रा ३ जुलै रोजी सुरू झाली. या वेळी सकाळी बाबा अमरनाथ यांची पहिली आरती करण्यात आली. यावेळी यात्रा केवळ १ महिना चालू शकली. यात्रेदरम्यान सुमारे ५० हजार सीआरपीएफ जवान तैनात करण्यात आले होते.

### अरुणाचल प्रदेशात भूकंपाचा धक्का

**नवी दिल्ली :** अरुणाचल प्रदेशात शनिवारी पहाटे ५ वाजून ३५ मिनिटांनी केई पन्योर भागात भूकंप झाला. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, याचा केंद्रबिंदू जमिनीपासून १० किलोमीटर खोलीवर नोंदवला गेला. पहाटेच्या वेळी आलेल्या या धक्क्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले, मात्र सुदैवाने कोणत्याही प्रकारचे जीवित किंवा वित्तहानी नाही. मागील काही दिवसांपासून अरुणाचल प्रदेशात सलग भूकंपाचे धक्के नोंदवले जात आहेत. याआधी २८ जुलै रोजी संध्याकाळी ६ वाजून ३६ मिनिटांनी तिरप जिल्ह्यात ३.५ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला होता. त्याचा केंद्रबिंदू जमिनीपासून ७ किलोमीटर खोलीवर होता. त्याचप्रमाणे २७ जुलै रोजी रात्री ११:४३ वाजता बिचोम जिल्ह्यात भूकंपाचे धक्के बसले होते. त्यावेळी भूकंपाची तीव्रता २.८ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली होती, आणि त्याचा केंद्रबिंदू केवळ ५ किलोमीटर खोलीवर होता.

### कलाकारांनी सांगितले मित्रांबाबतचे किस्से

**मुंबई :** लाईट्स, कॅमेरा, ॲक्शनमधून पडद्यावर रोमांचक कथानक पाहायला मिळते, पण कधी-कधी पडद्यामागील क्षणांचा सखोल प्रभाव पडतो. यंदा फ्रेण्डशीप डे निमित्त ॲण्ड टीव्ही कलाकारांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. हे कलाकार आहेत प्रियमवदा कांत, सपना सिकरवार आणि शुभांगी अत्रे. मालिका घरवाली पेडवालीमधील प्रियमवदा ऊर्फ लतिका म्हणाली, कृष्णा भारद्वाज यांच्यासोबत माझे खास नाते आहे. आठ वर्षांपूर्वी एका मालिकेत एकत्र काम करताना आमची पहिली भेट झाली. आमच्या मैत्रीला वेगळे बनवणारी गोष्ट म्हणजे आमच्यातील सखोल आध्यात्मिक संबंध. बाहेरून आम्ही दोघेही उत्साही आणि मजेदार आहोत, पण मनातून शांत आणि स्थिर आहोत. हप्पू की उलटन पलटनमधील सपना सिकरवार ऊर्फ बिमलेश म्हणाल्या, काही वर्षांपूर्वी शूटिंगदरम्यान मी गीतांजलीला भेटले. मला तिच्याबाबत आवडलेली बाब म्हणजे तिचा दयाळूपणा. एकदा मला वैयक्तिक आव्हानाचा सामना करावा लागला आणि मला आधार द्यायला ती सर्वकाही सोडून आली. मालिका भाबीजी घर पर है मधील शुभांगी अत्रे ऊर्फ अंगूरी भाबी म्हणाल्या, मी काही वर्षांपूर्वी एका कार्यक्रमात मेघाला भेटले आणि त्वरित तिच्यामधील उत्साहपूर्ण व प्रामाणिक स्वभाव जाणवला. आमच्यात दृढ मैत्री झाली. माझ्याकडे राहण्यासाठी घर नव्हते. घाबरत मी मेघाला कॉल केला. संकोच न करता ती म्हणाली तेथेच थांब, मी तुला न्यायला येते आणि तिने मला तिच्या घरी नेले.

### मंगळवारी हीरक महोत्सवी राज्य चित्रपट पुरस्काराचे वितरण

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचा हीरक महोत्सवी सोहळा येत्या मंगळवारी (दि.५) सायंकाळी ६.३० वाजता वरळीतील डोम, एसव्हीपी स्टेडियम येथे होणार आहे. पुरस्कारांमध्ये संगीत क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार २०२५ या पुरस्काराने गजलनवाज भीमराव पांचाळे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, २०२४ चा चित्रपती कै. व्ही. शांताराम जीवन गौरव पुरस्कार प्रसिध्द दिग्दर्शक, अभिनेते महेश मांजरेकर यांना तर चित्रपती कै. व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. याचबरोबर २०२४ चा स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना आणि स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल यांना दिला जाणार आहे. या प्रतिष्ठित पुरस्कारांबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार २०२५ या पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे.

# रशियाच्या सीमेवर अमेरिकेच्या आण्विक पाणबुड्या तैनात

## ट्रम्प यांची गंभीर परिणामांची धमकी, दोन महासत्तांमध्ये वाढला तणाव



**♦ वॉशिंग्टन, २ ऑगस्ट**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी रशियाच्या सीमेवर दोन आण्विक पाणबुड्या तैनात करण्याचे आदेश दिले आणि त्यांनी रशियाला गंभीर परिणामांची धमकी दिली. यावर रशियाने आमच्यादेखील आण्विक पाणबुड्या जशास तसे प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज असल्याचा इशारा ट्रम्प यांना दिल्याने जगातील दोन महासत्ता असलेल्या देशांत तणाव वाढला आहे.

ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, मी नौदलाला रशियाच्या सीमेवर दोन आण्विक पाणबुड्या तैनात करण्याचे आदेश दिले आणि लष्करालादेखील सज्ज राहण्याच्या सूचना केल्या आहे. त्यांनी या निर्णयासाठी रशियाचे माजी राष्ट्राध्यक्ष दिमित्री मेदवेदेव यांच्या प्रक्षोभक वक्तव्याला जबाबदार धरले आहे. मेदवेदेव यांच्या अत्यंत चिथावणीखोर विधानांमुळे, मी खबरदारी म्हणून योग्य भागात दोन अणु पाणबुड्या तैनातीचे आदेश दिले. (वृत्तसंस्था)

### निर्बंधाच्या धमकीनंतर मेदवेदव संतापले



रशियाने १० दिवसांत युक्रेन युद्ध संपवले नाही तर त्यांच्यावर कठोर आर्थिक निर्बंध आणि कर लादले जातील. यावर प्रत्युत्तर देताना मेदवेदेव म्हणाले की, प्रत्येक नवीन अंतिम मुदत युद्धाकडे एक पाऊल आहे. जर अमेरिकेने रशियाला अशा प्रकारे धमकी दिली तर त्याचे परिणाम भोगण्यास तयार असले पाहिजे. सोव्हिएत काळातील 'डेड हँड' प्रणाली आजही सक्रिय आहे. जर अमेरिकेला वाटत असेल की ते एकतर्फी आदेश देऊ शकते, तर ते चुकीचे आहे.

### तुमच्या पाणबुड्या आमच्या रडारवर : वोडोलात्स्की

रशियन खासदार आणि ड्यूमाचे वरिष्ठ सदस्य व्हिक्टर वोडोलात्स्की यांनी ट्रम्प यांना इशारा दिली की, पॅसिफिक महासागरांमध्ये रशियन अणुऊर्जा पाणबुड्यांची संख्या अमेरिकेपेक्षा खूप जास्त आहे आणि अमेरिकन पाणबुड्या आधीच रशियन नियंत्रण कक्षाच्या रडारवर आहेत. अमेरिकेने रशियावर कारवाईची चूक केल्यास त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल.

### डेड हँड म्हणजे काय?

सोव्हिएत युनियनने १९८० च्या दशकात डेड हँड नावाची एक स्वयंचलित आण्विक प्रतिकार प्रणाली तयार केली. तिला पेरिमीटर प्रणाली असेही म्हणतात.जर रशियाचे संपूर्ण नेतृत्व मारले गेले तर ही प्रणाली आपोआप अण्वस्त्रे डागू शकते. ही प्रणाली अजूनही स्टँडबाय मोडमध्ये असल्याचे मानले जाते. म्हणजेच, जर अमेरिकेने रशियावर हल्ला केला आणि रशियन नेते मारले गेले, तरीही ही प्रणाली अमेरिकेवर हल्ला करण्यास सक्षम आहे.

# पोलिस पतीनेच रचला पोलिस पत्नीच्या हत्येचा कट!

## पती राज्य राखीव पोलिस दलात ● हत्येसाठी दोघांना दिली सुपारी



उपायुक्त शिंदे, पोलिस पथक व अटकेतील आरोपी

**♦ अमरावती, २ ऑगस्ट**

शहरातील वडाळी परिसरात राहणाऱ्या महिला पोलिसाची हत्या राज्य राखीव दलात कार्यरत पोलिस पतीनेच कट रचत दोघांना सुपारी देऊन केल्याचे तपासात उघड झाले आहे. पोलिसांनी पतीला अटक केली आहे. हत्याकांडात सहभागी दोघांची ओळख पटली असून, लवकरच त्यांना ताब्यात घेऊ, असे पोलिसांनी शनिवारी पत्र परिषदेत सांगितले.

आशा राहुल धुळे-तायडे असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कार्यरत होत्या. राहुल तायडे असे कट रचून पत्नीची हत्या करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याचे नाव आहे. पत्नीसोबत असणारा वाद व दुसऱ्या महिलेसोबत असणारे संबंध या कारणामुळे ही हत्या झाल्याचे पुढे आले आहे.

शुक्रवारी सायंकाळी आशा घरात एकट्या होत्या. तेवढ्यात त्यांचा मुलगा घरी आला असता, त्याला दोन व्यक्ती घरातून मागील बाजूने पळताना दिसले, तर आशा निपचित पडल्या होत्या. तपासात त्यांची हत्या झाल्याचे उघड झाले.

दरम्यान, आशा यांच्या बहिणीने तक्रार दिली. त्यात त्यांनी राहुल तायडे यांच्यासोबत बहिणीचा असलेला वाद नमूद केला होता. गडचिरोलीला कर्तव्यावर जाणे त्याने टाळले होते. विशेष म्हणजे, राहुल हा पत्नीची हत्या झाली असताना घरातील सोने चोरीला गेले, असे पोलिसांना सांगत होता. त्यांच्यावर संशय बळावल्याने पोलिसांनी कसून चौकशी केली. त्यात त्याने पत्नीची सुपारी देऊन हत्या केल्याची कबुली दिली. पळणाऱ्या दोन व्यक्ती मुलाला दिसल्या नसत्या, तर दरोडा टाकून हत्या झाल्याची कहाणी राहुलने रंगविली असती. हत्येत सहभागी अन्य दोघांची ओळख पटली असून, त्यांचा शोध सुरू असल्याचे पोलिस उपायुक्त शिंदे यांनी सांगितले. राहुलला अटक केल्यानंतर न्यायालयाने त्याला पाच दिवस पोलिस कोठडीचा आदेश दिला. (तभा वृत्तसेवा)

# लोकमान्य आणि लोकशाहीर शाश्वत प्रकाशस्तंभ : सुनील देवधर




**♦ नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

लोकमान्य टिळक आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहस आणि दूरदृष्टीचे शाश्वत प्रकाशस्तंभ होते, असे उद्‌गार ज्येष्ठ भाजना नेते आणि मायहोम इंडियाचे संस्थापक सुनील देवधर यांनी काढले.

माय होम इंडियातर्फे राजधानी दिल्लीतील कॉन्स्टिट्युशन क्लबमध्ये टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात देवधर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडिया हॅबिटॅट सेंटरचे संचालक आणि माय होम इंडियाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. के.जी. सुरेश होते. यावेळी मुख्य अतिथी म्हणून बुलंदशहरचे भाजपा खासदार डॉ. भोलासिंह, भाजपाच्या राज्यसभा सदस्य डॉ. मेधा कुळकर्णी आणि माय होम इंडिया दिल्ली प्रदेशचे अध्यक्ष डॉ. बलदेव राज सचदेवा उपस्थित होते.

लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या काळातीलच नाही तर भविष्यातील पिढीसाठी प्रेरणेचा पाया घातला, असे नमूद करत देवधर म्हणाले की, त्यांचे साहस आणि दूरदृष्टी आम्हाला सशक्त राष्ट्र निर्माणाचा मार्ग दाखवत आहे.

देशातील थोर महापुरुषांची जातीजातीत विभागणी करु नका, यामुळे त्यांचे नाही तर समाजाचे आणि देशाचे कधीच भरुन न निघणारे नुकसान होते, असे ते म्हणाले. भारताचे स्वातंत्र्य म्हणजे हिंदूंचे स्वातंत्र्य आहे, यावर विश्वास असल्यामुळेच टिळकांनी शिवजयंती आणि गणेशोत्सव सार्वजनिकरित्या साजरा करण्याचे आवाहन केले होते, याकडे देवधर यांनी लक्ष वेधले. यावेळी डॉ. भोलासिंह आणि डॉ. मेधा कुळकर्णी यांचीही भाषणे झाली. लोकमान्य टिळक आणि अण्णाभाऊ साठे यांचे विचार आजही समाजाला जागरुक करण्याचा आणि समृध्द होण्याचा मार्ग दाखवतात, असे डॉ. मेधा कुळकर्णी म्हणाल्या. स्वातंत्र्य संग्राम सैनिकांनी केलेला त्याग आणि सामाजिक न्यायासाठी अण्णाभाऊ साठे यांनी केलेल्या संघर्षाचे स्मरण ठेवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे, असे डॉ. भोलासिंह म्हणाले. डॉ. के.जी. सुरेश यांनी आभारप्रदर्शन केले. (तभा वृत्तसेवा)

# राज्यसभेत भाजपाने मारले शतक, सदस्यसंख्या पोहोचली १०२ वर

**♦ नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

भाजपाने राज्यसभेत शतक झळकवले आहे. राज्यसभेत भाजपाच्या सदस्यांचा आकडा १०२ वर पोहोचला आहे. भाजपाने दुसऱ्यांदा असा विक्रम केला आहे.

उपराष्ट्रपतिपदाची निवडणूक ९ सप्टेंबरला होत असतांना भाजपासाठी हा एक चांगला संकेत मानला जात आहे. आतापर्यंत राज्यसभेत भाजपा शतकाच्या उंबरठ्यावर होती, म्हणजे भाजपाचे ९९ सदस्य होते. मात्र मागील आठवड्यात राज्यसभेत ॲड. उज्वल निकम, माजी परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला आणि सामाजिक कार्यकर्ते सी. सदानंदन मास्टर यांनी शपथ घेतल्यामुळे भाजपाची सदस्य संख्या १०२ पोहोचली आहे. काँग्रेस आघाडीजवळ राज्यसभेत ७८ तर तिसऱ्या आघाडीजवळ ३० सदस्य आहेत.

राज्यसभेत शंभरावर सदस्य होण्याची भाजपाची ही दुसरी वेळ आहे. याआधी ३१ मार्च २०२२ ला १३ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत ४ जागा जिंकल्यानंतर भाजपाचे संख्याबळ ९७ वरुन १०१ वर पोहोचले होते. त्यानंतर भाजपा पुन्हा शंभराच्या खाली म्हणजे ९९ वर आली होती.

राज्यसभेत रालोआचे संख्याबळ १३४ आहे. यात ५ नामनियुक्त सदस्यांचाही समावेश आहे, जे बहुमतापेक्षा कितीतरी जास्त आहे. रालोआत भाजपाचे १०२, अण्णाद्रमुक आणि जदयुचे प्रत्येकी ४, राष्ट्रवादी काँग्रेसचे ३ आणि तेलगू देसमचे २ सदस्य आहे. इंडिया आघाडीत काँग्रेसचे २७, तृणमूल काँग्रेसचे १३ तर द्रमुकचे १० आणि राजदचे ५ सदस्य आहेत. तिसऱ्या आघाडीत आपचे सर्वाधिक म्हणजे ९ तर बिजू जनता दल आणि वायएसआर काँग्रेसचे प्रत्येकी सात सदस्य आहेत.

**भाजपाची विक्रमी कामगिरी**

काँग्रेसनंतर असा विक्रम करणारा भाजपा हा दुसरा पक्ष ठरला होता. १९८८ आणि १९९० दरम्यान काँग्रेसचे राज्यसभेतील संख्याबळ शंभरवर पोहोचले होते. राज्यसभेत २३३ निर्वाचित आणि १२ नामनियुक्त सदस्य असतात. सध्या राज्यसभेत ५ जागा रिक्त आहेत. त्यामुळे २४० सदस्यांच्या राज्यसभेत बहुमतासाठी १२१ जागा आवश्यक आहेत. (तभा वृत्तसेवा)

# केरळमधील दोन नन्सची अखेर सुटका

**♦ बिलासपूर, २ ऑगस्ट**

छत्तीसगडच्या बिलासपूर जिल्ह्यातील एका विशेष न्यायालयाने शनिवारी मानवी तस्करी आणि जबरदस्तीने धर्मांतर केल्याच्या आरोपाखाली अटक केलेल्या केरळमधील दोन नन्ससह तीन जणांना जामीन मंजूर केला. प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश सिराजुद्दीन कुरेशी यांनी शुक्रवारी झालेल्या सुनावणीनंतर त्यांच्या जामीन अर्जांवर निकाल राखून ठेवला होता. न्यायालयाने तिघांनाही सशर्त जामीन मंजूर केला आहे, असे बचाव पक्षाचे वकील अमृतो दास यांनी सांगितले. बजरंग दलाच्या एका स्थानिक कार्यकर्त्याने नारायणपूरमधील तीन मुलींचे जबरदस्तीने धर्मांतर करून त्यांची तस्करी केल्याचा आरोप केला होता. (वृत्तसंस्था)

# गाझामधील शांततेसाठी पॅलेस्टाईन देशनिर्मितीचा ठराव

**♦ न्यू यॉर्क, २ ऑगस्ट**

युद्धविरामासाठी अमेरिका आणि इस्रायलवर दबाव वाढविण्याचा प्रयत्नाचा भाग म्हणून युरोपियन संघटना आणि आशियातील इंडोनेशिया, आफ्रिकेतून सेनेगल, तसेच अमेरिका खंडातून ब्राझील, कॅनडा आणि मेक्सिको या देशांनी पॅलेस्टाईन देशनिर्मितीचा प्रस्ताव तयार केला.

गाझा आणि पश्चिाम किनारपट्टीवरून इस्रायलची माघारी, हमास संघटनेवर बंदी आणि एकत्रित पॅलेस्टाइन देशाची स्थापना, असा हा नवा शांततेचा प्रस्ताव आहे. युद्धविरामासाठी अमेरिका आणि इस्रायलवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न याद्वारे करण्यात आला आहे. २९ जुलै रोजी हा प्रस्ताव तयार करण्यात आला असून, यासाठी नियोजित उच्च स्तरावरील परिषदेला युरोपीय संघ, अरब लीग यांच्यासह १७ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी इस्रायल आणि अमेरिका दोन्ही देश अनुपस्थित होते. ठरावामुळे गाझामधील सद्यास्थिती बदलणार नसली, तरी इस्रायलवर दबाव टाकण्यासाठी हा प्रयत्न असल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे अरब देशांनी प्रथमच हमास संघटनेला नि:शस्त्र करून त्यावर बंदी घालावी, यास मान्यता दिली आहे. (वृत्तसंस्था)



# महाराष्ट्र शुगर क्रिकेट लीग स्पर्धेस आजपासून दयानंदच्या मैदानावर सुरवात

## आमदार समाधान अवताडे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

येथील ह.दे प्रशालेच्या प्रांगणात शनिवारी सायंकाळी महाराष्ट्र शुगर क्रिकेट लीग स्पर्धेचे उद्घाटन झाले सीताराम साखर कारखान्याचे दूरदृष्टी असलेले कार्यकारी संचालक सुयोग गायकवाड यांच्या प्रेरणेने साकारलेली जिल्हास्तरीय महाराष्ट्र शुगर क्रिकेट लीग ही केवळ एक स्पर्धा नसून साखर उद्योगातील बांधिलकी, मैत्री आणि सामंजस्याचा एक अद्वितीय पूल आहे. ही स्पर्धा साखर क्षेत्रातील व्यक्तींना एकत्र आणून एक नवीन बंध निर्माण करणारी ठरेल. त्यामुळे यापुढील काळात ही स्पर्धा राज्यस्तरावर आयोजित करण्यात यावी, अशी अपेक्षा आमदार समाधान अवताडे यांनी व्यक्त केली.

३ ते १० ऑगस्ट दरम्यान दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर खेळल्या जाणाऱ्या महाराष्ट्र शुगर क्रिकेट लीग २०२५ या टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन शनिवारी हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर दीपप्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा पूजनाने उत्साहात करण्यात आले. त्यावेळी आमदार अवताडे बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार दिलीप माने हे होते. यावेळी धनश्री, सीताराम व आष्टी परिवाराचे मार्गदर्शक प्रा.शिवाजीराव काळुंगे, सीताराम महाराज साखर कारखान्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजलक्ष्मी काळुंगे-गायकवाड, श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुष्पराज तथा अण्णाराज काडादी, उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते, भैरवनाथ शुगरचे प्रा.शिवाजी सावंत, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, सहकारमहर्षी साखर कारखान्याचे सयाजीराजे मोहिते-पाटील, श्री संत दामाजी साखर कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, संचालक औदुंबर वाडदेकर, बसवराज पाटील, राजेंद्र पाटील, दयानंद सोनगे, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग साखर कारखान्याचे प्रणव परिचारक, जकरायाचे राहुल जाधव, वेदांत साठे, प्रादेशिक उपसंचालक पांडुरंग साठे, एस.एन. चिवटे, पृथ्वीराज माने आदी उपस्थित होते. प्रारंभी सीताराम व आष्टी शुगर परिवाराचे कार्यकारी संचालक सुयोग गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विजेत्यांना देण्यात येणाऱ्या ट्रॉफीचेही अनावरण करण्यात आले.

यावेळी प्रा.शिवाजी सावंत, प्रणव परिचारक, समाधान काळे, पृथ्वीराज माने, अप्पासाहेब खुळे यांनी मनोगत व्यक्त केले.

### मनोरंजनाने सोहळा रंगला

मराठी सिनेसृष्टीतील चमकते तारे ऋता दुर्गुळे, भाग्यश्री लिमये आणि हेमल इंगळे या प्रतिभावान कलावंतांनी सादर केलेल्या विनोदी प्रसंगांनी हास्याच्या लाटा उसळल्या होत्या. सोलापूरकर प्रेक्षकांनी या हास्यपर्वाचा मनसोक्त आनंद लुटला.

# गावपातळीवर हवी मानवाधिकार समिती

## सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झिंजाडे यांचा प्रस्ताव

**♦ मुंबई, २ ऑगस्ट**

मानवाधिकाराबद्दल नागरिकांमध्ये जागृती निर्माण व्हावी,यासाठी गावपातळीवर मानवाधिकार समित्यांची स्थापना करण्यात यावी. सरपंच किंवा गावातील महिला समितीचे अध्यक्ष असतील आणि ग्रामसेवक, पोलिस पाटील यांची समितीत महत्त्वाची भूमिका असेल. सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झिंजाडे यांनी हा प्रस्ताव मांडला आहे.

प्रस्तावानुसार ग्रामीण मानवाधिकार संरक्षण समिती असे या नव्या समितीचे नाव असेल. सरपंच यांची भूमिका सर्वात वरची असेल आणि ग्रामसभेचा या समितीला पाठिंबा राहील. सोबतच गावातील महिला आणि महिला पोलिस यांनाही समितीत महत्वाचे स्थान असेल, असे महात्मा फुले समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष झिंजाडे यांनी पीटीआयशी बोलतांना सांगितले. संबंधित गाव आणि आजुबाजूचा परिसर ही समितीची कार्यकक्षा असेल. सरपंच किंवा स्थानिक महिला समितीचे अध्यक्ष, ग्रामसेवक किंवा पोलिस पाटील सचिव आणि महिला पोलिस सभासद असतील, असे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. सरकारचा प्रतिनिधी असलेले पोलिस पाटील हे पोलिस आणि नागरिक यांच्यातील दुवा म्हणून काम पाहतील आणि तपास कामात पोलिसांना सहकार्य करतील. दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक समुदायातील शिक्षित नागरिक यांचा समितीमध्ये सहभाग असेल. कारण, याच घटकांवर अन्याय होत असतो. स्थानिक पोलिसांनी जर घटनेची दखल घेतली नाही तर समिती स्वतःहा पुढाकार घेऊन प्रकरण मार्गी लावण्याचा प्रयत्न करेल. समितीला न्यायिक अधिकार नसतील पण अन्यायग्रस्ताला न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाला मदत आणि मार्गदर्शन करणार आहे. ग्रामीण मानवाधिकार संरक्षण समिती करण्याचा ठराव येत्या १५ ऑगस्टपूर्वी देशभरातील २७ हजार ९०५ सरपंच मांडतील, अशी माहिती सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ता काकडे यांनी दिली आहे. (वृत्तसंस्था)

### ५० टक्के सदस्य महिला

समितीच्या एकूण सदस्यांपैकी ५० टक्के सदस्य महिला असतील. यामध्ये विधवा, एकल महिला आणि समाजाने टाकून दिलेल्या अथवा दुर्लक्षित केलेल्या महिलांचा समावेश असेल. सोबतच स्वच्छ प्रतिमा असलेले आणि भ्रष्टाचाराविरोधात भूमिका घेणारे निवृत्त शासकीय अधिकारी यांचाही समितीत समावेश केला जाणार आहे.

### विविध उपक्रमांचे आयोजन

मानवाधिकारांबद्दल जागृती करण्याचे लक्ष्य समोर ठेवून परिसरातील शाळा, महाविद्यालय आणि गावागावांमध्ये जागृती मेळावे, शैक्षणिक उपक्रम आणि सामाजिक मेळाव्यांचे आयोजन केले जाईल.

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

४१ वा वर्धापन दिन



# व्यापार शुल्काला प्रत्युत्तर देणार

## फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांचा इशारा ● युरोपियन देशांची अमेरिकेविरोधात एकजूट

**पॅरिस, २ ऑगस्ट**

अमेरिकेकडून एकतर्फी लादण्यात येणारे व्यापार शुल्क आणि टॅरिफची आम्हाला मुळीच चिंता नाही. पुढील चर्चेत युरोपियन युनियनला अमेरिकेला जोरदार प्रत्युत्तर देण्यासाठी कठोर भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी दिला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी युरोपियन युनियनवर १५ टक्के टॅरिफ आणि अमेरिकेकडून ऊर्जा खरेदी करण्याची अट लादली. मॅक्रॉन यांनी अमेरिकेने लादलेल्या टॅरिफवर चिंता व्यक्त केली. त्यांनी म्हटले की युरोपियन युनियन ट्रम्प यांच्या निर्णयाला सडतोड प्रत्युत्तर देण्यासाठी सक्षम आहे. आम्हाला आपली ताकद आणि धाडस दाखवावे



लागेल. फ्रान्स नेहमीच स्पष्ट आणि कठोर भूमिका घेणारा देश राहिला आहे आणि भविष्यातही हे धोरण चालू राहील. युरोपने स्वतःला शक्ती म्हणून पाहण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. दरम्यान ट्रम्प आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्यात झालेल्या चर्चेनंतर अमेरिकेसोबत व्यापार करार झाला. करारानुसार, आता अमेरिकेला होणाऱ्या युरोपियन युनियनच्या बहुतांश निर्यातीवर १५ टक्के कर आकारला जाईल. यात अमेरिकेत ६०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची योजना देखील आहे.

### ट्रम्प यांच्या धमक्यांना घाबरणार नाही : ग्वाडे मंताशे

अमेरिकेने ३० टक्के टॅरिफ लादण्याच्या निर्णयावर दक्षिण आफ्रिकेचे खनिज व पेट्रोलियम संसाधन मंत्री ग्वाडे मंताशे म्हणाले की, अमेरिका एकतर्फी कोणताही कर लादेल, हे चालणार नाही. दक्षिण आफ्रिका आपल्या नैसर्गिक संसाधनांसाठी कोणत्याही प्रकारची धमकी किंवा दबाव स्वीकारणार नाही. आमचा व्यापार परस्पर हितसंबंधांवर आधारित आहे. ■

### ५० टक्के टॅरिफवर ब्राझीलचा आक्षेप

ट्रम्प यांनी ब्राझीलवर ५० टक्के टॅरिफ लादल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंधात तणाव निर्माण झाला आहे. राष्ट्राध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांनी ट्रम्प यांच्या निर्णयाला अस्वीकार्य हस्तक्षेप असे म्हटले आहे. त्यांनी म्हटले की ब्राझील दबावाखाली कोणतीही तडजोड करणार नाही. राजकीय युक्तिवाद करून व्यापार निर्बंध लादणे अन्यायकारक आहे. ■

# राम मंदिरावर हल्ल्याची धमकी

**छ. संभाजीनगर, २ ऑगस्ट**

अयोध्येतील राम मंदिरावर हल्ला होणार असल्याची धमकी समाज माध्यमावर एकाला पाठवण्यात आली आहे, असे एका अधिकाऱ्याने शनिवारी सांगितले. ११ जुलै रोजी समाज माध्यमावर एक रील पाहत असताना त्यांना एका खात्यावरून एक आक्षेपार्ह टिप्पणी आली, असे शिरूर कासार येथील रहिवासी असलेल्या तक्रारदार सूरज गाडेकर यांनी सांगितले. गाडेकर यांनी संबंधित समाज माध्यम वापरकर्त्याशी संवाद साधला. तो पाकिस्तानचा रहिवासी असल्याचा दावा त्याने केला आणि कराचीतील त्याचे स्थान शेअर केले, असे एफआयआरमध्ये म्हटले आहे. आरोपीने चॅटमध्ये हिंदू धर्मावर टिप्पणी केली आणि एक ऑडिओ क्लिप पाठवली. (वृत्तसंस्था)



घटनास्थळाकडे जाणाऱ्या मार्गावर भारतीय लष्कर, राज्य पोलिस आणि निमलष्करी दलाचे जवान तैनात केले होते

# हद्दपारीच्या निर्णयाला न्यायाधीशांची स्थगिती

## ट्रम्प यांना धक्का, अमेरिकेतील लाखो स्थलांतरितांना दिलासा

**वॉशिंग्टन, २ ऑगस्ट**

अमेरिकेतील बेकायदेशीर स्थलांतरित नागरिकांना राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हद्दपार करण्याचा दिलेला आदेश एका संघीय न्यायाधीशांनी स्थगित केला आहे. न्यायालयाचा निर्णय ट्रम्प यांना मोठा धक्का मानला जात असला तरी, लाखो स्थलांतरित लोकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

स्थलांतरित हक्क गटांनी ट्रम्प यांच्या हद्दपार करण्याच्या आदेशाला संघीय न्यायालयात आव्हान दिले होते आणि होमलँड सिक्युरिटीच्या कारवाईविरुद्ध न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना वॉशिंग्टनमधील जिल्हा न्यायाधीश जिओ कॉब यांनी ट्रम्प प्रशासनाच्या आदेशाला स्थगिती दिली. मानवतावादी पॅरोल ही अमेरिकन कायद्याची एक तरतूद आहे,


ज्या अंतर्गत परदेशी नागरिकांना मानवतावादी आधारावर काही काळ अमेरिकेत राहण्याची परवानगी असल्याचे आपल्या आदेशात न्यायाधीशांनी नमूद केले. अलीकडेच होमलँड सिक्युरिटी सेक्रेटरी क्रिस्टी नोएम यांनी मानवतावादी पॅरोलवर अमेरिकेत राहणाऱ्या स्थलांतरितांना त्वरित हद्दपार करण्याचे आदेश दिले. यानंतर, मोठ्या संख्येने स्थलांतरितांना ताब्यात घेण्यात आले. स्थलांतरित हक्क गटांनी होमलँड सिक्युरिटीच्या या कारवाईविरुद्ध न्यायालयात धाव घेतली होती. (वृत्तसंस्था)

### १७०० भारतीयांना देशाबाहेर काढले

७ महिन्यांत अमेरिकेने आतापर्यंत १७०३ भारतीय नागरिकांची हकालपट्टी केली. यामध्ये १५६२ पुरुष आणि १४१ महिलांचा समावेश आहे. काही प्रकरणांमध्ये भारतीय नागरिकांकडे वैध प्रवास कागदपत्रे असतात परंतु तरीही त्यांना सरकार थेट हद्दपार करत आहे. अमेरिकेत नागरिकांना हातकडी घालण्यावर आणि महिला आणि मुलांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर भारत सरकारने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. ■

# रशियाकडून तेल खरेदी न करणे चांगले पाऊल

## पण घडामोडींबाबत खात्री नाही : डोनाल्ड ट्रम्प



**न्यू यॉर्क , २ ऑगस्ट**

भारत आता यापुढे रशियाकडून तेल खरेदी करणार नसल्याचे मी ऐकले आहे. भारताने उचललेले एक चांगले पाऊल आहे. परंतु, यासंदर्भात घडत असलेल्या घडामोडींबाबत मला खात्री नाही, असे वक्तव्य अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काढले आहे.

मी जे काही ऐकले आहे ते समाधानकारक आहे. पण त्यात तथ्य आहे की नाही याची मला माहिती नाही. हे चांगले पाऊल असून पुढे काय होईल ते बघू या, असे ट्रम्प यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. ट्रम्प यांनी जवळपास ७० देशांवर विविध व्यापार शुल्क आकारले आहे. यादरम्यान भारताने गेल्या काही महिन्यांपासून रशियाकडून केल्या जाणाऱ्या तेलाच्या खरेदीत कपात केल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांमध्ये झळकले. यावर प्रतिक्रिया देताना परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल म्हणाले की, जागतिक परिस्थिती आणि जागतिक बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किंमती यावर भारत तेल खरेदीचा निर्णय घेत असतो. प्रसारमाध्यमांमध्ये आलेल्या बातम्यांबद्दल मला माहिती नाही. (वृत्तसंस्था)

# कुलगाममध्ये चकमकीत तीन दहशतवादी ठार

**श्रीनगर, २ ऑगस्ट**

शनिवारी जम्मू आणि काश्मीरच्या कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दक्षिण काश्मीर जिल्ह्यातील अखल येथील जंगलात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी घेराबंदी आणि शोध मोहीम सुरू केली.

रात्रीपासून ही चकमक सुरू झाली. शुक्रवारी संध्याकाळी दोन्ही बाजूंमध्ये झालेल्या सुरुवातीच्या गोळीबारानंतर, रात्री कारवाई थांबवण्यात आली. घेराबंदी मजबूत करण्यात आली आणि परिसरात अतिरिक्त सैन्य पाठवण्यात आले. शनिवारी सकाळी पुन्हा गोळीबार सुरू झाला. यामध्ये तीन दहशतवादी मारले गेले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची ओळख आणि गटाशी संबंधितता निश्चित केली जात आहे. ऑपरेशन अजूनही सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. शनिवारी सकाळपासून कुलगामच्या अखल जंगलात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये गोळीबार सुरू आहे. दहशतवादाविरुद्ध सुरक्षा दलांच्या कारवाईचा हा दुसरा दिवस आहे. स्पेशल ऑपरेशन ग्रुप, जम्मू-काश्मीर पोलिस, लष्कर आणि सीआरपीएफ हे ऑपरेशन राबवत आहेत. जंगलात लपलेल्या दहशतवाद्यांची संख्या अद्याप समजू शकलेली नाही. तथापि, कारवाई करण्यासाठी अधिक सुरक्षा दलांना त्या भागात पाठवण्यात आले आहे. कुलगाममधील आजची चकमक ही जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवाद्यांवर सुरू असलेल्या कारवाईचा एक भाग आहे.

**आठवड्यातील तिसरी चकमक**

या आठवड्यातील ही तिसरी चकमक आहे. ५ दिवसांपूर्वी, २८ जुलै रोजी, ऑपरेशन महादेव अंतर्गत, सुरक्षा दलांनी श्रीनगरपासून २२ किमी अंतरावर असलेल्या लिडवासच्या जंगलात पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या तीन दहशतवाद्यांना ठार मारले. यानंतर, ३१ जुलै रोजी पूंछमधील नियंत्रण रेषेजवळ आणखी दोन दहशतवादी मारले गेले. भारतीय सीमेत प्रवेश करताच त्यांना रोखण्यात आले. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांकडून दोन असॉल्ट रायफल, एक पिस्तूल, हँडग्रेनेड, दोन आयईडी, औषधे, संप्रेषण उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. (वृत्तसंस्था)

# राहुल गांधींनी देशाची दिशाभूल करू नये

## राजनाथ सिंह यांनी सुनावले, अणुबॉम्ब असल्यास ताबडतोब स्फोट करावा

**नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

निवडणूक आयोग ही प्रतिष्ठित संवैधानिक संस्था आहे आणि विरोधी पक्षाच्या नेत्याला त्यांच्यावर आरोप करणे शोभत नाही. राहुल गांधी यांनी देशाची दिशाभूल करणे बंद करावे आणि त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा अणुबॉम्ब असल्यास त्याच ताबडतोब स्फोट करावा, अशा शब्दात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांच्या आरोपाचा समाचार घेतला.



एका कार्यक्रमात बोलताना राजनाथ सिंह म्हणाले, काही राजकीय पक्ष एसआयआरवर जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत आणि चुकीचे राजकारण करत आहेत. राहुल गांधी म्हणतात की निवडणूक आयोग मते चोरत आहे. निवडणूक आयोग ही एक अशी संस्था आहे ज्याची स्वतःची विश्वासार्हता आहे. जर तुमच्याकडे अणुबॉम्ब असेल तर त्याची त्वरित स्फोट करावा. निवडणूक आयोगासारख्या संवैधानिक संस्थेवर निराधार आरोप करणे कोणत्याही परिस्थितीत विरोधी पक्षनेत्याला शोभत नाही. त्यांच्याकडे पुरावे असल्यास जनतेसमोर आणावे. सत्य हे आहे की त्यांच्याकडे कोणतेही तथ्य नाही किंवा कोणतेही पुरावे नाहीत. खळबळजनक गोष्टी बोलणे ही त्यांची जुनी सवय आहे. त्यांनी संवैधानिक संस्थांना त्यांचे काम करू द्यावे. (वृत्तसंस्था)



जम्मू-काश्मिरमध्ये हिंदू आणि बौद्ध राजवटींची चिन्हे पदोपदी आढळत आहेत. अनंतनाग जिल्ह्यातील कर्कुट नाग येथे ओहळाची स्वच्छता करताना रियाझ अहमद खान, आदिल बताना आणि बशीर अहमद बिंथ यांना प्राचीन मूर्ती सापडल्या. यामध्ये ११ शिवलिंग आहेत. पुरातत्त्व खात्याच्या अधिकाऱ्यांनी मूर्ती जतन करण्यासाठी ताब्यात घेतल्या आहेत.

## चित्रपट वार्ता

### बिन लग्नाची गोष्ट चित्रपटाचा टीझर प्रदर्शित

**मुंबई** : नात्यांच्या पारंपरिक चौकटींना धक्का देणारा आणि एक नव्या



विचारांची झलक देणारा बिन लग्नाची गोष्ट या आगामी मराठी चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. हा टीझर लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या आधुनिक संकल्पनेवर आधारित आहे. चित्रपटाच्या टीझरमध्ये उमेश कामत आणि प्रिया बापट यांची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळते. याचबरोबर गिरीश ओक आणि निवेदिता सराफ यांचे नातेही पारंपरिक चौकटींपेक्षा काहीसे वेगळे असल्याचे दिसते. हा चित्रपट गॉडगिफ्ट एंटरटेन्टमेंट प्रा. लि. आणि एस. एन. प्रॉडक्शन्स यांनी निर्मित केला आहे. कथा समीर कुलकर्णी यांची असून, दिग्दर्शन आदित्य इंगळे यांचे आहे. ■

### ग्रामीण भारतातील आव्हानांचा सामना करणार 'छोरीयाँ'



**मुंबई** : मनोरंजन, सोशल मीडिया आणि फॅशनच्या जगातील ११ धडाडीच्या आणि प्रतिभावान महिला त्यांच्या सोयीसुविधा सोडून ग्रामीण भारतातील खडतर जीवन स्वीकारण्यासाठी निघतात, तेव्हा काय घडतं? झी टीव्हीवरील आगामी शो 'छोरीयाँ चली गाँव' हेच दाखवणार आहे. या कार्यक्रमात भरपूर नाट्य, मैत्री, स्पर्धा आणि अनेक अनपेक्षित ट्विस्ट्स पाहायला मिळणार आहे. कारण, या महिला शहराच्या झगमगाटापासून दूर जाऊन स्वतःची ताकद सिद्ध करणार आहेत. हा कार्यक्रम दररोज रात्री ९.३० वाजता झी टीव्हीवर पाहता येणार आहे. यात अनिता हसानंदानी, ऐश्वर्या खरे, अंजुम फाकीह, कृष्णा श्रॉफ, रेहा सुखेजा, रमीत संधू, सुरभी, समृद्धी मेहरा, एरिका पॅकार्ड, सुमुखी सुरेश, डॉली जावेद या अभिनेत्री दिसणार आहेत. ■

### अनपेक्षित सरींनी रंगले कुमकुम भाग्यचे प्रणयी डान्स दृश्य




**मुंबई** : पडद्यावरचे लक्षात राहणारे क्षण पूर्णपणे आखलेले नसतात आणि 'कुमकुम भाग्य'मधील रेन डान्स सिक्वेन्स हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. पावसातला डान्स आधीच कथानकाचा भाग होता, तरी चित्रीकरणादरम्यान मुंबईत खराखुरा पाऊस सुरू झाला, तेव्हा त्या क्षणाला एक जादुई परिमाण लाभला. संपूर्ण टीमने त्या पावसाला सामोरे जात स्वीकारले, परिणामी ते दृश्य आणखीच खास बनले. त्या नैसर्गिक पावसाने सीनच्या वातावरणात एक अशी वास्तवदर्शी, रोमँटिक आणि सिनेमासारखी अनुभूती निर्माण केली, जी कोणताही स्पेशल इफेक्ट देऊ शकला नसता. प्रणाली आणि नामिकला पावसात अनेक टेक्स द्यावे लागले. या सीनचे चित्रीकरण पूर्ण होण्यासाठी ३ ते ४ तास लागले. ■

# जंगली टमाट्यांमधून झाला बटाट्याचा उगम

## ८० ते ९० लाख वर्षांपूर्वी झाला उदय

**नवीन संशोधनातून समजले कूळ**

**लंडन, २ ऑगस्ट**



बटाट हा असा घटक आहे जो कोणत्याही भाजीत आणि कसाही वापरला तरी त्याची चव उत्कृष्टच लागते. रोजच्या भाजीपासून तर उपासापर्यंत सर्वच पदार्थांमध्ये बटाट्याला स्थान असते. या बटाट्याचा उगम सुमारे ८० ते ९० लाख वर्षांपूर्वी जंगली टोमॅटो आणि बटाट्यासारख्या दिसणाऱ्या वनस्पतींमध्ये झालेल्या एका नैसर्गिक आंतरप्रजननातून झाला असावा, असे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे.

आपण खात असलेला बटाटा हा त्याच्या १०७ जंगली प्रजाती 'पेटोटा' या कुळात येतात. हे कूळ इतर दोन कुळांच्या पूर्वजांच्या आंतरप्रजननामधून उदयास आले आहे, असे नवीन संशोधनातून समोर आले आहे. यातील पहिले कूळ म्हणजे 'टोमॅटो' आहे. यात 'लायकोपर्सिकम' म्हणजेच यामुळे टमाट्याला लाल रंग येत असलेला घटक याच्या १७ प्रजाती आहेत. तर दुसरे कूळ म्हणजे 'इट्युबेरोसम' आहे. याच्या तीन प्रजाती दक्षिण अमेरिकेत आढळतात. 'उत्क्रांतीच्या दृष्टिकोनातून, टोमॅटो, पेटोटा आणि इट्युबेरोसम या कुळांमधील संबंधांबद्दल एक न सुटलेला वैज्ञानिक मतभेद होता, असे लंडनच्या नॅचरल हिस्ट्री म्युझियममधील वनस्पतिशास्त्रज्ञ आणि या अभ्यासाच्या सहलेखिका सँड्रा नॅप यांनी सांगितले. पेटोटा कुळामध्ये जनुकांचे नवीन संयोजन तयार झाले. यामुळे 'कंद' विकसित झाले. कंद म्हणजे जमिनीखाली वाढणारे फुगीर अवयव, जे पाणी आणि पोषक तत्त्वे साठवतात आणि ज्याचा आपण अन्न म्हणून वापर करतो. विशेष म्हणजे, आधुनिक टोमॅटो आणि इट्युबेरोसम वनस्पतींच्या पूर्वजांमध्ये कंद नव्हते आणि संकरानंतरही त्यांच्या मूळ कुळात कंद विकसित झाले नाहीत, असे या आंतरप्रजननाचे महत्त्व हे आहे. हे मत नॅप यांनी व्यक्त केले. (वृत्तसंस्था)

### नवीन प्रजाती उदयास येणार

प्रजातींमधील संकराची घटना नवीन गुणधर्मांच्या उत्क्रांतीला चालना देऊ शकते. यामुळे आणखी नवीन प्रजाती उदयास येतात, असे या अभ्यासाचे सहलेखक आणि चायनीज ॲकॅडमी ऑफ ॲग्रीकल्चरल सायन्सेसचे प्राध्यापक सॅनवेन हुआंग यांनी सांगितले. अखेर बटाटा कुठून आला, याचे रहस्य उलगडले आहे. या कुळांमधील उत्क्रांतीचे संबंध स्पष्ट करण्यासाठी संशोधकांनी पेटोटा, टोमॅटो आणि इट्युबेरोसम वनस्पतींच्या १२८ जीनोमचे विश्लेषण केले. यासाठी त्यांनी अत्याधुनिक जनुकीय साधनांचा वापर केला. ही पूर्वी उपलब्ध नव्हती. यामुळेच हे निष्कर्ष मिळवण्यासाठी वेळ लागल्याचे नॅप यांनी स्पष्ट केले. या टीमने आपले संशोधन 'सेल' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित केले. ■

# सरकारविरुद्ध बोलणाऱ्यांवर कारवाई होतेः रोहिणी खडसे

**पुणे, २ ऑगस्ट**

सरकारविरुद्ध बोलणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. प्रत्येक टीकेला योग्य वेळी उत्तर देईल, असे विधान पुण्यातील ड्रग्ज पार्टी प्रकरणात पतीला अटक झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस नेत्या रोहिणी खडसे यांनी शनिवारी केले. त्यांनी पक्षाध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या कार्यालयात भेट घेतली.

२७ जुलै रोजी पुण्यातील खराडी परिसरातील एका स्टुडिओ अपार्टमेंटवर छापा टाकण्यात आला होता. यादरम्यान पोलिसांनी अंमली पदार्थ आणि इतर वस्तू जप्त केल्याचा दावा केला होता. त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले आहे.पक्ष संघटनेवर चर्चा करण्यासाठी त्यांनी पवार यांची भेट घेतली, असे रोहिणी खडसे म्हणाल्या. ड्रग्ज पार्टी प्रकरणात पतीच्या अटकेबद्दल विचारले असता, त्या म्हणाल्या, न्यायालयीन प्रक्रियेवर भाष्य करणार नाही. हे प्रकरण आता न्यायप्रविष्ट आहे. मी योग्य वेळी पत्रपरिषदेद्वारे माझी बाजू मांडेन. महाराष्ट्रातील सर्वांना माहिती आहे की सरकारविरुद्ध बोलणाऱ्यांवर कारवाई केली जाते. ड्रग्ज, चॅट्स आणि व्हिडीओ सापडल्याबद्दल पोलिसांनी उपस्थित केलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेत, असे राष्ट्रवादी त्या म्हणाल्या.

मी योग्य वेळी सर्वांना उत्तर देईन. पोलिस म्हणतात की पाळत ठेवण्यामागे कोणताही हेतू नव्हता. विरोधी नेत्यांना लक्ष्य केले जात आहे असे मानण्याचे कारण आहे, असे खडसे यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

### भाजपात प्रवेश करताच गील यांच्या घरावर छापा

**चंदिगड** : अकाली दलाचे नेते रणजित सिंग गिल यांनी शुक्रवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश करताच दुसऱ्याच दिवशी पंजाब दक्षता विभागाने त्यांच्या घरावर छापा टाकला. हरयाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांच्या उपस्थितीत गील यांनी भाजपत प्रवेश केला. शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीर सिंग बादल यांचे जवळचे मानले जाणारे गिल यांनी काही दिवसांपूर्वीच अकाली दलाचा राजीनामा दिला. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# दुरावलेला मित्र पुन्हा जवळ!

प्रासंगिक

जनार्दन पाटील

केरळच्या किनाऱ्यापासून सुमारे ५०० किलोमीटर अंतरावर असलेल्या जगातील सर्वांत लहान मुस्लिम राष्ट्र असलेले मालदीव भारतासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. असे असूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मालदीव दौरा सहा वर्षांनंतरच शक्य झाला. कारण चीन आणि पाकिस्तानच्या प्रयत्नांमुळे तेथे निर्माण झालेले भारतविरोधी वातावरण निष्क्रिय करण्यासाठी थोडा वेळ लागला. चीनने हिंद महासागराच्या मुख्य व्यापार मार्गाजवळ असलेल्या या देशावर नजर ठेवायला सुरुवात केल्यापासून भारत आणि मालदीवमधील संबंधांवर परिणाम होऊ लागला होता. या दशकात मालदीवच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचे आणि आपल्याला अनुकूल सरकार स्थापन करण्याचे प्रयत्न चीन आणि पाकिस्तानकडून होत आहेत; परंतु चीनने मालदीवच्या सागरी क्षेत्रात आपली उपस्थिती निर्माण करण्याच्या उद्देशाने एक बेट भाडेतत्त्वावर घेतले, तेव्हा स्वाभाविकपणे भारताची चिंता वाढली. या बेटाच्या बहाण्याने चीनने केवळ आपली नौदल जहाजे मालदीवमध्ये पाठवण्यास सुरुवात केली नाहीत, तर ती कायमची तैनात करण्याचाही विचार केला. दुसरीकडे, भारताने मालदीवच्या सागरी क्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी केवळ त्याच्या तटरक्षक दलाशी सहकार्याचे संबंध प्रस्थापित केले नाहीत, तर तेथील एका बेटावर आपले रडार केंद्रदेखील स्थापित केले. दोन वर्षांपूर्वी मालदीवने भारतीय सैन्य हटवण्याची सूचना केली. भारताविषयी गरळ ओकली. त्यामुळे भारतीय पर्यटकांनी मालदीवऐवजी अंदमान- निकोबारचा पर्याय स्वीकारला. परिणामी, या देशाशी आपले संबंध बिघडले.

मालदीवची अर्थव्यवस्था भारत आणि रशियाच्या पर्यटकांवर अवलंबून आहे. मालदीवच्या जीडीपीमध्ये पर्यटनाचा वाटा तीस टक्के आहे. चीनच्या पर्यटकांची संख्या वाढली असली, तरी मुळात तिथले पर्यटक मालदीवला कमी जातात. भारताशी पंगा घेणे मालदीवला परवडणारे नव्हते; शिवाय चीनच्या कर्जाच्या विळख्यात अडकले, तर देश आणखीच अडचणीत येईल, याची जाणीव मालदीवच्या सत्ताधाऱ्यांना झाली. चीनची मदत सहेतुक असते. अडचणीच्या काळात तो मागे उभा राहीलच याची शाश्वती नसते. मालदीवच्या आक्रस्ताळी भूमिकेनंतरही भारताने अतिशय संयत प्रतिक्रिया दिली. भारताने मदत थांबवली नाही, तर मदतीचा हात दिला. त्यामुळे आता आपला खरा मित्र कोण आणि फायद्यासाठी मैत्रीचा हात पुढे करणारा मित्र कोण यातला फरक लक्षात आला. भारताशी सहकार्य संबंधांशिवाय मालदीव चीन आणि पाकिस्तानच्या बळावर जास्त काळ टिकू शकत नाही. सुमारे चार दशकांपूर्वी १९८८ मध्ये काही बंडखोर तत्कालीन अध्यक्ष अब्दुल गयूम यांना उलथवून टाकण्यासाठी माले येथे उतरले, तेव्हा त्यांनी भारताकडे मदत मागितली होती. राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील तत्कालीन सरकारने गयूम यांची सत्ता वाचवण्यासाठी 'ऑपरेशन कॅक्टस' अंतर्गत भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमानातून माले येथे सैन्य पाठवले होते.

भारताशी संबंधांवर परिणाम करण्यासाठी पाकिस्तानी गुप्तचर संस्था 'आयएसआय' मालदीवमधील पाच लाख सुन्नी मुस्लिम लोकसंख्येच्या धार्मिक भावना भडकवून भारतविरोधी बनवण्याचा प्रयत्न करत आहे; परंतु हा प्रयत्न यशस्वी होणार नाही, हे मोदी यांच्या दौऱ्यातून स्पष्ट झाले आहे. त्यांच्या मालदीव दौऱ्यादरम्यान पायाभूत सुविधांच्या विकासासाठी भारताने मालदीवला सुमारे ४८५० कोटी रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली. याचा दोन्ही देशांना फायदा होईल. सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे भारताच्या आर्थिक मदतीमुळे मालदीववरील चीनचा कर्जाचा बोजा कमी होण्यासही मदत होईल. मालदीववर चीनचे एक अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त कर्ज आहे. मालदीव पूर्वी चीन आणि इतर देशांना दर वर्षी ५१ दशलक्ष डॉलर्स देत असे. भारताच्या मदतीमुळे आता ही रक्कम फक्त २९ दशलक्ष डॉलर्सवर येईल. यामुळे मालदीवचे चीनवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होईल. मोदी यांच्या या भेटीनंतर आता मालदीवचे नेते आपल्या देशाच्या राजकारणावर प्रभाव पाडण्यासाठी चीन योजत असलेल्या युक्त्या समजून घेतील, अशी आशा निर्माण झाली आहे. भारताने मुईझ्झू यांना चीनच्या प्रभावापासून दूर ठेवून शेजारील देशाशी जुने संबंध पुनर्संचयित करण्यासाठी अभूतपूर्व संयम आणि राजनैतिक कौशल्य दाखवले आहे. चीनसमर्थक मानल्या जाणाऱ्या मुईझ्झू यांनी भारताशी संरक्षण सहकार्याचे संबंध पुनर्संचयित करण्याचे संकेत दिले आहेत. त्याचबरोबर भारताच्या सुरक्षा हितांना हानी पोहोचवू शकेल असे कोणतेही पाऊल उचलणार नाही, असे आश्वासनदेखील दिले आहे.



भौगोलिकदृष्ट्या मालदीवला जगातील सर्वाधिक विखुरलेला देश म्हटले जाते. एका बेटावरून दुसऱ्या बेटावर जाण्यासाठी येथे फेरी बोटीचा वापर करावा लागतो. मालदीव १९६५ मध्ये ब्रिटनपासून राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर तीन वर्षांनी मालदीव एक संवैधानिक इस्लामिक प्रजासत्ताक बनले. स्वातंत्र्यानंतर, मालदीवच्या लोकांच्या राजकारणात आणि जीवनात इस्लामला महत्त्वाचे स्थान आहे. २००८ मध्ये मालदीवमध्ये इस्लाम हा राज्य धर्म बनला. मालदीव हा जगातील सर्वांत लहान इस्लामिक देश आहे. २६ जुलै रोजी मालदीवचा साठावा स्वातंत्र्यदिन होता. या कार्यक्रमाला मोदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मोदी यांचा मालदीवचा हा तिसरा दौरा आहे. पूर्वी मालदीव सरकार 'इंडिया फर्स्ट' धोरणाचे पालन करत होते; परंतु मुईझ्झू यांनी हे धोरण संपवण्याचे आश्वासन दिले होते. मुईझ्झू यांनी चीनशी संबंध अधिक दृढ केले होते. भारताने ७.५ अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था असलेल्या मालदीवला दिवाळखोर होण्यापासून वाचवल्यानंतर मुईझ्झू यांचा भारताबद्दलचा दृष्टिकोन बदलला. मालदीव हिंदी महासागरातील प्रमुख सागरी मार्गांजवळ आहे. या मार्गांवरून आंतरराष्ट्रीय व्यापार होतो. या मार्गाने आखाती देशांमधून भारताला ऊर्जा पुरवली जाते. अशा परिस्थितीत मालदीवशी भारताचे बिघडणारे संबंध कोणत्याही प्रकारे चांगले मानले जात नव्हते. भारताच्या आर्थिक आणि धोरणात्मक हितसंबंधांसाठी हा मार्ग खूप महत्त्वाचा आहे. मालदीवशी चांगले संबंध भारताची ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करतात.

भारताच्या सागरी देखरेखीमध्येही मालदीवचे सहकार्य तितकेच महत्त्वाचे आहे. मालदीव हे भारताच्या लक्षद्वीपपासून सुमारे ७०० किलोमीटर आणि भारताच्या मुख्य भूमीपासून १२०० किलोमीटर अंतरावर आहे. चीनने मालदीवमध्ये नौदल तळ बांधणे भारतासाठी सुरक्षेचे आव्हान निर्माण करते. चीन जगात बलवान झाला, तर युद्धसदृश परिस्थितीत भारतापर्यंत पोहोचणे त्याच्यासाठी खूप सोपे होईल. मालदीवमध्ये चीनचे अनेक प्रकल्प आहेत. अशा परिस्थितीत भारताने सतर्क राहणे आवश्यक आहे. मालदीवचे जनमत अजूनही भारताविरुद्ध आहे. असे असले, तरी भारताने मालदीवच्या अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली आहे. यापैकी 'ग्रेटर माले कनेक्टिव्हिटी' प्रकल्प हा चीनला टक्कर देण्याचा एक मार्ग म्हणून पाहिला जातो. चीन मालदीवमध्ये २०० दशलक्ष डॉलर्सचा चीन-मालदीव मैत्री पूल बांधत आहे. मालदीवमध्ये चीनची वाढती उपस्थिती भारताच्या सुरक्षेसाठी धोका असल्याचे अनेक विश्लेषकांचे मत आहे. मालदीवने माले विमानतळाजवळील एक बेट चार दशलक्ष डॉलर्समध्ये चीनला ५० वर्षांसाठी भाड्याने दिले. चीन 'बेल्ट अँण्ड रोड इनिशिएटिव्ह' उपक्रमांतर्गत हिंद महासागरात आपली उपस्थिती वाढवत आहे आणि त्यासाठी मालदीवमध्ये अनेक प्रकल्पांवर काम करत आहे. दोन वर्षांपूर्वी 'क्विट इंडिया' धोरण राबवणाऱ्या, भारतीय सैन्याला 'चले जाव' म्हणणाऱ्या मालदीवने आता 'इंडिया फर्स्ट' धोरण जाहीर केले आहे.

भारत आणि चीन या दोन्ही राष्ट्रांसाठी मालदीवचे भू-राजकीय स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. चीनने मदत देऊनही मालदीवला पुन्हा भारताशी मैत्री करावी का लागली, याचे उत्तर अर्थकारणात आहे. मोदी आणि मोईझ्झू यांच्या भेटीत संरक्षण आणि सागरी सुरक्षेसह इतर अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत सहकार्य मजबूत करण्याबाबत व्यापक चर्चा झाली. आता भारत आणि मालदीवमधील संबंधांमध्ये एक नवीन अध्याय सुरू होईल, असे मानले जात आहे. भारताने मालदीवबद्दल संयमाची पातळी दाखवल्यानंतर आता विश्वासाची मैत्री पुढे नेण्यावर भर दिला आहे, त्यामुळे मालदीवसाठी सकारात्मक परिस्थिती निर्माण होईल.

# जाणीव सामाजिक सेवाशिल्पींची

दखल

सुरेश देव

## सामाजिक सेवाशिल्पी पुरस्काराच्या निमित्ताने...

धरमपेठ शिक्षण संस्थेचा वर्धापन दिवस ३ ऑगस्टला संपन्न होतोय. संस्थेचे संस्थापक कै. आप्पासाहेब फाटक यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, ध्येयासक्त वृत्तीने ही शिक्षण संस्था छोट्याशा स्वरूपात सुरू केली. पुढे, नि:स्पृह वृत्तीने व शैक्षणिक सेवाभावाने अनेक धुरिणांनी ही संस्था मोठी केली. शिक्षण हे एक सामाजिक ऋण आहे. ती एक सामाजिक, शैक्षणिक गुंतवणूक आहे. म्हणूनच ही संस्था वर्धापन दिवस हा 'सामाजिक जाणीव दिवस' म्हणून साजरा करते. सेवाभावी वृत्तीने शैक्षणिक सेवा करताना असे लक्षात येते की समाजातही अशाच निरपेक्ष भावनेने दुर्बल घटकांची, वंचितांची, गोरगरीब जनतेची सेवा करणाऱ्या काही संस्था, काही महानुभाव आहेत. विदर्भाच्या कानाकोपऱ्यात ग्रामीण भागांत, आदिवासी, भटके विमुक्त, गोंड, भिल्ल, कोरकू, पारधी अशा कितीतरी मागासलेल्या, अशिक्षित जाती जमातीचे बांधव, दुर्लक्षित, दुय्यम दर्जाचे जीवन जगत असतात. या दुर्लक्षित गोरगरिबांची सेवा करून त्यांच्या सामाजिक समस्या सोडविण्याचे, अथक प्रयत्न सेवाभावी वृत्तीने अशा संस्था कार्य करतात. अशा संस्था, असे महानुभाव हे खऱ्या अर्थाने 'समाजशिल्पी' आहेत. पण ते दुर्लक्षित व प्रसिद्धिपराङ्मुख आहेत हे विशेष. अशा दुर्बल सामाजिक घटकांची सेवा करणाऱ्या या खऱ्या समाजाशिल्पींचे कार्य एका अर्थाने फार मोठे असे शैक्षणिक व समाज उभारणीचे कार्य आहे.

संस्थेचे अध्यक्ष अॅड. उल्हास औरंगाबादकरांनी हा विचार व कल्पना उचलून धरली. स्थापनादिनी अशा सेवाभावी संस्थांना, 'सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार' द्यावा असा प्रस्ताव ठेवला. विदर्भातील अशा सेवाभावी संस्थेचा गौरव करावा, असा मनोदय त्यांनी कार्यकारिणीसमोर ठेवला. कार्यकारिणीने शुभस्य शीघ्रम या गतीने, हा स्तुत्य उपक्रम सुरू केला. पुरस्कार समिती, निवड प्रक्रिया, प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देणे, संस्थांशी संवाद साधणे, सगळ्याच बाबी कार्यान्वित होत गेल्या. आजवर संस्थेने तीन समाजशिल्पी पुरस्कार दिलेले आहेत.

सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार पहिल्या वर्षी, भंडारा जिल्ह्यातील भटके-विमुक्त-संस्था यांना प्रदान करण्यात आला. गावकुसाबाहेर पारधी बेड्यावर राहणाऱ्या, भटक्या जमातीतील वंचितांची सेवा करणाऱ्या, या संस्थेने भटक्या विमुक्त समाजाची मुख्य समस्या-त्यांना या देशाचे 'नागरिकत्व मिळवून देणे', यापासून ते शैक्षणिक-सामाजिक प्रश्नांना हात घालणे, इत्यादी कार्य केलेले आहे. अत्यंत दुरवस्थेत, दुर्लक्षित वस्त्यांमध्ये सुद्धा संस्थेने चालवलेली 'संस्कार शाळा' इथे बघून आपण थक्क होतो. असेच कार्य, यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा ग्रामीण भागात एक 'आदिवासी संस्था' करतेय. या भागात व्यसनाधीनता, कुमारी मातांचा प्रश्न, अंधश्रद्धा, बेरोजगारीचा प्रश्न, मोठ्या प्रमाणात आहे. प्रस्तुत संस्थेने हे प्रश्न हाताळताना, महिलांच्या व बालकांच्या समस्या खूप प्रयत्नपूर्वक सेवाभावाने हाताळल्या. दुसऱ्या वर्षीचा पुरस्कार आम्ही त्यांना प्रदान केला, तर तिसऱ्या वर्षी गडचिरोली भागातील एटापल्ली भागातील एक सेवा प्रकल्पाला पुरस्कार देण्यात आला. याही भागात कोरकू पारधी, आदिवासींच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. तिथे ही संस्था शिक्षण, आरोग्याच्या सेवासुविधा, पुरविण्याचे विविध प्रकल्प राबविण्याचे खरोखरीच स्पृहणीय कार्य करतेय.

यावर्षी, सामाजिक सेवाशिल्पी पुरस्कार अकोला व बुलढाणा क्षेत्रातील सामाजिक संस्थेला द्यावा हा मनोदय होता. त्यानुसार शोधकार्य करताना, दोन संस्थांचे शैक्षणिक-सामाजिक कार्य पुरस्कार समितीला भावले.

अकोला जिल्ह्यातील, गायगाव येथील कस्तुरी सेवा प्रकल्पाला तसेच बुलढाणा जिल्ह्यातील जामोद येथील वनवासी सेवा समितीला सेवाशिल्पी पुरस्कार यंदा घोषित करण्यात आला आहे. प्रस्तुत पुरस्कार रोख राशी, एक लाख रुपये, सन्मान चिन्हांसह, संस्थेच्या वर्धापन दिनी ३ ऑगस्टला देण्यात येईल. रा. स्व. संघाचे अ. भा. कार्यकारिणी सदस्य मा. श्री. भय्याजी जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार सन्मान दिला जाणार आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील, जामोद येथील वनवासी सेवासमितीची आश्रम शाळा ही २२ खेड्यांतील आदिवासी भिल्ल समाजाच्या जवळपास १०८ मुलांना शैक्षणिक संस्कार नि:स्पृहपणे देत आहे. सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी ही खेडी व ही आश्रमशाळा आहे. वनराई, जंगल झुडपं, विदर्भाच्या कोपऱ्यात या दुर्लक्षित भागात पण स्वाभिमानाने काम करणारी ही संस्था, सरकारी अनुदान न घेता स्वआश्रयाने प्रतिकूल परिस्थितीत वाटचाल करतेय.

या भागात भिल्ल, कोरकू समाजाचे दारिद्र्य, दैन्य व अशिक्षितपणाचा फायदा घेऊन, इथे 'धर्मांतरणांची समस्या' उग्र झाली आहे. पण जनजागृती करून, शैक्षणिक सेवा, रुग्णसेवा देऊन, तसेच लोकप्रबोधन करून, वनवासी सेवा आश्रम समितीने 'घरवापसीचा' कार्यक्रम जोरकसपणे राबविला. तेथील धर्मांतरण थांबविले! खरे तर या संस्थेला खूप आर्थिक, सामाजिक मदतीची मोठी गरज आहे. आमच्या संस्थेने हे कार्य लक्षात घेऊन, हा एक लाखाचा अल्पसा : सेवाशिल्पी पुरस्कार त्यांना सहर्ष घोषित केलाय.

अकोला जिल्ह्यातील- 'कस्तुरी-प्रकल्प' हा आध्यात्मिक प्रेरणेतून उभा झालाय. श्रद्धा, धार्मिक भावनांमधून, सेवाभावी वृत्तीने सामाजिक कार्य सुद्धा कसे घडते, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे 'कस्तुरी प्रकल्प'. शेगावचे संतश्रेष्ठ गजानन महाराज ही या संस्थेची श्रद्धा. यामुळे गजानन महाराज मंदिर व सेवा उपक्रम इथे उभा झालाय. शेगावची पंढरीची पायदळ वारी इथे थांबते. शेकडो वारकऱ्यांची इथे 'सेवा' म्हणून 'विसावा' व्यवस्था आहे. तसेच विदर्भातील शेगावला पायदळ वारी करणाऱ्यांचीही इथे सोय होते.

या संस्थेने, आम्हाला सातपुडा पर्वताच्या कुशीत लहानशा आदिवासी गावी - 'चिपी' येथे आदिवासी संस्कृतीची, गरिबीचे, उपेक्षितांचे दर्शन घडविले! गजानन महाराजांचे शिष्य भास्कर पाटील ज्या 'आडगावी' समाधीस्थ झाले, त्या जंगलातील, रमणीय वनराईतील हे छोटेसे गाव! इथे आदिवासी बांधवांनी नृत्य सादर करत आमचे स्वागत केले. पारंपरिक पद्धतीने औक्षण करून आतिथ्य केले. पुढे ग्रामदेवतेची पूजा, बालगोपालांनी केलेली समाज-प्रार्थना, तसेच गावकऱ्यांचे अठराविश्व दारिद्र्य सगळेच मनाला हेलावून टाकणारे तसेच भारावून टाकणारे होते! अत्यंत कृतार्थ नजरेने आम्ही सर्व सेवाकार्य अनुभवत होतो. खऱ्या अर्थाने कार्य करणाऱ्या समाज 'सेवाशिल्पींची' जाणीव आता इथे प्रखरपणे मुखर होत होती. खरोखरीच, अशा सेवाभावी संस्थांना दिलेला पुरस्कार आता 'औचित्यपूर्ण' वाटत होता...!

सचिव, धरमपेठ शिक्षण संस्था

# २५ टक्के शुल्काचे उत्तर : आत्मनिर्भर भारताचे जागतिक गान

प्रासंगिक

श्याम जाजू : माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष (भाजपा)

३० जुलै २०२५ अमेरिकेचे अध्यक्ष श्री. डोनाल्ड ट्रम्प यांनी एका आश्चर्यकारक घोषणेत भारतातील जवळजवळ सर्व आयातीवर २५% कर लादण्याची घोषणा केली आहे. या करांमध्ये भारतातील सर्वात महत्वाच्या निर्यात वस्तू जसे की औषधे (विशेषतः जेनेरिक औषधे), कापड, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, ऑटो पार्ट्स, फार्मास्युटिकल एपीआय आणि औद्योगिक यंत्रसामग्री यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, ट्रम्प प्रशासनाने असेही सूचित केले आहे की जर भारताने रशियाकडून तेल आणि शस्त्रे खरेदी करणे सुरू ठेवले तर त्याला अधिकचा म्हणजे अतिरिक्त दंडात्मक कर लादला जाईल. हे धोरण केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नाही तर भू-राजकीय, राजनैतिक आणि धोरणात्मक दृष्टिकोनातून देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारत आणि अमेरिकेतील संबंध अधिक दृढ झाले आहेत. मग ते संरक्षण करार असोत, तांत्रिक सहकार्य असोत किंवा क्वाडसारखे बहुपक्षीय मंच असोत. अशा परिस्थितीत, ट्रम्पचे हे धोरण अचानक एका अनपेक्षित वळणाचे संकेत देते, जे केवळ व्यापार संबंधांवरच नव्हे तर संपूर्ण जागतिक संतुलनावर परिणाम करू शकते.

**ट्रम्पची निवडणूक रणनीती आणि ' अमेरिका फर्स्ट ' चे पुनरागमन**

२०२५ च्या निवडणुकीच्या हंगामात डोनाल्ड ट्रम्प पुन्हा एकदा त्यांचे प्रसिद्ध पण वादग्रस्त अमेरिका फर्स्ट हे घोषवाक्य वापरात होते. ट्रम्प यांनी अमेरिकेचे धोरण केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यांचा असा दावा आहे की परदेशी उत्पादनांवर जास्त कर लादल्याने अमेरिकन कंपन्यांचे संरक्षण होईल, देशात नोकऱ्या परत येतील आणि देशांतर्गत उत्पादन वाढेल. ट्रम्प यांच्या मते, भारतासारख्या देशांमधून स्वस्त आयात अमेरिकेच्या उत्पादन उद्योगाला हानी पोहोचवत आहे. त्यांच्या निवडणूक आश्वासनांमध्ये, ट्रम्प यांनी पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय व्यापार करारांचा आढावा घेण्याबद्दल, चीन आणि भारतासारख्या देशांवर कारवाई करण्याबद्दल आणि अमेरिकेत पुनर्औद्योगीकरण करण्याबद्दल बोलत होते. ट्रम्प यांनी असेही म्हटले की अमेरिका यापुढे मोफत जेवण देणार नाही आणि प्रत्येक मित्र देशाला 'cost-benefit' च्या आधाराने वागणूक दिली जाईल. म्हणूनच भारतासारखे सहयोगी देश, ज्यांनी रशियाकडून ऊर्जा आणि संरक्षण उपकरणे खरेदी केली आहेत, ते आता ट्रम्प तात्यांच्या रडारवर आहेत.

**आंतरराष्ट्रीय संदर्भ आणि भू-राजकीय संदेश**



हा निर्णय केवळ भारतासाठीच नाही तर इतर अमेरिकन भागीदारांसाठी देखील धमकीवजा संकेत आहे. ट्रम्प प्रत्यक्षात एक व्यापक भू-राजकीय संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहेत की जर एखादा देश अमेरिकेच्या धोरणात्मक प्राधान्यांविरुद्ध गेला, जसे की रशियाशी व्यापार, तर त्याला आर्थिकदृष्ट्या शिक्षा होऊ शकते. हे धोरण अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पारंपारिक उदारमतवादी आंतरराष्ट्रीय व्यवस्थेविरुद्ध ((liberal world order) आहे. युक्रेन युद्ध, चीन-तैवान तणाव आणि जागतिक आर्थिक मंदी यासारख्या आव्हानांमुळे जगभरात अनिश्चितता पसरत असताना ट्रम्प यांचे हे पाऊल उचलण्यात आले आहे. अशा परिस्थितीत, भारतावर शुल्क आणि दंडात्मक कर लादण्याचा ट्रम्प यांचा निर्णय एकतर्फी मानता येणार नाही; तो अमेरिकेच्या भू-राजकीय पुनर्रचनेकडे (realignment) देखील निर्देश करतो .

**नोबेल पारितोषिकाचे आकर्षण आणि त्याची युद्ध-प्रतिबंधक प्रतिमा**

मनोरंजक म्हणजे, यावेळी ट्रम्प स्वतःला शांतता-दूत म्हणत आहेत. निवडणुकांमध्ये जर ते सत्तेत परतले तर ते २४ तासांच्या आत रशिया-युक्रेन युद्ध थांबवतील असा दावा त्यांनी होता, काय झाले आपणास ठाऊक आहेच ! अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी असाच भारत-पाक समेट करण्याचा केलेला दावा सुद्धा संसदेत भारताने स्पष्टपणे फेटाळून लावला आहे. हा केवळ नकार नव्हता, तर तो भारताच्या सार्वभौमत्वाची आणि राजनैतिक तत्त्वांच्या दृढतेची घोषणा होती, महासत्ता कोणीही असो, भारत आपल्या भूमिकेपासून हटणार नाही. त्याचप्रमाणे, त्यांनी चीन आणि तैवानमधील तणाव कमी करण्यासाठी हस्तक्षेप करण्याचे संकेत देखील दिले आहेत. हे सर्व नोबेल शांतता पुरस्कार मिळविण्याच्या आकांक्षेशी देखील जोडलेले आहे, ज्याचा ट्रम्प यांनी अनेक वेळा जाहीरपणे उल्लेख केला आहे. या पार्श्वभूमीवर, भारतासारख्या देशांवर कर लादण्याचा आणि रशियासोबतच्या व्यापारावर दंड आकारण्याचा ट्रम्पचा निर्णय हा त्यांची ती प्रतिमा मजबूत करण्याचा प्रयत्न आहे. त्यांची रणनीती स्पष्ट आहे. अमेरिकेच्या आर्थिक हितसंबंधांच्या नावाखाली देशांतर्गत जनमत एकत्र करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एक निर्णायक नेता म्हणून पुनरागमन करणे !

**अमेरिकेतील अस्वस्थ जनमत आणि परराष्ट्र धोरणाचे राजकीयीकरण**

सध्या अंतर्गत सामाजिक, आर्थिक आणि राजकीय आव्हानांना तोंड देत आहे. पराकोटीची महागाई, बेरोजगारी, OPOED साथीचे रोग आणि राजकीय ध्रुवीकरण यासारख्या समस्यांमुळे सामान्य अमेरिकन नागरिकाचा सरकार आणि जागतिकीकरणावरील विश्वास उडत आहे. अशा परिस्थितीत, ट्रम्पसारखे नेते बळीचा बकरा बनवणे सारख्या क्लुप्त्या वापरून जनमत स्वतः कडे आकर्षित करू इच्छितात आणि भारत आणि चीनसारखे देश त्या धोरणाचा भाग बनतात. तंत्रज्ञान, औद्योगिक आणि संरक्षण क्षेत्रात अमेरिकेचे धोरणात्मक सहयोगी असलेल्या भारतासारख्या लोकशाही देशांबद्दल ट्रम्प यांचा दृष्टिकोन, केवळ व्यापार तुटीच्या दृष्टिकोनातून, हे दर्शविते की अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आता धोरणात्मक स्थिरतेपेक्षा अंतर्गत राजकारणाने चालवले जात आहे. हा एक धोकादायक ट्रेंड आहे, जो येत्या काळात ग्लोबल साउथमधील देशांसाठी एक मोठे आव्हान बनू शकतो.

**इतिहासाची पुनरावृत्ती - १९९८ च्या निर्बंधांच्या युगाचे पुनरागमन आहे का ?**

१९९८ मध्ये, भारताने पोखरण -२ अणुचाचण्या केल्या, ही घटना भारताच्या अणुचाचण्यांनंतर अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांशी संबंधित आहे. ही भारताच्या धोरणात्मक स्वातंत्र्याची घोषणा होती, परंतु पाश्चात्य देशांनी, विशेषतः अमेरिकेने, ते त्यांच्या जागतिक धोरणाच्या विरुद्ध मानले आणि भारतावर कठोर आर्थिक, संरक्षण आणि तांत्रिक निर्बंध लादले. भारताला लष्करी सहकार्य, अंतराळ तंत्रज्ञान, उच्च-तंत्रज्ञान उपकरणे आणि अगदी परदेशी मदतीपासून बंदी घालण्यात आली. त्यावेळीही अमेरिकेने भारतावर एकतर्फी आर्थिक आणि लष्करी निर्बंध लादले होते, परंतु त्याचा परिणाम असा झाला की भारताने स्वावलंबनाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले. त्या काळात आयटी क्रांती, संरक्षण संशोधनातील नवोपक्रम आणि धोरणात्मक स्वावलंबनाचा पाया घातला गेला. ट्रम्प यांनी जाहीर केलेला हा नवीन टॅरिफ आणि पेनल्टी कर हा '१९९८ सारखाच संधी देणारा एक नवीन क्षण आहे. हा असा क्षण असू शकतो जिथे भारताला स्वतःचा आर्थिक, तांत्रिक आणि धोरणात्मक मार्ग स्वतः च्या शर्तीनुसार पार पाडण्याची जणू सुवर्ण संधीच!

संकटात स्वावलंबनाचा जन्म : जेव्हा अमेरिकेने Cray XMP सुपर कॉम्प्युटर देण्यास नकार दिला, तेव्हा भारताने स्वतःचा सुपर कॉम्प्युटर विकसित करण्याची योजना आखली. अशा प्रकारे त्याचा जन्म झाला. सी-डॅक (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ अॅडव्हान्स्ड कम्प्युटिंग) पहिला स्वदेशी सुपर कॉम्प्युटर झठ्च् ८००० विकसित केला. आणि १ GFLOPS (Gigaflops) चा वेग मिळवणारा तो आशियातील पहिला सुपर कॉम्प्युटर बनला. ही केवळ तंत्रज्ञानात स्वावलंबनाची सुरुवात नव्हती तर लोकांमध्ये भारत हे करू शकतो असा विश्वास निर्माण झाला .

**निर्बंधांमुळे भारताला संरक्षण आणि विज्ञानात स्वावलंबत्व गाठता आले:**

तेजस लढाऊ विमान, ब्रह्मोस क्षेपणास्त्र आणि अर्जुन टँकसारखे प्रकल्प वेगाने पुढे सरकले ज्यामुळे भारतीय सैन्य मजबूत झाले. इस्रो PSLV सारख्या प्रक्षेपण वाहनांमध्ये स्वावलंबीता मिळवली आणि चांद्रयान सारख्या मोहिमांचा पाया रचला. एचएएल, बीईएल अशा संस्थांनी देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला चालना दिली.

**औषध आणि आयटी क्रांतीची सुरुवात :** पाश्चात्य औषध कंपन्यांकडून पुरवठा कपातीच्या भीतीमुळे, भारत सामान्य औषध निर्मिती वाढलेली गुंतवणूक. परिणामी, आज भारत जगातील फार्मसी हब आहे. जगातील ६०% लसी भारतात बनवल्या जातात. त्याच वेळी, भारताच्या सॉफ्टवेअर निर्यात क्षमता वेगाने वाढल्या. इन्फोसिस, विप्रो, टीसीएस अशा कंपन्यांनी जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण केले. अमेरिकेने तंत्रज्ञान निर्बंध लादले असूनही, भारतीय कंपन्या सिलिकॉन व्हॅलीचा कणा बनल्या.

**लोकांच्या मनात आत्मविश्वास :** १९९८ च्या निर्बंधांमुळे भारतीयांच्या मनात पर्याय शोधण्याची आणि स्वीकारण्याची मानसिकता निर्माण झाली. महाविद्यालयांमधील संशोधनाला चालना मिळाली, आयआयटी आणि आयआयएससी सारख्या संस्था नवोपक्रमाची केंद्रे बनल्या. लोकांना जाणवले की क्षमतेवर विश्वास ठेवा,कृपेवर नाही . २०२५ मध्ये पुन्हा एकदा अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते का? आता ट्रम्प प्रशासन भारतावर २५% कर आणि रशियन व्यापारावर दंडात्मक कर लादण्याबद्दल बोलत आहे, ते १९९८ च्या आर्थिक अलिप्तता (Economic Isolation) चे प्रतिनिधित्व करते. फरक एवढाच आहे की आज भारत अधिक सक्षम, समर्थ आणि स्वावलंबी आहे.

**एक तुलनात्मक दृष्टिकोन :**

इतिहासाची उजळणी - १९९८ विरुद्ध २०२५ पैलू १९९८ २०२५ कारण पोखरण अणुचाचणी भारत-रशिया व्यापार, जागतिक दक्षिण उदय आणि अमेरिकेचे धोरणात्मक लक्ष स्वातंत्र्यामुळे निर्माण होणारे असंतुलन अमेरिकन प्रतिसाद लष्करी आणि आर्थिक निर्बंध; तांत्रिक आणि संरक्षण सहकार्य थांबले. व्यापार तूट उद्धृत करून २५% आयात शुल्क + दंडात्मक कर भारताची आर्थिक स्थिती ४२० अब्ज जीडीपी; मर्यादित परदेशी गुंतवणूक; संशोधन सुरुवातीच्या टप्प्यात मध्ये ४.१९ ट्रिलियन जीडीपी; जगातील चौथ्या क्रमांकाची, स्वावलंबी भारत मोहीम प्रगतीपथावर आहे.

जागतिक आघाडी मर्यादित; Non-ligned Movement पुरते मर्यादित BRICS+, Global South, I2U2, QUD, SCO, Indo-Pacific नेटवर्क प्रतिसाद डीआरडीओ, इस्रो, एचएएल सारख्या संस्थांचा विकास; देशांतर्गत उद्योग प्रोत्साहन DPI, ONDC, RuPay, UPI सारखे प्लेटफॉर्म, FT पर्यायांचा शोध; निर्यातीत विविधता; एमएसएमई समर्थन निर्यात कर परिणाम औषधे, कापूस कापड, चहा आणि कृषी उत्पादनांवर अवलंबित्व अभियांत्रिकी वस्तू, औषधे, रत्ने आणि दागिने, आयटी सेवा, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्राची भूमिका सरकारच्या नेतृत्वाखालील प्रयत्न; खाजगी गुंतवणूक मर्यादित धोरण + नवोन्मेष; अनेक खाजगी उद्योग आणि स्टार्टअप्स स्वावलंबनात भागीदार आहेत तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रतिसाद वैज्ञानिक स्वदेशीकरणाचा पाया घातला गेला सेमीकंडक्टर मिशन, डिजिटल इंडिया, क्वांटम आणि एआय मध्ये भारताची वाढ स्वतंत्र रणनीती विकसित निकाल २००० च्या दशकात आयटी आणि अवकाश क्षेत्राचा उदय; संतुलित परराष्ट्र धोरण स्वावलंबनाच्या पुढील टप्प्यात प्रवेश; भारत एक जागतिक पर्याय बनत आहे पुरवठा केंद्र म्हणून उदयास येत आहे.

दीर्घकालीन दिशा सुरक्षा-आधारित तांत्रिक विकास आर्थिक-तांत्रिक सार्वभौमत्व, ज्ञानाधारित निर्यात जागतिक भागीदारीत नेतृत्व व पुनर्रचना प्रमुख आर्थिक क्षेत्रांमध्ये भारताची रणनीती आणि संभावना २५% कर हा एक गंभीर आर्थिक आव्हान म्हणून उदयास आला आहे. जर हा प्रस्ताव लागू झाला तर त्याचा भारताच्या निर्यात उद्योगांवर विशेषतः कापड, आयटी हार्डवेअर, औषधनिर्माण आणि ऑटो पार्ट्स यासारख्या क्षेत्रांवर थेट परिणाम होईल. परंतु या संकटात एक अभूतपूर्व संधी लपलेली आहे जी स्वावलंबी भारताची पहाट, तंत्रज्ञान क्षेत्रातील आपले नेतृत्व आणि जागतिक व्यापारातील नवीन धोरणांची सुरुवात करू शकते. निर्बंध आपल्याला तोडत नाहीत, तर ते आपल्याला एक नवीन दिशा देण्याचे काम करतात. ट्रम्पचे शुल्क हे एक महत्त्वाचे वळण ठरू शकतात. (क्रमशः)

# वडवळमध्ये तीन वर्षाच्या मुलीचा सावत्र आईने केला खून

## सावत्र आईला केली अटक

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२ ऑगस्ट-**

तीन वर्षाच्या मुलीचा सावत्र आईने गळा दाबून खून केल्याची घटना वडवळ (ता. मोहोळ) येथे घडली. याप्रकरणी सावत्र आईला अटक करण्यात आली आहे

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागेश कोकणे (रा. सोलापूर) हे वडवळ येथे किर्ती, आकृती व दुसरी पत्नी तेजस्विनी (वय - ३३ वर्षे) यांच्या समावेत विष्णू नरूटे यांच्या भाड्याच्या घरात राहतात. १ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजण्याच्यापूर्वी किर्तीचा सावत्र आई तेजस्विनी हिने गळा दाबून खून केला. तसेच यापूर्वी अन्न न खाणे किंवा शाळेत न जाणे या कारणांवरून सावत्र आई तेजस्विनी हिने किर्ती व आकृती या दोघींना मारहाण करून, चटके देऊन जखमी करत छळ केला होता. याप्रकरणी तेजस्विनी कोकणे हिच्या विरोधात महिला पोलीस कर्मचारी अश्विनी सतीश घोलप यांनी रात्री उशिरा मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोसई कर्णेवाड करीत आहेत.

> घटनेचे गांभीर्य ओळखून सदर मृत मुलीचे प्रेत शवविच्छेदनासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले असून या प्रकरणातील सावत्र आईला अटक केली आहे. अधिक तपास सुरू आहे.
>
> **- हेमंत शेडगे, पोलीस निरीक्षक, मोहोळ**

# बनावट नोटाप्रकरणी सात आरोपींना सक्त मजुरी

## बार्शी जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ ऑगस्ट-**

बार्शी येथील बनावट नोटप्रकरणी सात आरोपींना अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश विक्रमादित्य मांडे यांनी सक्तमजुरीची शिक्षा सुनावली आहे. यामध्ये आरोपी सुनिल कोथिंबीरे, आदित्य सातभाई यांना सात वर्षाची शिक्षा व दोन हजार रुपये दंड, आरोपी खादीर शेख, विजय वाघमारे, नितीन बगाडे, जमीर सय्यद यांना ७ वर्षाची शिक्षा व दोन हजार रुपये दंड तसेच आरोपी ललित होरा याला १० वर्षाची शिक्षा व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनवण्यात आली आहे.

बार्शी येथील तेलगिरणी चौक येथे दि. १९ जुलै २०२३ रोजी सुनिल कोथिंबीरे व आदित्य सातभाई हे दोघे बनावट नोटा खपविण्यासाठी आल्याचे बार्शी शहर पोलीस स्टेशन यांना माहिती मिळाली. त्या आधारे वरील आरोपी यांना तेलगिरणी चौक बार्शी येथे बनावट नोटासह पकडण्यात आले. त्याआधारे बार्शी शहर पोलीस स्टेशन यांनी दि. २० जुलै २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन आरोपींकडून इतर तीन आरोपी खादील शेख, विजय वाघमारे, ललित होरा, नितीन बगाडे व जमीर सय्यद हे या बनावट नोटामध्ये सामील असल्याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी खादील शेख व विजय वाघमारे यांना परळी येथून ताब्यात घेतले व ललित होरा व नितीन बगाडे यांना चिंचोली काटी, (ता. मोहोळ) येथील त्याच्या घरातून बनावट नोटाचा मोठ्या प्रमाणात साठा तसेच प्रिंटर, बनावट नोटा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे कागद नोटासाठी लागणारे इतर साहित्य जप्त करण्यात आले. त्याच्या आधारे त्यांना आरोपी करण्यात आले. तसेच सदर तपासामध्ये आरोपीकडे बनावट नोटा आढळून आल्या. सदर बनावट नोटा नाशिक येथील मुख्य प्रबंधक करन्सी नोट यांचेकडे तपासणीसाठी पाठविले. त्यांचा तपासणी अहवाल कोर्टात दाखल झाला. यातील आरोपीकडून जप्त केलेल्या नोटा बनावट असल्याचे निष्पन्न झाले. सदर प्रकरण हे अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश विक्रमादित्य मांडे यांचे समोर चालविण्यात आले. सरकार पक्षाच्यावतीने एकूण ८ साक्षीदार तपासण्यात आले. सदर साक्षीमध्ये आरोपी नं. १ व २ यांचेकडून पंचासमक्ष ज्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. तो पंच संतोष नारायण बोकेफोडे तसेच आरोपी नं. ३ खादीर जमाल शेख, यांचेकडे आढळून आलेल्या बनावट नोटा तसेच आरोपींनी वापरण्यात आलेली गाडी यातील आरोपी नं. ५ याने दिलेले निवेदन व त्याआधारे आरोपीकडून जप्त करण्यात आलेला प्रिंटर या सर्व बाबीसाठी पंच संतोष दराडे याची साक्ष अतिशय महत्वपूर्ण ठरली. तसेच आरोपी ललित होरा याचे घरी सापडलेला बनावट नोटांचा साठा व त्या ठिकाणी नितीन बगाडे हा बनावट नोटाससह आढळून आला. त्या संदर्भाने पंच सुशांत सदाशिव शिवशरण यांची साक्ष अतिशय महत्वपूर्ण ठरली. वरील तीनही पंच हे स्वतंत्र पंच होते. त्यांचा पंचनामा या गुन्हयाकामी अतिशय महत्वपूर्ण ठरला.






तसेच साक्षीदार चंद्रकांत खामीदकर ज्यांचेकडून आरोपी नं. ५ ललित होरा यांनी प्रिंटर खरेदी घेतले. तसेच साक्षीदार क्रं. ७ दिप रहेजा त्यांचेकडून कागद खरेदी घेतले. या बाबी गुन्हा शाबीत करण्यासाठी महत्वपूर्ण ठरल्या. तसेच सर्वांत महत्वाचे म्हणजे तपासिक अधिकारी ए.पी.आय. ज्ञानेश्वर उदार यांची साक्ष अत्यंत महत्वाची ठरली. या गुन्हयाकामी आरोपींच्या ताब्यात मिळून आलेल्या बनावट नोटा तसेच नाशिक प्रेस करन्सी यांनी दिलेला रिपोर्ट या सर्व बाबी मे. कोर्टासमोर सरकारी वकील ॲड. दिनेश देशमुख यांनी नमूद केल्या. तसेच आरोपीने केलेला गुन्हा हा देशाच्या आर्थिक बाबीसाठी अपायकारक आहे आणि आरोपीने गंभीर गुन्हा केलेला आहे. ही बाब न्यायाधीश विक्रमादित्य मांडे यांचे समोर मांडण्यात आल्या तसेच सरकारी वकील यांनी केलेल्या युक्तीवादाच्या पृष्टार्थ मा.ना. उच्च न्यायालय मुंबई तसेच इतर उच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे सादर केले.

या सर्व बाबींचा विचार करुन अप्पर जिल्हा व सत्र न्यायाधीश मांडे यांनी आरोपी नं. १ सुनिल कोथिंबीरे व आरोपी नं. २ आदित्य सातभाई यांना ७ वर्षाची शिक्षा व दोन हजार रुपये दंड व आरोपी नं. ३ खादीर शेख व आरोपी नं. ४ विजय वाघमारे, आरोपी नं. ६ नितीन बगाडे, आरोपी नं. ७ जमीर सय्यद यांना ७ वर्षाची शिक्षा व दोन हजार रुपये दंड तसेच आरोपी नं. ५ ललित होरा याला १० वर्षाची शिक्षा व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनवण्यात आलेली आहे. यातील ललित होरा यास अटक केल्यापासून जेलमध्ये आहे. तसेच इतर आरोपींना जामीनावर मुक्त केलेले होते. यात सरकारी वकील म्हणून ॲड. दिनेश देशमुख, यांनी काम पाहिले, तसेच तपास अधिकारी म्हणून .झ.ख. ज्ञानेश्वर उदार, कोर्ट पैरवी म्हणून पोलीस कॉन्स्टेबल गणेश ताकभाते यांनी काम पाहिले. तसेच बार्शी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी सहकार्य केले.


**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**ई-निविदा सूचना**

**निविदा सूचना क्रमांक**
**GEM/2025/B/6505636**
**दिनांक 30/07/2025**

डीआरएम(एम)चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागवत आहे. :- कामाचे नाव आणि परिसर : सोलापूर विभागात डेपो तपासणी आणि बिघाड/असामान्य रेल्वेमार्गे जाण्यासाठी एडीएमई/सोलापूरसाठी नॉन-एसी एसयूव्ही भाड्याने घेण्याचे कंत्राट काम जेईएम द्वारे दोन वर्षांच्या कालावधीसाठी मासिक 2000 कि.मी. धावते. निविदा प्रणाली - सिंगल पॅकेट प्रणाली., कामाची अंदाजे किंमत रु. 10,32,000/-, निविदा फॉर्मची किंमत नाही, निविदा फॉर्म जिथून खरेदी करता येईल त्या कार्यालयाचा पत्ता - डीआरएम(एम)चे कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर, जमा करावयाची बयाणा रु. 26,640/-, काम पूर्ण करण्याचा कालावधी - काम सुरू झाल्यापासून 2 वर्षे. निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ 21/08/2025 रोजी सकाळी 11.00 पर्यंत, निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 21/08/2025 रोजी सकाळी 11.30 वाजता. वेबसाइट तपशील आणि सूचना फलक ठिकाण जिथे निविदेची संपूर्ण माहिती पाहता येईल - www.gem.gov.in

SUN 74 **सीनियर डीएमई / सोलापूर**

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें




# तहसीलदार सचिन लंगुटे यांचा उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते सन्मान

**पंढरपूर,दि.२ ऑगस्ट -**

राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम राबविल्याबद्दल पुणे विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पंढरपूरचे तहसिलदार सचिन लंगुटे यांचा विभागीय स्तरावर उत्कृष्ट तहसिलदार म्हणून विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे उपमुख्यमंत्री अजित पवार, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते सन्मान करणेत आला. तसेच सोलापूर जिल्यातील उत्कृष्ट खो खो खेळाडू म्हणून पंकज राठोड मंडळ अधिकारी कासेगाव तालुका पंढरपूर राष्ट्रीय व अनेक राज्य स्तरीय खो खो स्पर्धामध्ये विशेष प्राविण्य मिळवल्या बदल सन्मान यावेळी करण्यात आला.



# विश्वेश्वर बँकेस शेड्यूल्ड दर्जा; नॅफकबकडून गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २ ऑगस्ट-**

नॅफकब (NFCUB) दिल्ली यांच्यामार्फत अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक समिटमध्ये राष्ट्रीय को-ऑपरेटिव्ह सन्मान सोहळा २०२५ पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या सन्मान सोहळ्यामध्ये पुणे येथील दि विश्वेश्वर सहकारी या मल्टीस्टेट बँकेस शेड्यूल्ड दर्जा प्राप्त झाल्याबद्दल बँकेचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी बँकेच्यावतीने बँकेचे अध्यक्ष अनिलशेठ गाडवे, उपाध्यक्ष राजेंद्र मिरजे, व्यवस्थापन मंडळ सदस्य सुनिल फाटक, उप सरव्यवस्थापक राजेंद्रकुमार साठे, सहाय्यक सरव्यवस्थापक शशिकांत अमृतकर, मुख्य व्यवस्थापक राकेश कोकाटे व अधिकारी किशोर जिवंत उपस्थित होते. यानिमित्ताने बोलताना बँकेचे अध्यक्ष अनिल गाडवे यांनी सांगितले की, या वर्षाची सुरुवात बँकेला शेड्युल्ड दर्जा मिळाल्याने अतिशय उत्साहवर्धक झालेली आहे. हा दर्जा मिळणे म्हणजे बँकेच्या पारदर्शक कार्यपद्धती, विश्वासार्हता आणि उत्तम सेवा याचे फलित आहे. तसेच बँकेने नव्याने ७.५० टक्के व्याज दराची रिकरिंग ठेव योजनाही सुरु केली आहे. या योजनेचा ग्राहकांनी लाभ घ्यावा. बँकेच्या महाराष्ट्र व कर्नाटकात ३० शाखा कार्यरत आहेत. बँक नेहमीच सभासद, ठेवीदार, कर्जदार यांची काळजी घेते.


**Classifieds**

**भरतीविषयक**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासांसाठी सोलापूर शहर व MIDC योग्य पगार दिला जाईल. मो. ९७३६१२७९९९**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**


# उंदीर मारण्याचे औषध पिल्याने तरुण अत्यवस्थ

**सोलापूर :** घरगुती वादातून तरुणाने राहत्या घरात उंदीर मारण्याचे औषध पिले. यामुळे प्रशांत जगन्नाथ मोरे (वय २८, रा. जळकोट, तुळजापूर) असे रुग्णालयात दाखल केलेल्या तरूणाचे नाव आहे. ही घटना शुक्रवारी रात्री घडली. त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

# बहिणी बरोबर भांडणानंतर भावाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर :** लहान बहिणीसोबत भांडण झाल्याने भावाने शर्टच्या सहाय्याने फॅनला गळफास घेण्याचा प्रयत्न केला. अविनाश इटकर (वय १८, रा. धाराशीव) असे रुग्णालयात दाखल केलेल्या तरुणाचे नाव आहे. ही घटना सुरतगाव धाराशिव येथे घडली. ही घटना बहिणीनेच पाहिल्याने त्याला गळफासातून सोडवून उपचारासाठी तुळजापूर येथे उपचार करून शनिवारी रात्री शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# रिक्षा लावण्याच्या कारणावरून चाकूने हल्ला

**सोलापूर :** मरीआई चौकातील एका शोरूम समोर रिक्षा लावल्याच्या कारणावरून अक्षय सिध्देश्वर सरवळे (वय ३०, रा. दमाणी नगर) याला चाकूने मारले. ही घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. यात त्याच्या पाठीला, डाव्या दंडा जवळ जखम झाल्याने त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः तालुका अक्कलकोट येथील लोकांना कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर, ता. अक्कलकोट पैकी ग्रामसेवा समिती चपळगांव, ता. अक्कलकोट, जि. सोलापुर संचलित संतोषदादा पाटील मराठी विद्यालय चपळगाव, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर ही मराठी माध्यमाची शाळा मनिषा बहुउद्देशीय व ग्रामविकास संस्था चपळगाव, ता. अक्कलकोट जि. सोलापूर या संस्थेकडे हस्तांतरण ही शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रं. माशाह/२०११ (२०१०/११)/माशि/३ दिनांक १७/०२/२०१२ च्या आदेशानुसार संस्थेची व्यवस्थापन बदलाकरिता दोन्ही संस्थाचे ठराव, संस्था करारपत्र, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद सोलापूर यांचे शिफारशीनुसार माध्यमिक शाळा संहिता (सुधारीत आवृत्ती १९८६) मधील नियम १२.४ नुसार शाळेच्या व्यवस्थापन बदलास परवानगी मिळालेली आहे.

तरी परंतु सदर संस्थेच्या व्यवस्थापन बदलासंदर्भात वर नमुद संस्थेच्या शाळा परिसरातील नागरिक, संबंधित शाळेचे विद्यार्थी व त्यांचे पालक, संबंधित शाळेचे शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी, परिसरातील इतर शाळा यांनी उक्त व्यवस्थापन बदलाबाबत आपल्या हरकती व सूचना संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यलयाकडे सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास उपरोक्त नमुद संस्थेच्या व्यवस्थापन बदलाबाबत कोणाचाही कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून संस्थेचे व्यवस्थापनात बदल करतील. तद्नंतर मात्र कुणाचेही कसलीही तक्रार व हरकत चालणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ही जाहिर नोटीस दिली ता. २६/०७/२०२५

**सही/-**
**श्रीधर गोविंद मागनूर**
**ॲडव्होकेट नोटरी (भारत सरकार)**
**पत्ता - प्लॉट नं.३०, बालाजी विला सोसायटी, गांधी नगर, विडी घरकुल रोड सोलापूर .मो. ९९२३५९२८५१**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः रातंजन, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे रातंजन हद्दीतील शेतजमीन **१)** गट नं. १७२/१ क्षेत्र १ हे.८२ आर, **२)** गट नं. १७२/२ क्षेत्र ० हे. ९१ आर, **३)** गट नं. १७२/३ क्षेत्र ० हे.९२ आर याच्या एकत्रित **चतुःसिमा :- पुर्वेस** - तानाजी गजभरे यांची जमीन, **पश्चिमेस** - अभिषेक वैद्य यांची जमीन, **दक्षिणेस** - अभिषेक वैद्य यांची जमीन व **उत्तरेस** - कृष्णा गजभरे यांची जमीन येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमीन आतील सर्व झाडझुडूपे वगैरे तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीनी ह्या बालाजी अजय गजभरे, राहुल हरिचंद्र गजभरे, वैभव गोपीचंद गजभरे यांच्या मालकीच्या असून वरील जमीनीच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कामध्ये सज्जनराव जयवंतराव देशमुख कुळ अशी नोंद आहे. परंतु त्यांचा वर नमूद मिळकतीशी काहीही संबंध, ताबा नाही. ते आमच्या अशिलाच्या कुटूंबाशी संबंधित नाहीत. त्यांचे सदर मिळकतीत कधीही कब्जेवहिवाट नव्हती व नाही. त्यामुळे सदर नोंदी पोकळ स्वरुपाची असल्याने ती कमी होऊन मिळणेकामी आमच्या अशिलांनी अर्ज दिलेला आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद सज्जनराव जयवंतराव देशमुख कुळ या नावासंदर्भात अगर त्यांचे कोणी वाली वारस असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ दिवसात आमचे खालील पत्यावर कागदोपत्री समक्ष भेटून हरकत द्यावी. अन्यथा इतर अधिकारातील नोंद कमी करण्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून नोंद कमी करण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येईल. कोणाचीही फसगत होवू न नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे. ता. ०१/०८/२०२५

**सही/-**
**श्री. लक्ष्मीकांव सिध्देश्वर झाडे**
**ॲडव्होकेट**
**२२०९/३८, सिध्देश्वर निवास, गणेश नगर, माढा रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



**SVSPM'S**

**Vishweshwarayya Institute Of Engineering And Technology, Almala, Tq. Ausa, Dist. Latur**

Approved by A.I.C.T.E. New Delhi, Recognized by Govt. of Maharashtra, Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Technological University, Lonere

**Applications are invited from the eligble candidates for institute Level seats and Vacancies created after the CAP round Admission 2025-26**

मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे प्रथमवर्ष पदवीका दि. २६/०६/२०२५ व थेट द्वितीय वर्ष पदवीका अभ्यासक्रम प्रवेश दिनांक ०२/०७/२०२५ वेळापत्रक नुसार तसेच मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई कार्यालयीन पत्र क्रं. प्रथमवर्ष पदवी अभियांत्रिकी दि. २३/०७/२०२५ च्या वेळापत्रकानुसार, संस्थास्तरावरील रिक्त जागांसाठी व केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहणाऱ्या जागांसाठी प्रवेश नोंदणी अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी सदरील रिक्त जागेवर प्रवेश घेण्यास इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या वेळेत महाविद्यालयात प्रत्यक्ष येऊन अर्ज सादर करावा.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | अर्ज मागविण्याचा कालावधी | | प्रवेश दिनांक | संस्थास्तरावरील जागा / केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त जागा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रथमवर्ष अभियांत्रिकी पदवी | ०३/०८/२०२५ | ०१/०९/२०२५ | ०६/०९/२०२५ ते १३/०९/२०२५ | CSE IDS -6 व तसेच केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त जागेवर प्रवेश |
| २ | प्रथमवर्ष अभियांत्रिकी पदवीका (पॉलीटेक्नीक) | ०३/०८/२०२५ | ०५/०८/२०२५ | ०९/०८/२०२५ ते १४/०८/२०२५ | CO-12 IF-6 व तसेच केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त जागेवर प्रवेश |
| ३ | थेट द्वितीयवर्ष पदवीका अभियांत्रिकी (पॉलीटेक्नीक) | ०३/०८/२०२५ | ०७/०८/२०२५ | १०/०८/२०२५ ते १४/०८/२०२५ | केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त जागेवर प्रवेश |

Applications are invited from the eligble candidates for institute Level seats and Vacancies created after the CAP round Admission to "First Year Diploma, Direct Second Year Diploma First Year B.Tech."

# Eligibility Criteria : As Specified in the Admisson Brochure issued by DTE / CETCELL.

For detailed information and schedule kindly visit our college web site www.vapmalmala.in.

Principal



**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**साहित्य खरेदी**

मध्य रेल्वे, सोलापूर विभागीय भांडार कार्यालय भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे:

**निविदा क्रमांक : 9625WLD04**

| अ. क्र. | पीएल कोड (गट) | वस्तू प्रकार जीएसटी (Y /N) | स्टॉक/ नॉन-स्टॉक | ऑर्डर करणे | स्टॉकसाठी विचार | मान्यता देणारी एजन्सी | तपासणी एजन्सी | चलन परवानगी | अंदाजे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 96NSCOMB | वस्तू (Y) | नॉन-स्टॉक | - | होय | RDSO | TPI एजन्सी | INR | - |

**वर्णन :** फ्यूजन वेल्डिंगसाठी भागांचा उत्पादित पुरवठा 60Kg/60E1 (R260 ग्रेड) रेल आणि 60 Kg (90UTS) कॉम्प्रेस्ड एअर-पेट्रोल सिस्टम/ऑक्सी वापरून ॲल्युमिनो थर्मिट प्रक्रियेद्वारे 25 मिमी गॅप असलेली रेल. एलपीजी/ऑक्सी प्रोपेन 3 पीस प्रीफेब्रिकेटेड मोल्ड (झिरकॉन वॉशड) सह प्री-हीटिंग, ऑटो टॅपिंगसह मॅन्युअली प्रेस केलेले/कोर शूटर थिंबल आणि नवीनतम बदलांसह सिंगल शॉट क्रूसिबल्स. लागू RDSO स्पेसिफिकेशन IRS T-19-2021 Rev.7.0 आहे, लागू STR (तांत्रिक आवश्यकतांचे वेळापत्रक) TDG0017, आवृत्ती 4.0 आहे. परिशिष्ट- '' नुसार आवश्यक उपभोग्य वस्तूंची यादी (निविदा उघडण्याच्या दिवसाच्या एक दिवस आधीपर्यंत RDSO द्वारे जारी केलेल्या रेखाचित्र, तांत्रिक आवश्यकतांचे वेळापत्रक (STR) आणि स्पेसिफिकेशनमधील हा बदल या निविदेला लागू असेल) वॉरंटी कालावधी: डिलिव्हरीच्या तारखेपासून 30 महिने. प्रमाण सहनशीलता (+/-): 0% मर्यादा, वस्तू श्रेणी: सामान्य, एकूण PO मूल्य फरक परवानगी: कमाल 8 लाख.

| मालवाहक | SSE/P-WAY/STORE/SUR | महाराष्ट्र | 3000.00 सेट |
|---|---|---|---|
| UVAM आयटम संदर्भ: | **आयटम आयडी :-** 3100494 - ॲल्युमिनो थर्मिट प्रक्रियेद्वारे रेलचे फ्यूजन वेल्डिंग, **सब आयटम आयडी:**-3100494010-60 किलो/60 ई1 (आर-260 ग्रेड) रेल आणि 60 किलो (90 युटीएस) 25 मिमी गॅपसह सीएपी/ऑक्सी एलपीजी/ऑक्सी प्रोपेन वापरून प्रीहीटिंग 3 पीस मोल्ड (झेडआर-वॉश्ड) मॅन्युअली प्रेस्ड/कोर-शूटरसह ऑटो टॅपिंग थिंबल आणि एसएससीसह | | |
| तपासणी तपशील | स्टेज तपासणी आवश्यक नाही. | | |

| | |
|---|---|
| **बयाणा रक्कम (INR)** | **रु.116820.00** |
| **www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ** | **11/09/2025 11:30 नंतर** |

संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट सतत भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट : **www.ireps.gov.in.**

**वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक**

SUN 75 टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें



**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**

**साहित्य खरेदी**

मध्य रेल्वे, सोलापूर विभागीय भांडार कार्यालय भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वेच्या ई-खरेदी वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे:

**निविदा क्रमांक : 9625WLD03**

| अ. क्र. | पीएल कोड (गट) | वस्तू प्रकार जीएसटी (Y /N) | स्टॉक/ नॉन-स्टॉक | ऑर्डर करणे | स्टॉकसाठी विचार | मान्यता देणारी एजन्सी | तपासणी एजन्सी | चलन परवानगी | अंदाजे दर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 96NSR260 | वस्तू (Y) | नॉन-स्टॉक | - | होय | RDSO | TPI एजन्सी | INR | - |

**वर्णन :** फ्यूजन वेल्डिंगसाठी भागांचा उत्पादित पुरवठा 60Kg/60E1 (R260 ग्रेड) रेल द्वारे 25 मिमी अंतरासह कॉम्प्रेस्ड एअर-पेट्रोल सिस्टीम/ऑक्सी वापरून ॲल्युमिनो थर्मिट प्रक्रिया. एलपीजी/ऑक्सी प्रोपेन प्रीहीटिंग 3 पीस प्रीफेब्रिकेटेड मोल्ड (झिरकॉन वॉश केलेले), मॅन्युअली प्रेस केलेले/कोर शूटर ऑटो टॅपिंगसह थिंबल आणि सिंगल शॉट क्रूसिबल्स नवीनतम बदलांसह. लागू RDSO स्पेसिफिकेशन IRS T-19-2 021 Rev.7.0 आहे, लागू STR (तांत्रिक आवश्यकतांचे वेळापत्रक) TDG0017, आवृत्ती 4.0 आहे. परिशिष्ट- '' नुसार आवश्यक उपभोग्य वस्तूंची यादी (निविदा उघडण्याच्या दिवसाच्या एक दिवस आधीपर्यंत RDSO द्वारे जारी केलेल्या रेखाचित्र, तांत्रिक आवश्यकतांचे वेळापत्रक (STR) आणि तपशीलातील हा बदल या निविदेला लागू असेल) वॉरंटी कालावधी : डिलिव्हरीच्या तारखेपासून 30 महिने. प्रमाण सहनशीलता (+/-): 0% मर्यादा, वस्तू श्रेणी : सामान्य, एकूण PO मूल्य फरक परवानगी: कमाल 8 लाख.

| मालवाहक | SSE/P-WAY/STORE/SUR | महाराष्ट्र | 8000.00 सेट |
|---|---|---|---|
| UVAM आयटम संदर्भ: | **आयटम आयडी :-** 3100494 - ॲल्युमिनो थर्मिट प्रक्रियेद्वारे रेलचे फ्यूजन वेल्डिंग, **सब आयटम आयडी:** 3100494009 60 किलो/60 ई1 (आर-260 ग्रेड) रेलसाठी 25 मिमीच्या नाममात्र अंतरासह सीएपी/ऑक्सी एलपीजी/ऑक्सी प्रोपेन प्रीहीटिंगसह 3 पीस मोल्ड (झेडआर-वॉश केलेले) मॅन्युअली प्रेस्ड/कोर-शूटरसह ऑटो टॅपिंग थिंबल आणि एसएससीसह) | | |
| तपासणी तपशील | स्टेज तपासणी आवश्यक नाही. | | |

| | |
|---|---|
| **बयाणा रक्कम (INR)** | **रु.292640.00** |
| **www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ** | **02//09/2025 11:30 नंतर** |

संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट सतत भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट : **www.ireps.gov.in.**

**वरिष्ठ विभागीय साहित्य व्यवस्थापक**

SUN 76 टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें



**लोकमंगल को-ऑप बँक लि., सोलापूर**

१२८, मुरारजी पेठ, सेवासदन प्रशालेजवळ, सोलापूर - ४१३००१
फोन नं. ०२१७-२७३५५०३/ फॅक्स नं.२७३५५६६ ई-मेल : lokmangalbankho@gmail.com

**नमुना झेड**

(नियम १०७ पोटनियम ((११)(ड)-१)-२ पहा)

**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्याआर्थि खाली सही केलेल्या वसुलीअधिकारी व्दारा लोकमंगल को. ऑप बँक लि., सोलापुर महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अन्वये खालील नमुद यादीतील ऋणको (थकबाकीदार) यांना थकबाकी मागणी नोटीस खालील नमुद दिनांकास ऋणको यांना देवुन सदरचे नोटीसी मध्ये नमुद रक्कम सदर नोटीस मिळल्या च्या दिनांका पासुन ऋणको यांने रक्कम जमा करण्यास कसुर केले आहे. त्याअर्थि खाली सही करण्या-याने खालील नमुद यादीतील ऋणको यांना खालील नमुद दिनांकास स्थावर मिळकत जप्तीची नोटीस देऊन पुढे निर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणको ने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला आणि सर्व नागरीकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण-याने त्याला महाराष्ट्र सहकरी संस्था निमय १०७ (११(७-१) अन्वये दिलेल्या आधिकरानुसार प्रतिकात्मक (सिम्बॉलिक) ताबा खालील नमुद दिनांकास घेतला आहे. विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना या व्दारे सावध करण्यात येते की, खाली नमुद केलेल्या यादीतील मालमत्ते संबधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास लोकमंगल को-ऑप बँक लि. सोलापुर या संस्थेच्या खाली नमुद केलेल्या बोज्याची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यातील इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | वसुली दाखला क्र. दिनांक | मिळकत क्र./ क्षेत्र/आकार | थकबाकीदाराचे नाव | प्रतिकात्मक ताबा घेतलेली तारीख | दिनांक २८/०७/२०२५ अखेर एकूण येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०१/१२०१/ २०२४-२५ दि. ०८/०४/२०२५ | मौजे माढा, ता. माढा, जि. सोलापूर गट नं. ५०५/२/६/ब चे क्षेत्र हे. ०.२८.७५ आर चौ.मी. आकार रू. ०.३९ पैसे व गट नं. ५०७/२ चे क्षेत्र हे. ०.२०.०० आर चौ.मी. आकार रू. ०.५३ पैसे | **कर्जदार** शुभांगी श्रीनिवास थोरात, पांडुरंग श्रीरंग थोरात, श्रीनिवास पांडुरंग थोरात | २५/०७/२०२५ | रु. ४१,०८,२८२/- अधिक व्याज |

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : २८/०७/२०२५**

मोहर

सही/- वसुली अधिकारी
**लोकमंगल को-ऑप बँक लि.,सोलापूर**
(म.सह. संस्था अधिनियम १९६० कलम १५६ अन्वये अधिकार प्रदानित)
द्वारा लोकमंगल को-ऑप. बँक लि., सोलापूर

## महत्त्वाचे

### विभक्त होण्याच्या घोषणेनंतर सायना नेहवालची पोस्ट



**नवी दिल्ली** : भारतीय बॅडमिंटन सुपरस्टार सायना नेहवाल व कश्यप पारुपल्ली वेगळे होण्याचा निर्णय घेतल्यानंतर पंधरा दिवसांनी सायनाने शनिवारी एका इंस्टाग्राम पोस्टमध्ये म्हटले आहे की, आम्ही पुन्हा प्रयत्न करत आहेत. कधीकधी अंतर तुम्हाला उपस्थितीचे मूल्य शिकवते. येथे आपण आहोत- पुन्हा प्रयत्न करत आहोत. पुलेला गोपीचंद बॅडमिंटन अकादमीमध्ये सुरुवातीच्या काळात एकत्र प्रशिक्षण घेतलेल्या सायना व कश्यप यांचे डिसेंबर २०१४ मध्ये लग्न झाले. तिने अद्याप या खेळातून अधिकृतपणे निवृत्ती घेतलेली नसली तरी, ३८ वर्षीय कश्यपने अकादमीमध्ये प्रशिक्षण कार्यात प्रवेश केला आहे. तो गुरु साई दत्त सारख्या एकेरी खेळाडूंसोबत काम करतो. कारकिर्दीच्या शिखरावर कश्यपने जगातील अव्वल १० मध्ये स्थान मिळवले होते व २०१४ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. अर्थात, सायना ही भारताच्या महान खेळाडूंपैकी एक आहे. तिने चीनचे वर्चस्व असताना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःचे स्थान निर्माण केले होते. ऑलिम्पिक कांस्यपदक व जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर पोहोचल्यामुळे ती जागतिक आयकॉन बनली. ■

### अकरा वर्षांखालील राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेला प्रारंभ

**जळगाव** : जळगावमधील जैन हिल्स येथील अनुभूती मंडप येथे शनिवारी ३८ व्या राष्ट्रीय ११ वर्षांखालील गटाच्या बुद्धिबळ स्पर्धेला प्रारंभ झाला. या स्पर्धेत देशभरातून ५५० हून अधिक बुद्धिबळपटू सहभागी झाले आहेत, त्यापैकी सुमारे ४०० सहभागींना अधिकृत रेटिंग मिळाले आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, चंदीगड, छत्तीसगड, दिल्ली, गोवा, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, तेलंगणा, कर्नाटक, पंजाब आणि राजस्थान या राज्यांचे आणि प्रदेशांचे प्रतिनिधित्व करून, या तरुण प्रतिभांनी राष्ट्रीय ओळख आणि आंतरराष्ट्रीय रेटिंगसाठी जळगावमध्ये एकत्र जमले आहे. नवजात प्रतिभेची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांना जोपासण्यासाठी महत्त्वाची असलेली ही प्रतिष्ठित स्पर्धा केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे सुरु केली. उद्घाटन समारंभात दिव्या देशमुख हिच्या अलिकडच्या महिला विश्वचषकात झालेल्या उल्लेखनीय विजयाची समांतरता दाखवण्यात आली. ही स्पर्धा ११ स्पर्धात्मक फेऱ्यांमध्ये स्विस लीग फॉरमॅटनुसार आयोजित केली जात आहे.

### एआयजी ओपन गोल्फमध्ये दीक्षा डागर २८ व्या स्थानावर

**पोर्थकॉल** : दीक्षा डागर दुसऱ्या फेरीत १-ओव्हर ७३ चा शूटिंग करत महिलांसाठी वर्षातील शेवटचा मेजर असलेल्या एआयजी महिला ओपनमध्ये वीकेंड राउंडसाठी कटमध्ये पोहोचली. दीक्षा (७१-७३) ३६ होलसाठी बरोबरीत आहे आणि शेवटच्या दोन फेऱ्यांमध्ये बरोबरीत २८ व्या स्थानावर आहे. या वर्षी ती या क्षेत्रात एकमेव भारतीय आहे. जपानची २३ वर्षीय मियू यामाशिता (६८-६५) दुसऱ्या फेरीत बोगी फ्री होती आणि ११-अंडर-पारमध्ये ३६ होलमध्ये आघाडीवर आहे आणि जपानची सहकारी रिओ ताकेदा (६७-६९) ८-अंडरमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. टायड-३ वर असलेल्या चार खेळाडूंचा पुढचा गट ४-अंडरमध्ये खूपच मागे आहे. रॉयल पोर्थकॉल येथे दोन फेऱ्यांनंतर, ७१ खेळाडूंनी कट केला. हवामानामुळे तापमानात खूप बदल झाला. दीक्षाने रॉयल पोर्थकॉल गोल्फ क्लबमध्ये परिस्थिती चांगली हाताळली. तिने दोन पार्सने सुरुवात केली पण तिसऱ्या आणि सहाव्या फेरीत शॉट्स सोडले. पार-५ नवव्या फेरीत तिने गरुडाने सावरले आणि सम पारमध्ये वळले.

### ड्युरंड चषक फुटबॉलमध्ये आज सामने रंगणार

**नवी दिल्ली** : १३४ वा ड्युरंड चषक फुटबॉल स्पर्धेत रविवारी गट साखळी फेरीचा अर्धा टप्पा होणार आहे. रविवारी फुटबॉल चाहत्यांना रोम हर्षक सामन्याची मेजवानी मिळणार आहे. इंडियन सुपर लीग संघ आणि माजी आय-लीग विजेता पंजाब एफसी कोक्राझार येथे मैदानावर उतरणार आहे. स्थानिक आसामी संघ कार्बी आंगलोंग मॉर्निंग स्टार एफसी विरुद्ध सायंकाळी होणाऱ्या सामन्यापूर्वी, जो त्यांच्या आधीच्या दोन्ही गट डी सामन्यांमध्ये पराभव पत्करल्यानंतर अभिमानासाठी खेळेल, नामधारी एफसी आणि भारतीय हवाई दल फुटबॉल संघ यांच्यात गट अ मध्ये एक महत्त्वाचा सामना कोलकात्याच्या विवेकानंद युवा भारती क्रिरांगन (व्हीवायबीके) येथे होणार आहे, ज्यामुळे रविवारी खऱ्या अर्थाने सुपर फु टबॉलिंग होईल. कोलकाता येथे होणाऱ्या या सामन्यात आय-लीग संघ नामधारी विरुद्ध भारतीय हवाई दलाचा संघ सामना होईल आणि दोन्ही संघ आपापल्या गटातील शेवटच्या सामन्यात विजयासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतील. ■

# कसोटी निर्णायक वळणावर

### यशस्वी जयस्वालचे शतक



यशस्वी जयस्वालचे दमदार शतक

◆ **लंडन, २ ऑगस्ट**

अॅण्डरसन-तेंडुलकर चषक पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पाचव्या आणि निर्णायक कसोटी सामन्यात सलामीवीर यशस्वी जयस्वालने झळकावलेल्या सहाव्या कसोटी शतकाच्या बळावर भारताने इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या दिवशी चहापानापर्यंत दुसऱ्या डावात ७१ षटकांत ६ बाद ३०४ धावांपर्यंत मजल मारली. मोहम्मद सिराज व प्रसिध कृष्णाच्या वेगवान माऱ्यानंतर यशस्वी जयस्वालच्या शतकामुळे भारताने जोरदार मुसंडी मारली असून हा सामना आता रोमांचक निर्णायक वळणावर पोहोचला आहे. भारताला विजयासाठी इंग्लंडसमोर मोठे धावांचे आव्हान उभे करावे लागणार आहे. शिवाय पहिल्या डावाप्रमाणे इंग्लंडचा दुसरा डाव लक्ष्य गाठण्यापूर्वी झटपट गुंडाळावा लागणार आहे.

यशस्वी जयस्वालने अॅण्डरसन-तेंडुलकर चषकाची सुरुवात आणि शेवट शतकांनी केली. ओव्हलवर त्याने सहावे कसोटी शतक झळकावले, हे विशेष.

भारताच्या पहिल्या डावातील २२४ धावांना प्रत्युत्तर देताना इंग्लंडने २४७ धावा काढल्या आणि २३ धावांची निसटती आघाडी मिळविली. इंग्लंडला पहिल्या डावांत रोखताना वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज व प्रसिध कृष्णाने प्रत्येकी ४ बळी घेतले व भारताला सामन्यात परत आणले.

भारताने २ बाद ७५ धावांवरून पुढे आपल्या तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. कालचा नाबाद अर्धशतकवीर यशस्वी जयस्वालने आकाश दीपच्या साथीने आपले शतक साजरे केले व भारताची धावसंख्या वाढविली. दरम्यान आकाशनेही अर्धशतक साजरे केले. या दोघांनी १०७ धावांची शतकी भागीदारी करून भारताला १७७ धावांवर पोहोचवले. आकाश दीप ६६ धावांवर खेळत असताना ओव्हर्टनने त्याला अटकिन्सनकडून झेलबाद केले. आकाश दीपने आपल्या ९४ चेंडूंच्या खेळीत १२ चौकार खेचलेत. पुढे कर्णधार शुभमन गिल (११) व करुण नायर (१७) यांच्याकडून भरीव कामगिरीची अपेक्षा होती, परंतु गस अटकिन्सनने या दोघांनाही लवकरच तंबूत परत पाठविले. त्यामुळे भारताची ५४.३ षटकांत ५ बाद २२९ अशी स्थिती झाली. मात्र जयस्वालने एक बाजू सांभाळीत रवींद्र जडेजाच्या मदतीने भारताला पावणे तिनशे धावांच्या जवळपास आणले, याचवेळी जोश टोंगने जयस्वालची घोडदौड रोखली व त्याला ओव्हर्टनकडून झेलबाद केले. यशस्वी जयस्वालने १६४ चेडूंत १४ चौकार व २ षट्कारांसह ११८ धावांची देखणी शतकी खेळी केली. पुढे चहापानापर्यंत रवींद्र जडेजा व ध्रुव जुरेलने भारताला ७१ षटकांत ६ बाद ३०४ धावांचा टप्पा गाठून दिला. त्यावेळी जडेजा २६ धावांवर, तर जुरेल २५ धावांवर खेळत होते. ◂(वृत्तसंस्था)

# विश्वास अन् सांघिक भावनेमुळे भारताची मुसंडी

### प्रसिध कृष्णा व मोहम्मद सिराजच्या भावना



प्रसिध कृष्णा



मोहम्मद सिराज

◆ **लंडन, २ ऑगस्ट**

परस्पर विश्वास आणि सांघिक भावनेमुळेच भारताने इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या पाचव्या कसोटी सामन्यात जोरदार मुसंडी मारली, असे भारताचे वेगवान गोलंदाज प्रसिध कृष्णा व मोहम्मद सिराज म्हणाले.

बेन डकेट (३८ चेंडूत ४३) व झॅक क्रॉवलीने (५७ चेंडूत ६४) इंगलंडला विस्मयकारक सुरुवात करून दिल्यानंतर सिराज आणि भारतीय वेगवान गोलंदाजांनी शैलीत पुनरागमन केले. शेवटच्या सत्रात इंग्लंडला २४७ धावांवर गुंडाळले. त्यामुळे यजमान इंग्लंड संघाला केवळ २३ धावांची आघाडी मिळविता आली.

आम्ही ब्रेकदरम्यान एकमेकांशी संवाद साधला. आतापर्यंत जे काही झाले ते झाले, परंतु आता आपल्याला काय करायचे आहे, हे सर्वांना ठाऊक आहे व आम्ही नियोजनानुसार खेळलो, असे प्रसिध म्हणाला.

गोलंदाजी करताना प्रत्येक खेळाडूंनी एकमेकांना पाठिंबा द्यावा, हा बदल करण्याची गरज होती. त्यामुळे प्रेक्षकांनाही योजनांप्रमाणे त्याच मार्गावर आणतो व आम्हाला प्रोत्साहन मिळते, असेही तो म्हणाला.

सामन्यादरम्यान आम्ही सतत एकमेकांना धक्का देत होतो. एकमेकांना चांगली कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन देत होतो. आम्ही तेच करत होतो, त्यामुळे आम्हालाही खेळताना आनंद वाटत होता, असे त्याने सांगितले.

दुपारी आठ षटकांच्या जोरदार स्पेलमध्ये सिराजने तीन वेळा गोलंदाजी केली आणि १६.२ षटकांत ८६ धावा देऊन ४ बळी, तर प्रसिधने १६ षटकांत ६२ धावा देऊन ४ बळी टिपलेत. दुसऱ्या दिवसाच्या खेळाच्या शेवटी, भारताने दुसऱ्या डावात २ बाद ७५ धावा केल्या होत्या. सलामीवीर के. एल. राहुल (२८ चेंडूत ७) बाद झाल्यानंतर भारताने ५२ धावांनी आघाडी घेतली होती. प्रसिद्धने वेगवान गटातील मैत्रीपूर्ण संबंधांवरही प्रकाश टाकला.

आम्ही गत पाच वर्षांपासून त्याच्यासोबत आयपीएलमध्ये खेळलो आहोत. आम्ही खूप एकत्र बसतो, बराच वेळ एकत्र करतो. आकाश दीपसोबतही असेच आहे. आमचा वेगवान गोलंदाजी विभाग खूपच चांगला दिसत आहे, असेही तो म्हणाला. मैदानावर व मैदानाच्या बाहेर संबंध असणे हे आमच्यासाठी खरोखर महत्वाचे आहे. मैदानावर असताना एकमेकांशी बोलता तेव्हा एक विश्वास निर्माण होतो व सांघिक भावना दृढ होते, असेही त्याने सांगितले.

मी माझ्या गोलंदाजीवर खूप काम केले. मी खेळलेल्या दोन सामन्यांमधून खूप काही शिकलो व मी काय चांगले करू शकतो यावर लक्ष केंद्रित करतो, असे प्रसिध कृष्णा म्हणाला.

सिराजने खेळादरम्यान बुमराहसोबत एक हलकाफुलका क्षण शेअर केला. मी बुमराहला म्हणालो होतो की, मी जर पाच बळी टिपले, तर सर्वात आधी कोणाला मिठी वारावी. त्यावर बुमराह झटकन म्हणाला की, मी इथेच आहे, तू केवळ त्या पाच बळी मिळवण्यावर लक्ष केंद्रित कर. एवढ्या वाईट सत्रानंतर भारतीय संघाने असे पुनरागमन करणे आश्चर्यकारक वाटते. एक वेगवान गोलंदाज म्हणून, अशी कलाटणी देणे खरोखरच रोमांचक असते, असेही सिराज म्हणाला.

जेव्हा तुम्हाला जबाबदारी दिली जाते तेव्हा, ती जबाबदारी पूर्ण करताना १०० टक्के मजा येते, पण माझी मानसिकता सोपी आहे. निकाल काहीही असो, मी माझे १०० टक्के योगदान देतो, असे सिराज म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

# अजय सिंग अध्यक्षपदावरून पायउतार

## विश्व मुष्टियुद्धाचे बोरिस व्हॅन डेर व्होर्स्ट निरीक्षक

BOXING FEDERATION OF INDIA

### बीएफआय निवडणूक २१ ऑगस्ट रोजी

◆ **नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

या महिन्यात भारतीय मुष्टियुद्ध महासंघाची (बीएफआय) निवडणूक होणार आहे. त्या पृष्ठभूमीवर अजय सिंग यांनी भारतीय मुष्टियुद्धाच्या अंतरिम समितीचे अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. राजीनाम्यानंतर ते बीएफआयच्या निवडणुकीत भाग घेणार आहे. बीएफआयच्या निवडणुकीत जागतिक मुष्टियुद्धाचे अध्यक्ष बोरिस व्हॅन डेर व्होर्स्ट हे निरीक्षक म्हणून काम पाहतील.

अंतरिम समितीने २१ ऑगस्ट रोजी निवडणुकीची औपचारिक घोषणा केल्यानंतर अजय सिंग यांनी तात्काळ प्रभावाने आपल्या पदाचा राजीनामा दिला.

भारतीय मुष्टियुद्ध महासंघाच्या निवडणुका आता औपचारिकपणे जाहीर झाल्या आहेत व त्या २१ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहेत, असे सिंग यांनी १ ऑगस्ट रोजी व्हॅन डेर व्होर्स्ट यांना लिहिलेल्या पत्रात लिहिले आहे.



अजय सिंग

'मी आगामी निवडणुका लढवण्याचा विचार करत असल्याने, मला वाटते की मी तात्काळ प्रभावाने अंतरिम समितीच्या अध्यक्षपदावरून पायउतार होणे योग्य आहे आणि निष्पक्षता आणि पारदर्शकतेच्या हितासाठी आहे, असे ते म्हणाले.

भारतीय मुष्टियुद्धाच्या दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन करण्यासाठी जागतिक मुष्टियुद्धाने एप्रिलमध्ये अंतरिम समिती स्थापन केली होती. जागतिक मुष्टियुद्धाने शनिवारी अजय सिंग यांचा राजीनामा स्वीकारला. त्यांच्या जागी, आंतरराष्ट्रीय संस्थेने सिंगापूर मुष्टियुद्धाचे अध्यक्ष फेरुझ मोहम्मद यांना नवीन अंतरिम समिती अध्यक्ष म्हणून बढती दिली आहे. फेरुझ मोहम्मद हे समितीमध्ये जागतिक मुष्टियुद्धाचे निरीक्षक म्हणून काम करत होते. व्हॅन डेर व्होर्स्ट आणि कार्यवाहक महासचिव माइक मॅकएटी २१ ऑगस्ट २०२५ रोजी निवडणुकीदरम्यान निरीक्षक म्हणून उपस्थित राहतील, अशी जागतिक मुष्टियुद्धाने पुष्टी केली आहे.

स्पाइसजेट एअरलाइन्सचे अध्यक्ष असलेले अजय सिंग यांनी बीएफआय अध्यक्ष म्हणून दोन चार वर्षांचा कार्यकाळ आधीच पूर्ण केला आहे आणि आता २०११ च्या राष्ट्रीय क्रीडा विकास संहितेनुसार, तिसऱ्या आणि शेवटच्या कार्यकाळाचे लक्ष्य ठेवले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### अनुराग ठाकूर निवडणूक लढवणार



अनुराग ठाकूर हे अजय सिंग यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी असतील. हिमाचल प्रदेश मुष्टियुद्ध संघटना पुन्हा एकदा माजी क्रीडामंत्र्यांचे नाव त्यांचे प्रतिनिधी म्हणून सुचवेल असे कळते.

२८ मार्च रोजी सुरुवातीला निवडणुका झाल्या तेव्हा ठाकूर निवडणूक रिंगणात होते, परंतु सिंग यांनी अंतिम केलेल्या आणि नंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी मंजूर केलेल्या मतदार यादीत त्यांचे नाव नव्हते. ■

# मन्नेपल्ली, लक्ष्य सेनचे आव्हान संपुष्टात

### मकाऊ ओपन बॅडमिंटन

◆ **मकाऊ, २ ऑगस्ट**

येथे सुरु असलेल्या मकाऊ ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताच्या थरुन मन्नेपल्ली आणि लक्ष्य सेनची विजयी घोडदौड थांबली. थरुनला मलेशियाच्या जस्टिन होहविरुद्ध तीन गेमच्या रोमांचक लढतीत पराभव पत्करावा लागला.

२०२१ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील विद्यमान विजेता लक्ष्यला इंडोनेशियाच्या अल्वी फरहानच्या वेग आणि अचूकतेची बरोबरी करता आली नाही. त्याने ३९ मिनिटांच्या सामन्यात फरहानकडून १६-२१, ९-२१ असा पराभव पत्करला.

जागतिक क्रमवारीत ४७ व्या स्थानावर असलेल्या २३ वर्षीय मन्नेपल्लीने चांगली सुरुवात केली नाही. त्याने काही नाहक चुका केल्या. एक तास २१ मिनिटांच्या सामन्यात थरुनला जस्टिनकडून २१-१९, १६-२१, १६-२१ असा पराभव पत्करावा लागला.

मन्नेपल्लीने जोरदार सुरुवात केली व प्रारंभी ११-६ अशी आघाडी घेतली, परंतु त्याच्या काही नाहक चुकांमुळे जस्टिनने फायदा उचलला व आघाडीतील अंतर कमी केले. परंतु दोन मोठ्या परताव्यांसह थरुनला पुन्हा १७-१२ अशी पाच गुणांची आघाडी मिळाली. दोन्ही खेळाडू चिंताग्रस्त दिसत होते आणि अचूकतेसाठी संघर्ष करत होते.दरम्यान, मन्नेपल्लीने फोरहॅण्डवर जोरदार परतफेड करत १८-१८ अशी बरोबरी साधली. जस्टिनच्या वाईड रिटर्नमुळे थरूनला दोन गेम पॉईट मिळाले. पुढे

मन्नेपल्लीने सरळ रिटर्नमध्ये रूपांतर करून पहिला गेम जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये थरुनने काही चुका केल्यामुळे जस्टिनला ८-६ अशी आघाडी मिळाली. त्यानंतर पुढे आणखी काही चुकांमुळे मलेशियन खेळाडूला चार गुणांची आघाडी मिळाली. पुढे थरुन मन्नेपल्लीने १३-१३ अशी बरोबरी साधली, परंतु पुन्हा जस्टिनने १७-१४ अशी आघाडी मिळवली आणि मन्नेपल्लीने चुकांची मालिका कायम राखत त्याला चार गेम पॉईट दिले.

निर्णायक गेममध्ये थरुन मन्नेपल्लीने ६-३ अशी आघाडी घेतली आणि त्यानंतर जस्टिनने ९-९ अशी बरोबरी साधली. ब्रेकवर एका लांब फटक्यामुळे जस्टिनला दोन गुणांची आघाडी मिळाली. त्यानंतर थरून वारंवार चुका करत राहिला आणि जस्टिन १६-९ अशी आघाडी घेऊ शकला. ◂(वृत्तसंस्था)

### अरुणाचल, बंगाल, केरळ हिमाचल प्रदेश विजयी

**चेन्नई** : येथील महापौर राधाकृष्णन हॉकी स्टेडियमवर १५ व्या हॉकी इंडिया सब ज्युनियर पुरुष राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेच्या सहाव्या दिवशी हॉकी अरुणाचल, हॉकी बंगाल, केरळ हॉकी आणि हॉकी हिमाचल प्रदेश संघांनी विजय नोंदवले. छत्तीसगड हॉकी आणि मणिपूर हॉकी, विभाग ब मध्ये अव्वल दोन संघ म्हणून स्थान मिळविल्यानंतर, विभाग अ मध्ये पदोन्नती मिळवतील. अव्वल डिव्हिजनमध्ये उत्तर प्रदेश हॉकी, हॉकी असोसिएशन ऑफ ओडिशा आणि हॉकी झारखंड यांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवला. डिव्हिजन ब सामन्यात हॉकी अरुणाचलने गोवान्स हॉकीचा ६-१ असा पराभव केला. ■



मॉण्ट्रियल येथे आयोजित नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत इंग्लंडच्या एम्मा राडुकानू विरुद्ध खेळताना अमेरिकेची अमांडा ॲनिसिमोव्हा

# गतविजेती जेसिका पेगुला सेव्हास्तोव्हाकडून पराभूत

### मॉण्ट्रियल नॅशनल बँक ओपन टेनिस

◆ **मॉण्ट्रियल, २ ऑगस्ट**

दोन वेळची गतविजेती जेसिका पेगुला हिला नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत अनास्तासिजा सेव्हास्तोव्हाकडून ३-६, ६-४, ६-१ असा पराभवाचा धक्का सहन करावा लागला. या पराभवाबरोबरच ती स्पर्धेच्या बाहेर झाली.



२०१८ मध्ये ११ व्या क्रमांकावर असलेली लॅटव्हियाची ३५ वर्षीय सेव्हास्तोव्हाने तिसऱ्या क्रमांकाच्या पेगुलाला १० संधींमध्ये सहा वेळा ब्रेक केले.

मी तिसरा सेट खरोखर चांगली खेळली. केवळ शक्य तितका वेळ कोर्टवर राहण्याचा प्रयत्न केला, असे ती म्हणाली.

अन्य सामन्यात पोलंडच्या विम्बल्डन विजेत्या इगा स्वियातेकने जर्मनीच्या इवा लायसचा ६-२, ६-२ असा पराभव केला. आता पुढील सामन्यात दुसरी मानांकित स्वियातेक १६ व्या मानांकित डेन्मार्कच्या क्लारा टॉसनशी सामना करेल. क्लाराने युक्रेनच्या युलिया स्टारोडबत्सेवाचा ६-३, ६-० असा पराभव केला.

हा एक चांगला सामना होता म्हणून येथे आणखी एक सामना खेळण्याची संधी मिळाल्याने मला आनंद झाला, असे इगा स्वियातेक म्हणाली. ◂(वृत्तसंस्था)

# मॅकडोनाल्डकडून नागलचा पराभव

### हेगन चॅलेंजर टेनिस

◆ **नवी दिल्ली, २ ऑगस्ट**

भारताचा अव्वल एकेरी टेनिसपटू सुमित नागलला हेगन जर्मनीमध्ये झालेल्या प्लॅट्झमन ओपन या एटीपी ७५ चॅलेंजर टेनिस स्पर्धेच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत कनिष्ठ गट फ्रेंच ओपन विजेता व बिगर मानांकित नील्स मॅकडोनाल्डकडून पराभव पत्करावा लागला. ३०७ व्या क्रमांकावर असलेला नागल दोन तास १६ मिनिटे चाललेल्या आणि पावसामुळे दोन दिवसांत संपलेल्या दुसऱ्या फेरीच्या सामन्यात त्याच्यापेक्षा १० वर्षांनी लहान असलेल्या प्रतिस्पर्ध्याकडून २-६, ६-४, ४-६ असा पराभूत झाला.

सामना स्थगित करण्यात आला तेव्हा दोन्ही खेळाडूंनी पहिले दोन सेट विभागले होते आणि दुसऱ्या दिवशी तो पूर्ण करावा लागला. वाईल्ड कार्ड म्हणून खेळणाऱ्या १७ वर्षीय मॅकडोनाल्डने नऊपैकी सहा ब्रेकपॉइंट वाचवले. ◂(वृत्तसंस्था)

# मेस्सीच्या स्वागतासाठी चारही महानगरे सज्ज

## मेस्सीचा भारत दौरा ● कोलकातामध्ये पहिला टप्पा; नंतर दिल्ली, मुंबई, अहमदाबादमध्ये आगमन

◆ **कोलकाता, २ ऑगस्ट**

जर सर्व गोष्टी व्यवस्थित झाल्या तर कोलकात्यातील फुटबॉल प्रेमींना एका दशकानंतर दिग्गज फुटबॉलपटू लियोनेल मेस्सीचे पहिले दर्शन होईल आणि अहमदाबाद, मुंबई आणि नवी दिल्ली या अर्जेंटिनाच्या वादळी प्रवासात आनंदाचे शहर हे पहिले थांबे असेल. या दौऱ्यादरम्यान मेस्सी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहे.

मुंबईतील वानखेडे स्टेडियम बुक करण्यासह सर्व व्यवस्था अंतिम करण्यात आल्या आहेत, परंतु मेस्सीकडून अधिकृत पुष्टी अद्याप प्रतीक्षेत आहे, असे या घडामोडींशी संबंधित सूत्रांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

सर्व कार्यक्रम सुनिश्चित झाला आहे, पण आम्ही मेस्सीकडून अधिकृत घोषणा होण्याची वाट पाहत आहोत, कदाचित लवकरच कधीही त्याच्या समाजमाध्यमावर बातमी येईल, असे सूत्राने सांगितले.

कार्यक्रमानुसार, मेस्सी १२ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता कोलकाता येथे पोहोचेल आणि दोन दिवस आणि एक रात्र मुक्काम करेल. हा त्याच्या दौऱ्यातील सर्वात मोठा मुक्काम आहे.

**कोलकाता : ७० फूट उंचीचा पुतळा, गांगुलीसोबत चषक**

१३ डिसेंबर रोजी अर्जेंटिनाच्या कर्णधाराचा कोलकाता दौरा कार्यक्रम सकाळी ९ वाजता भेट-अभिवादन कार्यक्रमाने सुरू होईल, त्यानंतर व्हीआयपी रोडवरील लेक टाऊन श्रीभूमी येथे त्याच्या ७० फूट उंचीच्या पुतळ्याचे अनावरण होईल.



हा जगातील कुठेही विश्वचषक विजेत्याचा पहिला आणि सर्वात उंच पुतळा असेल, असा दावा आयोजकांनी केला आहे. त्यानंतर तो ईडन गार्डन्सला जाईल. तिथे दुपारी १२ ते दुपारी १.३० पर्यंत कॉन्सर्ट आणि चषक आयोजित केला जाईल. हा मेस्सीचा उत्सव असेल, मेस्सीसोबतचा एक मास्टर क्लास असेल.

तो सौरव गांगुली, लियांडर पेस, जॉन अब्राहम, बायचुंग भुतिया आणि इतरांसोबत सात खेळाडूंच्या सॉफ्ट-बॉल सामन्यात खेळेल. मेस्सीच्या सन्मानार्थ हा एक सेलिब्रेशन सामना असेल, असे सूत्राने स्पष्ट केले. हा पूर्णपणे तिकिट असलेला कार्यक्रम असल्याने मोठ्या संख्येने प्रेक्षकांची अपेक्षा आहे.

संपूर्ण स्टेडियम खुले असेल. यात ६८ हजार प्रेक्षकांची उपस्थिती अपेक्षित आहे. १ तास २० मिनिटे मेस्सी संगीतमय कार्यक्रम असेल, असे ते म्हणाले. ईडन गार्डन्स कार्यक्रमादरम्यान पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी मेस्सीचा सत्कार करतील अशी अपेक्षा आहे.

**अहमदाबाद, मुंबई आणि दिल्ली फेरी**

१३ डिसेंबर रोजी सायंकाळी मेस्सी अहमदाबादला अदानी फाऊंडेशनने त्यांच्या शांतीग्राम मुख्यालयात आयोजित केलेल्या एका खाजगी कार्यक्रमात सहभागी होणार आहे. त्यानंतर तो १४ डिसेंबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमांसाठी मुंबईत पोहोचेल, ज्यामध्ये दुपारी ३.४५ वाजता सीसीआय येथे भेट आणि अभिवादन, त्यानंतर ५.३० वाजता वानखेडे स्टेडियमवर कॉन्सर्ट आणि कपचा समावेश आहे.

१४ डिसेंबर रोजी सायंकाळी ५.४५ वाजता चषक सामन्यासाठी आम्ही वानखेडे स्टेडियम बुक केले आहे, असे सूत्रांनी सांगितले. मेस्सी एमएस धोनी आणि विराट कोहलीसह सेव्हन-ए-साईड क्रिकेट सामन्यात सहभागी होऊ शकतो. मेस्सी मुंबईमध्ये भारतीय फुटबॉल संघाशी संवाद साधू शकेल यासाठीही योजना आखत आहे, असे सूत्रांनी सांगितले.

### पंतप्रधानांशी भेट, कोटला उत्सव

१५ डिसेंबर रोजी, मेस्सी नवी दिल्लीत असेल. तिथे तो पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटणार आहे. त्यानंतर दुपारी २.१५ वाजता फिरोजशाह कोटला येथे कॉन्सर्ट आणि चषक साम्यात उपस्थित राहणार आहे. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### महापालिका शाळा क्र.४ मध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप

**सोलापूर,दि. २ ऑगस्ट-**

जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून स्वखर्चातून महापालिका शाळा क्र.४, विजापूर रोड, या शाळेमध्ये आज शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले. यावेळी सहाय्यक निबंधक उमेश पवार, किरण चौधरी उपस्थित होते. प्रस्ताविक मुख्याध्यापक संतोष जाधवर यांनी केले तर सूत्रसंचालन उमा चंदनशिवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक विजय टेकाळे, राजश्री व्हनगुंडे, गीता ढाकणे, अमृता नादवटे, रियाज नदाफ, विशाल मनाळे, देशमाने, स्वाती इंगळे, रत्नमाला ननवरे, मनीषा कांबळे आदींनी परिश्रम घेतले.



### नेताजी प्रशालेस कक्ष अधिकारी राम लहाने यांची भेट

**सोलापूर दि. २ ऑगस्ट-**

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्थेस महाराष्ट्र राज्याचे शिक्षण व क्रीडा विभागातील कक्ष अधिकारी राम लहाने आणि उद्योजक विठ्ठल लहाने यांनी सदिच्छा भेट दिली. नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी दोन्ही लहाने बंधुचे स्वागतपर सत्कार केले. याप्रसंगी सेवानिवृत्त प्राचार्य रेवणसिद्ध रोडगीकर, विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, सहशिक्षक विशाल खाडे, क्रीडा प्रमुख विठ्ठल कुंभार, ज्येष्ठ शिक्षक राजकुमार मरगुरे, राजेंद्र मुलगे, शिवकुमार शिरुर, काशिनाथ माळगोंडे, गणपती पाटील, विश्वाराध्य मठपती, सिध्दाराम कुंभार आदी उपस्थित होते.



### डॉ. अश्विनी राठोड यांना पीएच.डी. पदवी प्रदान

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

डॉ. अश्विनी राठोड यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडून 'ह्युमन रिसोर्स अकाउंटिंग अँड ऑडिटिंग प्रॅक्टिसेस विथ स्पेशल रेफरन्स टू वेस्टरन महाराष्ट्र' या विषयावरील सखोल संशोधनासाठी विद्यावाचस्पती ही पदवी प्रदान करण्यात आली. २ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यापीठात झालेल्या मौखिक सादरीकरणात त्यांनी आपल्या संशोधनातील महत्वाचे निष्कर्ष मांडले. ह्युमन रिसोर्स ऑडिटिंग व अकाउंटिंग प्रॅक्टिसेसमधील विद्यमान अडचणी आणि भविष्यातील सुधारणा यावर त्यांनी अभ्यासपूर्ण मते मांडत महत्त्वपूर्ण सुधारणा सुचविल्या. डॉ. राठोड यांचे हे संशोधन दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. डॉ.अश्विनी राठोड या निवृत्त पोलिस उपअधीक्षक नीलकंठ राठोड यांची कन्या आहे.



### संभाजी ब्रिगेडच्या होम मिनिस्टर स्पर्धेत गीता मनुरे पैठणीच्या मानकरी

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**


संभाजी ब्रिगेडच्या वतीने नागपंचमीनिमित्त शहरातील किसान संकुल येथे झालेल्या होम मिनिस्टर स्पर्धेत गीता मनूरे ह्या विजेत्या ठरल्या; त्यांना मानाची पैठणी प्रदान करण्यात आली. द्वितीय क्रमांक सपना लगशेट्टी यांना तर तृतीय रवीना लोखंडे यांना देण्यात आला. ही स्पर्धा संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनल दास यांनी आयोजित केली होती. नागपंचमीच्या निमित्ताने हा कार्यक्रम अक्कलकोट रोड भागातील किसान संकुल येथे पार पडला. होम मिनिस्टर खेळ पैठणीच्या स्पर्धेत ४६ महिलांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा पत्रकार अर्जुन चव्हाण यांनी उपस्थितांचे मनोरंजन करत आठ फेरीत होम मिनिस्टर ही स्पर्धा खेळवली. प्रथम तीन विजेत्यांना संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम, जिल्हा उपाध्यक्ष मनीषा कोळी, जिल्हा उपाध्यक्ष दिलीप निंबाळकर, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, प्रकाश शिंपी यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी किसान संकुल मधील सुनंदा बडुरे, तसलीम पटेल, अश्विनी जाधव, फुलाबाई शेळके, पल्लवी माचले, रोहिणी माकाई, पूजा चौधरी, माया बंबगोंडे, तनुजा शिंपी, ज्योती लोखंडे, कांचन हिप्परगी, राधा मदनाल आदींसह महिला उपस्थित होत्या.

# शहरात पाळीव श्वानांसाठी परवाना बंधनकारक

## अपार्टमेंट, सोसायटीसाठी नियमावलीची अंमबजावणी आवश्यक : डॉ. ओंबासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

सोलापूर शहरातील पाळीव श्वानांची (कुत्र्यांची) संख्या वरचेवर वाढत आहे. विविध अपार्टमेंट आणि गृहनिर्माण सोसायटीमध्ये या पाळीव श्वानांबाबत परिसरातील लोकांच्या अनेक तक्रारी असतात.यात शिस्त लावण्यासाठी महापालिकेने पाळीव श्वानांसाठी परवाना बंधनकारक करण्याची गरज आहे. अपार्टमेंट, सोसायटीसाठी नियम अंमलबजावणीची करणे आवश्यकता आहे.



शहरात केनेल क्लब ऑफ इंडियाकडे नोंदणी असलेले सुमारे २ हजार पाळीव श्वान आहेत. तर इतर ३ हजार पाळीव श्वान असे सुमारे पाच हजार श्वान शहरात आहेत. तर भटक्या कुत्र्यांची संख्या सुमारे ३० हजार असू शकते. औरंगाबाद, पुणे, मुंबईसह इतर महापालिकांमध्ये पाळीव श्वानांसाठी नोंदणी आवश्यक करण्यात आली आहे. त्यांना नियमानुसार सशुल्क परवाना दिला जातो. सोलापूर महापालिकेच्या आरोग्य विभागाने आता यासाठी कार्यवाही करावी. त्यासाठी कुत्र्याला रेबीज लस दिल्याचे प्रमाणपत्र, राहण्याच्या पत्त्याचा पुरावा, श्वानांचा फोटो, महापालिका मिळकत कर पावती, सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र आदी कागदपत्र सादर करणे आवश्यक असावे. तसेच स्वतःच्या जागेच्या हद्दीबाहेर सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर श्वानाला मोकळे सोडणार नाही, त्या श्वानाने कुणाला दुखापत करू नये यासाठी त्याच्या तोंडाला मास्क घालणे, त्याला नैसर्गिक विधी करण्यासाठी रस्त्यावर सार्वजनिक ठिकाणी घेऊन जाणार नाही असे प्रतिज्ञापत्रही लिहून द्यावे लागते. त्यानंतरच महापालिका मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलमानुसार सशुल्क परवाना आणि अटी व शर्तीचे कार्ड दिले जाते. यासाठी सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तातडीने कार्यवाहीचे आदेश देण्याची गरज आहे.

> विशेष म्हणजे, अपार्टमेंट आणि गृहनिर्माण सोसायटीमध्ये श्वान पाळण्यासंदर्भात निमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. याबाबतचे धोरण सोलापूर महापालिकेने आता निश्चित करणे गरजेचे आहे. सोलापूर शहरातील पाळीव श्वानांसाठी परवाना देण्याची आता आवश्यकता आहे. इतर महापालिकांप्रमाणेच ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करावी. महापालिकेच्या वतीने पाळीव प्राण्यांसाठी परवाना बंधनकारक करणे गरजेचे आहे.



### कुचनच्या सविता चिप्पा व अनिल गंजी यांचा सेवनिवृत्तीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

पद्मशाली शिक्षण संस्था संचलित कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण येथून प्रशालेच्या ज्येष्ठ शिक्षिका सविता चिप्पा व सहशिक्षक अनिल गंजी यांचा सेवानिवृत्तीनिमित्त निरोप समारंभ करण्यात आला. संस्थेचे विश्वस्त दिनेश यन्नम यांच्या हस्ते दोघांचाही सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य युवराज मेटे यांनी केले. चिप्पा यांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या बऱ्याच आठवणी सांगितल्या ज्या सर्वांना मार्गदर्शक ठरतील तसेच शिस्त व प्रामाणिकपणा याचे महत्त्व सांगितले. त्याचप्रमाणे त्यांच्या यशस्वी कारकिर्दीमागे वडिलांचे संस्कार व कुटुंबाची साथ असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन स्वप्ना मोरे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे आदी उपस्थित होते.

# आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली होळकर प्रसूतीगृहास भेट

## विनाकारण सिव्हिल हॉस्पिटलला रुग्ण पाठविल्यास कारवाईचा दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

महापालिकेच्या आशा वर्कर्सना पैशाचे आमिष देऊन महापालिकेतील प्रसूतीगृहात प्रसूतीसाठी आलेल्या रुग्णांना खाजगी दवाखान्यात पळवल्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी आज डफरीन चौकातील महापालिकेच्या पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर प्रसूतीगृहास अचानक भेट दिली. प्रसूतीसाठीच्या रुग्णांना विनाकारण सिव्हिल हॉस्पिटलला पाठविल्यास कारवाई करण्याचा इशारा दिला.



सोलापूर महापालिकेच्या आशा वर्कर्सना पैशाचे आमिष दाखवून महापालिकेच्या प्रसूतीगृहातील रुग्ण खाजगी रुग्णालयात पळविले तसेच बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट खाली आढळलेल्या विविध त्रुटीमुळे अखेर नवी पेठेतील श्रेयस नर्सिंग होम तात्पुरत्या स्वरूपात सील करण्याची कारवाई महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी शुक्रवारी केली. सोलापूर महापालिकेच्या प्रसूतिगृहांमध्ये तपासणीसाठी येणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी खासगी रुग्णालयात वळविण्याचा प्रकार आशा वर्कर्स कडून होत असल्याचे उघडकीस आला. पैशाचे आमिष दाखवून आशा वर्कर्सकडून हे काम करून घेतले जात होते. दरम्यान, या हॉस्पिटलमध्ये सकाळी १० ते दुपारी ३ आणि सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत डॉक्टरसह सर्व स्टाफ हजर असणे बंधनकारक आहे. नियमानुसार सर्व स्टाफनी कर्तव्य बजावणे बंधनकारक आहे, असेही आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी स्पष्ट केले.



### बक्षीहिप्परगे येथे अण्णाभाऊ साठे जयंती

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षीहिप्परगे गावात अभिरा सोशल फाउंडेशनच्या वतीने लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. पूजन गावचे माजी सरपंच बाबूराव चव्हाण आणि पंचायत समितीचे माजी सदस्य तुकाराम कोळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास माजी सरपंच बाबुराव चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य तुकाराम कोळेकर, ग्रामपंचायत सदस्य बालाजी यादव, सामाजिक कार्यकर्ते अकबर शेख, लक्ष्मण माळी, पोलीस पाटील निखिल यादव, विक्रांत हाटकर, यल्लेश्वर सलवदे, विलास मारकड, बाळू जाधव, किसन निकम, हुसेन शेख, सिद्धार्थ बनसोडे, सागर काळे, अब्बास शेख, आदित्य जाधव, जावेद शेख, अरमान शेख, रितेश हटकर, अरबाज शेख, अनिकेत जाधव, साहिल शेख, रसूल शेख, समीर शेख, कृष्णा जाधव, राम व्हनमाने, शिवा जाधव यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन संदेश हटकर यांनी केले, तर आभार तुकाराम यांनी मानले.

### हजरत पीर शाहजहूरवली कादरी (रहे.) यांचा उरूस उद्यापासून

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

सोलापुरातील हजरत पीर शाहजहूरवली कादरी (रहे.) यांचा उर्स-शरीफ सोमवार, दि. ४ ऑगस्टपासून साजरा करण्यात येणार आहे. ४ दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात विविध धार्मिक होणार आहे. सोमवार, दि. ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता बेसन-रोटीचा कार्यक्रम तसेच कुराण पठण होणार आहे. रात्री फातेहाखानीनंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. रात्री ९ वाजता महफिल-ए-समा होणार आहे. मंगळवार, दि. ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता दर्गाहमधून संदल (गंध)ची मिरवणूक निघणार आहे. रात्री १० वाजता संदलची मिरवणूक दर्गाहमध्ये येईल. त्यानंतर संदलचा कार्यक्रम, कुराण पठण, फातेहाखानीनंतर महाप्रसाद वाटप, महफिल-ए-समा होणार आहे. बुधवार दि. ६ रोजी चिरागचा (दीपप्रज्वलन)चा कार्यक्रम होणार असून गिलाफ चढाई, फातेहाखानीनंतर रात्री ९ वाजता उत्तरप्रदेशचे मौलाना सय्यद अमीर मसदी धार्मिक प्रवचन होणार आहे. गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी जियारत असून सायंकाळी ७ वाजता कुराण पठण, हिजरा वाचन, फातेहा होणार आहे. शेवटी भक्तांना महाप्रसादाचे वाटप होणार आहे. तरी सर्व भक्तांनी हजर राहून दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दर्गाहचे खादीम खलील अहमद कादरी व मोहमद मतीन अहमद कादरी यांनी केले आहे.

# 'सिटू'ने केले आझाद मैदानावर धरणे आंदोलन

## कामगार आयुक्तांना दिले निवेदन; भिवंडी-मुंबई लाँग मार्चचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

महाराष्ट्र राज्य पॉवरलूम कामगार युनियन्स (सिटू) च्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी मुंबई येथील आझाद मैदानावर एक दिवसीय लक्षवेधी धरणे आंदोलन पार पडले. माजी आमदार कॉ. नरसय्या आडम यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात राज्यातील यंत्रमाग कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन असंगठित कामगार आयुक्तांना देण्यात आले.



आगामी अर्थसंकल्पात यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळाची अधिकृत घोषणा करून त्याची अंमलबजावणी झाली नाही, तर संपूर्ण राज्यातील ५० हजार यंत्रमाग कामगार भिवंडी ते मुंबई असा लाँगमार्च करून विधानसभेचे कामकाज ठप्प करतील, असा इशारा कॉ. आडम मास्तर यांनी दिला.

पावरलूम कामगारांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळाची तातडीने स्थापना करावी, जावळे समितीच्या शिफारशीनुसार सुधारित किमान वेतनाची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी, सर्व पावरलूम कारखाने 'कंपनी कायदा'नुसार नोंदणी करण्यास भाग पाडण्यात यावे.आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

यावेळी इचलकरंजी - कॉ. भरमा कांबळे, कॉ. दत्ता माने, गोपाल पोळा, विलास गायकवाड, मनोहर यरगट्टी भिवंडी - सुनील चव्हाण, मुमताज शेख, सूर्यभान यादव, प्रमोद यादव, भोलानाथ दिनकर, सुरेश सचान, मूलचंद यादव, सदानंद भारती मालेगाव - रमेश जगताप, अकबर खान, अजर खान, तुकाराम सोनजे, सलीम खान सोलापूर - किशोर मेहता, लक्ष्मण माळी, वेंकटेश कोंगारी, साबुद्दीन शेख, बाबू कोकणे, विजय हरसुरे, दीपक निकंबे, रवी गेंट्याल उपस्थित होते.

# सोलापूरकरांसाठी एल्ग्रीस सोलारची स्वातंत्र्य दिनास खास भेट

## ग्रेट फ्रीडम सेल सुरु, ऊर्जेच्या आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय मुक्ती नाही, ती आर्थिक, ऊर्जेची आणि मनःशांतीचीही असते. हाच विचार पुढे नेत एल्ग्रीस सोलार पॉवर सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेडने सोलापूरकरांसाठी सुरु केली आहे ग्रेट फ्रीडम सेल. ही एक अशी संधी, जी वीजबिलाच्या जोखडातून सुटका देणार आहे आणि जीवनात आनंदाची ऊर्जा भरून काढणार आहे.



सोलापूर हे शहर नेहमीच कष्टकरी, दूरदृष्टी असलेल्या आणि कुटुंबकेंद्री जीवनशैली असलेल्या लोकांनी भरलेले आहे. आजचा सोलापूरकर स्मार्ट आहे तो वीजबिलावर पैसे खर्च करत नाही, तर एल्ग्रीस सोलार लावून ते पैसे वाचवतो.

**एल्ग्रीस सोलारची वैशिष्टे**

-७८ हजार पर्यतची सबसिडी (पीएम सुर्या घर योजना)
-फक्त ६% व्याजदरावर ईएमआय
-१४९९/- पासून हप्ता
-३० वर्षे वीजबचत
-संपूर्ण मार्गदर्शन आणि देखभाल सेवा
-कालावधीः ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत
-ठिकाणः एल्ग्रीस सोलार ऑफिस, सोलापूर
-संपर्कः ०२० ७१५३ ००२७
- वेबसाईट :www.elgrissolar.in

> **एल्ग्रीस सोलापूरचं सौर स्वप्न**
> सोलापूर हे माझं घर आहे. मी सोलापुरातल्या प्रत्येक घरात सौरशक्ती पोहोचवण्याचा संकल्प घेतला आहे. हे केवळ व्यवसायाचं काम नाही, ही माझी सेवाभावना आहे. ग्रेट फ्रीडम सेल हे त्या सेवेला ऊर्जा देणारं पाऊल आहे
> **- संपतकुमार धूत,**
> **एल्ग्रीस संस्थापक**

**बचतीसोबत सोलापुरकांना बक्षिसे, दुबई टूर**

पहिल्या १०० सोलर ग्राहकांसाठी १२ लाखांपर्यतची लकी ड्रॉ बक्षिस योजना सुरू केली आहे.

**प्रथम :** दुबई टूर - २ जणांसाठी, ४ दिवस
**द्वितीय :** इलेक्ट्रिक स्कूटर (Lectrix)
**तृतीय :** स्मार्ट एलईडी ३२ इंची टीव्ही
**चतुर्थ :** ५ जणांना पाच हजारापर्यंतचे गिफ्ट्स
**पाचवे :** १० जणांना २ हजा ५०० पर्यंतचे उपयुक्त गिफ्ट्स.



# ए. जी. पाटील कॉलेजमध्ये उत्पादन प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, २ ऑगस्ट-**

ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातर्फे टेकमंत्रा च्या सहकार्याने ''कंप्युटर एडेड मॅन्युफॅक्चरिंग'' या विषयावर तीन दिवसांची प्राध्यापक प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. यात राज्यभरातील अभियांत्रिकी शिक्षकांचा चांगला प्रतिसाद लाभला. यात सहभागी प्राध्यापकांना उद्योगात वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक डिजिटल उपकरणांसह व थ्रीडी प्रिंटरसाठी टूलपाथ तयार करणे, सिम्युलेशन करणे, मॉडेलिंग याचे प्रशिक्षण दिले गेले.

कार्यक्रमाचे उद्घाटन कँपस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, आणि डॉ. एस. बी. गडवाल, विभागप्रमुख यांत्रिकी अभियांत्रिकी, यांच्या उपस्थितीत पार पडले. 'उद्योगक्षेत्र सतत बदलत आहे. त्यामुळे आमच्या अध्यापन पद्धती देखील आधुनिक तंत्रज्ञानासोबत विकसित होणे आवश्यक आहे. ही कार्यशाळा आमच्या प्राध्यापकांना उद्योगानुरूप सक्षम बनवेल,' असे डॉ. पोतदार यांनी नमूद केले.

या प्रशिक्षणाचे प्रमुख प्रशिक्षक अनंत कुलकर्णी आणि श्री. कृष्णा धोकेले यांनी मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा शांती एज्युकेशन सोसायटीच्या २००८ मध्ये स्थापन झालेल्या ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर संस्थेची उच्च तांत्रिक दर्जाच्या दिशेने असलेली पावले दर्शवते. ही संस्था मान्यताप्राप्त असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांच्याशी संलग्न आहे. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. ए. आर. मळेकर, प्रा. एस. ए. देशपांडे, तसेच यांत्रिकी विभागाच्या सहकार्याने करण्यात येत आहे.

या कार्यशाळेच्या माध्यमातून नवोन्मेषी औद्योगिक प्रकल्प, उद्योगाभिमुख शिक्षण, व मल्टीडिसिप्लिनरी अध्ययनाला चालना मिळणार आहे, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. संस्थेचे चेअरमन एस.ए. पाटील व ट्रस्टीएस.एस.पाटील यांनी याप्रसंगी शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# ‘देऋब्रा’ संस्थेचा ९४वा वर्धापन दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २ ऑगस्ट-**

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचा ९४ वा वर्धापनदिन आज दि.२ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्या हस्ते श्रीसंत समर्थ रामदास स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



यावेळी कार्यवाह श्याम जोशी, उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, दत्तात्रय आराध्ये, युवक अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, संजय कुलकर्णी, महिला शाखेच्या स्मिता देशपांडे आदि उपस्थित होते. अध्यक्ष डॉ. येळेगावकर यांनी १९३१ मध्ये गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य व शैक्षणिक साहित्य देण्यासाठी समाजातील तत्कालीन मान्यवरांनी संस्थेची स्थापना केल्याची माहिती देत सध्याचे उपक्रम सांगितले. यावेळी सर्वांना पेढे वाटून आनंदोत्सव करण्यात आला.






## महत्वाचे...

### आहार का, कसा, किती, केव्हा, कुठे; व्याख्यानमाला आजपासून

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

योगसेवा मंडळातर्फे रविवार ३ ऑगस्टपासून आहार का, कसा, किती, केव्हा, कुठे ; या विषयावर सकाळी ६ ते ७ या वेळेत योगाचार्य मनमोहन भुतडा यांची व्याख्यानमाला होणार आहे. एकूण तीन व्याख्याने असून पुढील भाग रविवार १० व १७ ऑगस्ट रोजी होतील. रविवार ३ ऑगस्ट रोजी या व्याख्यानमालेचे उद्घाटन होणार आहे. या प्रसंगी सुप्रसिद्ध इवेन्ट मॅनेजर अनिश सहस्रबुद्धे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. याचा लाभ घ्यावा, असे योगसेवा मंडळाचे अध्यक्ष सुनील आळंद, उपाध्यक्ष संतोष सास्वडे, सचिव दत्तगुरू वेदपाठक यांनी केले आहे.



### मदर तेरेसा पॉलिक्लिनिकमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांची नियमित सेवा

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

महापालिकेच्या आरोग्य विभागाच्यावतीने होम मैदानासमोरील मदर तेरेसा पॉलिक्लिनिक येथे विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा आता नियमितपणे उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त आशिष लोकरे यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा नागरिकांना मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहे. यामध्ये डॉ. किरण माळी (एम. डी. मेडिसिन तज्ज्ञ),उपलब्धता - प्रत्येक आठवड्याच्या मंगळवारी वेळ : सकाळी १० ते दुपारी १, त्वचारोग तज्ज्ञडॉ. वैशाली म्हसवेकर, उपलब्धता - सोमवार ते शनिवार वेळ : (संपर्कानुसार वेळ निश्चित करावी), डॉ. अक्षय भुतडा कान, नाक व घसा तज्ज्ञ - उपलब्धता : प्रत्येक आठवड्याच्या बुधवारी वेळ : सकाळी १० ते दुपारी १ वाजता उपलब्ध राहणार आहेत. या उपक्रमाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापूर महापालिकेचे आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांनी केले आहे.


# शिंदे सेनेचे शहर समन्वयक दिलीप कोल्हेंसह ११ पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

**चार दिवसात ठरविणार पुढील दिशा**

**वरिष्ठांची दिशाभूल करून बाहेरील पदाधिकाऱ्यांचा हस्तक्षेप वाढल्याचा आरोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे सोलापूर शहर समन्वयक तथा माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्यासह अकरा जणांनी आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. पक्षाचे लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे यांच्यासह असंबंधित पदाधिकाऱ्यांचा मनमानी कारभार आणि वाढता हस्तक्षेप यामुळे पक्षाची वाताहत होत असल्याचा आरोप दिलीप कोल्हे यांनी पत्रकार परिषदेत केला.



या पत्रकार परिषदेत श्री. कोल्हे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर शहर समन्वयक पद मला देण्यात आले. मात्र समन्वयक या नात्याने पक्ष वाढीसाठी वरिष्ठांकडून कोणतीही विचारणा झाली नाही. वरिष्ठांनी बैठक घेतली पाहिजे तसे झाले नाही. शहर समन्वयक असतानाही परस्पर बाहेरील काही पदाधिकारी इतर पदे नेमतात. असंबंधित लोकांचा वाढता हस्तक्षेप आणि मनपाणीपणामुळे पक्षाची वाताहत होत आहे. या संदर्भात मुंबईत वरिष्ठांची भेट घेऊन कैफियत मांडली आहे. संबंध नसतानाही बाहेरील लोक थेट पक्षाची पदे नेमणे योग्य नाही. वरिष्ठांच्या सूचनांची पायमल्ली होत आहे. महापालिका निवडणुकांच्या संदर्भात आवश्यक ती संघटनात्मक बांधणी आणि इतर नियोजन गरजेचे आहे. त्या संदर्भात चर्चा नाही. पक्षाच्या वरिष्ठांची दिशाभूल केली जात आहे, असा आरोप कोल्हे यांनी केला आहे.

पक्षातील असंबंधित हस्तक्षेप आणि बाहेरील लोकांचा मनमानीपणा यामुळे माझ्यासह अकरा जणांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आपले राजीनामे दिले आहेत. पक्षात एक शिवसैनिक म्हणून काम करणार आहोत. येत्या चार दिवसात बैठक घेऊन पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे, असेही कोल्हे यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस राजीनामा दिलेले संबंधित पदाधिकारी उपस्थित होते.

> **या पदाधिकाऱ्यांनी दिले राजीनामे**
>
> शिवसेना शिंदे गटाचे शहर समन्वयक दिलीप कोल्हे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ चौगुले, सोशल मीडिया जिल्हाप्रमुख आशिष परदेशी, सोशल मीडिया शहर प्रमुख सागर शिंदे, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख जवाहर जाजू, युवासेना उपशहर प्रमुख मयूर झांबरे, शिवसैनिक नवनाथ भजनावळे, राहुल काटे यांच्यासह अकरा पदाधिकारी.

# विजेचा धक्का लागून कर्मचारी भाजून जखमी

**तिघांवर गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

विजेचा धक्का लागून वीज मंडळाचा कर्मचारी भाजून गंभीर जखमी झाल्याप्रकरणी कनेक्शन अधिकारी, वरिष्ठ तंत्रज्ञासह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आकाश दत्तात्रय केकडे (वय ३०, रा. नवी पेठ, शिंदे चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन वरिष्ठ तंत्रज्ञ पिराजी माने, वैजनाथ उदगिरे, कनेक्शन अधिकारी भास्कर मुदलीयार (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३ जुलै रोजी साडेसहाच्या सुमारास नवी वेस येथे वीज मंडळातील वरिष्ठ तंत्रज्ञ पिराजी माने यांनी ११ केव्ही ऊर्जानगर फिडर बंद केला आहे. त्या पोलवर तु चढून ११ केव्ही चे जम्प चेक कर व डिपो टाक असे सांगितले. तसेच कनेक्शन अधिरी भास्कर मुदलियार यांनी आकाश केकडे यांच्या घराचे लाईट बंद केला आहे व कॉर्पोरेशनचे पाणी आले आहे असे म्हणून वैजनात उदगीरे याने केकडे यांस सांगितले. पिराजी माने व मुदलियार यांनी स्वतः लाईट बंद केले आहे, तुम्ही काम करून पटकन खाली उतर असे वैजिनाथ याने सांगितल्याने आकाश केकडे हा पक्कड व हॅन्ड ग्लोज न देता बळजबरीने पोल-वर चढण्यास लावले. लाईट बंद असल्याचे समजून केकडे पोलवर चढले व पोलवरील तारांना स्पर्श केला. त्यावेळी विजेचा जोरदार धक्का लागून पोलवरून खाली पडल्याने केकडे याच्या मणक्याचे हाड तुटून, नस दाबून तसेच हाता-पायास भाजल्याने गंभीर जखमी झाले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक फौजदार भालशंकर पुढील तपास करीत आहेत.

# फायटरने मारून पाडले तरूणाचे दात

**पाच जणांविरुध्द अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

शहरातील साईबाबा चौकात तरूणास फायटरने मारहाण करून तोंडातील दात पाडून महिलांना जातीवाचक शिवीगाळ करणाऱ्या पाचजणांविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सचिन गजानन चव्हाण (वय २१, रा. पारधी कॅम्प, सेंटलमेंट कॉलनी नं. १, सोलापूर) यांच्या फियादीवरुन विकी राजू गायकवाड, शुभम मरगु गायकवाड, विठ्ठल गायकवाड, मरगू गायकवाड, रोहित गायकवाड (रा. कवळे गल्ली, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ जुलै रोजी रात्री दहाच्या सुमारास सचिन चव्हाण हा साईबाबा चौकातील छबुबाई यांच्या किराणा दुकानासमोरून गाडीवर जात होता. त्यावेळी विकि गायकवाड याने सचिनची गाडी आडवून त्याच्या गालात चापट मारून जातीवाचक शिवीगाळ केली. माझ्याकडे काय बघतो असे म्हणून हातातील फायटरने सचिनच्या तोंडावर जोरात मारून त्याच्या तोंडातील दात पाडले.

तसेच यावेळी भांडण सोडविण्यासाठी आलेली सचिनची बहिण शामल काळे, आई कमल, काकू अनुराधा, आत्या मंगल व चुलत काका रवि हे आले असता त्यांनादेखील विकि गायकवाड व इतरांनी जातीवाचक शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने मारहाण केली. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस आयुक्त यशवंत गवारी पुढील तपास करीत आहेत.

# पृथ्वीराज चव्हाण यांचे बॅनर गाढवावर ठेवत काढली धिंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ सोलापुरात गाढवाच्या पाठीवर पृथ्वीराज चव्हाण यांचे बॅनर ठेवत त्यांची छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून धिंड काढण्यात आली. काँग्रेस का हात गधो के साथ, हिंदू धर्म की... सनातन धर्म की जय अशा घोषणा देण्यात आल्या.

पृथ्वीराज चव्हाण यांनी बोलताना भगवा दहशतवाद नाहीतर सनातन दहशतवाद, हिंदू दहशतवाद म्हणा असे वक्तव्य केले होते हे वक्तव्य त्यांचे घडवा प्रमाणेच आहेत त्याचमुळे गाढवाच्या पाठीवर पृथ्वीराज चव्हाण यांचे पोस्टर ठेवून युवा सेनेच्या वतीने धिंड काढत निषेध करण्यात आला. मत मिळवण्यासाठी यापूर्वी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनीही असे वक्तव्य केले होते त्यांचा दोन टर्म




निवडणुकीत पराभव करून घरी बसवले, त्याच पद्धतीने पृथ्वीराज चव्हाण यांची देखील गत तशीच होणार आहे. खासदार प्रणिती शिंदे यांनी देखील ऑपरेशन सुंदर वरती बोलताना चुकीचे वक्तव्य केले होते त्याचाही निषेध यावेळी करण्यात आला.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख सागर शितोळे, युवासेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे, युवासेना कार्यकारणी सदस्य सुजित खुर्द.युवासेना शहरप्रमुख समर्थ मोटे, पद्मसिंह शिंदे,पांडुरंग बनसोडे, राज मिसाळ, अनिकेत राठोड, देवा विटकर आदी उपस्थित होते.

# आ. अभिजीत पाटील वाढदिनानिमित्त आरोग्य शिबिर; ७१६ रूग्णांची तपासणी

**क्रेनच्या सहाय्याने पुष्पहाराने स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.२ ऑगस्ट-**

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माढा येथे आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी करून क्रेनच्या सहाय्याने मोठा हार घालून आमदार पाटील यांचे स्वागत केले.

आरोग्य शिबीराच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांचे रोगनिदान होऊन उपचार होतात. आरोग्याची सेवा शेवटच्या माणसापर्यंत पोहचवण्याचे काम आरोग्य शिबीराच्या माध्यमातून होते. असे प्रतिपादन आ अभिजित पाटील यांनी केले. माढा मतदारसंघातील नागरिकांच्या आशीर्वादातून कधीच उतराई होणार नाही असे प्रतिपादन माढा येथील ग्रामीण रुग्णालयात आयोजित आरोग्य शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. आ.पाटील म्हणाले की; माढा या ठिकाणी डायलेसिस युनिट मंजूर झाले असून ते लवकरच कार्यान्वित होईल. माढा मतदारसंघात तीन कार्डियाक म्ब्युलन्स आता उपलब्ध होणार आहेत. या ठिकाणी आय ही यु युनिटही चालू होणार आहेत. माझी आरोग्य कमिटीवर निवड झाल्याने आता उपचाराबाबत काही अडचण येणार नाही. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून एक कोटी रुपये मतदारसंघात मदत दिली गेली आहे. कोणत्याही रुग्णांना आरोग्य सेवेबाबत काही गरज लागली तर आपण मोठ्या शहरात मोठ्या आजारावर उपचार करण्यासाठी आपली यंत्रणा कार्यरत आहे. या शिबिराचे प्रास्ताविक ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.विलास मेमाणे यांनी केले. यावेळी विलासबप्पा देशमुख, भारत शिंदे, अॅड. बाळासाहेब पाटील, राजाभाऊ चवरे, आनंदराव कानडे, शहाजी साठे, नितीन कापसे, रामकाका मस्के, वैभव कुटे, दिनेश जगदाळे, भाऊसाहेब महाडिक, शंभू साठे, आबा साठे, जितेंद्र जमदाडे, भैय्या खरात, राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यक्षा सुवर्णा शिवपुरे, विनंती कुलकर्णी, अॅड रत्नप्रभा जगदाळे, यु. एफ. जानराव, वाय. जी. भोसले उपस्थित होते.



> आ.अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त माढा ग्रामीण रुग्णालयात आयोजित आरोग्य शिबीरात ७१६ रुग्णांवर मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. यात १२ जणांवर वाचादोष शस्त्रक्रिया करण्यात आली, ३३७ नेत्रतपासणी करण्यात आली. यासाठी दीडशेहून अधिक आरोग्य कर्मचारी, सेविका व आशा वर्कर कार्यरत होते.

> माढा शहरात आ अभिजीत पाटील यांचे आगमन होताच प्रथम त्यांनी माढेश्वरी देवीचे दर्शन घेतले. छ. शिवाजी महाराज चौकात त्यांना क्रेनव्दारे पुष्पहार घालून जे.सी.बी.तून त्यांचेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. शहरात त्यांनी आण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त विविध ठिकाणी भेट देत अभिवादन केले.

# महिन्याला १० हजाराचा हप्ता द्यायचा, तरच दुकान चालवायचे

**खंडणीखोराविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

शहरातील परमीट रूम अॅड बार चालकाला दम देऊन महिन्याला १० हजार रुपयांचा हप्ता दिला तरच दुकान चालवायचे नाही तर दुकान चालवायचे नाही असे म्हणून खंडणी मागणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत विकास विजय मोटे (वय ४०, रा. गोल्डफिंच पेठ, पोस्ट ऑफीसमोर, चौपाड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन नागेश शिवाजी महानूर (रा. सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकास मोटे हे जुना हिरज नाका परिसरातील रत्न परमीट रूम अँड बार चालवितात. ३१ जुले रोजी दुपारी नागेश महानूर याने त्याच्या मोबाईल नंबरवरून घरी असलेल्या विकास यांचा भाऊ विनोद याच्या मोबाईल नंबरवर फोन केला. नागेश महानूर याने विनोद यास फोनवर तु मला १३ महिने आत बसवला, आता तुला व केदारला आत बसवतो असा दम दिला. त्यानंतर १ ऑगस्ट रोजी ९ च्या दरम्याने दोनदा रत्न परमीट रूममध्ये येऊन दारूची बाटली, पाण्याची बॉटल व सिगारेट मागवून घेतले. त्याचे १७०० रुपये बिल न देता दम देऊन विकास मोटे यांस तुला दुकान चालवायचे असेत तर मला हप्ता म्हणून दर महिन्याला १० हजार रुपये तसेच अधून मधून दारू पिण्यास द्यायची नाही तर तुझे दुकान चालू देणार नाही असा दम देऊन विकासकडून जबरदस्तीने १ हजार रुपये व काँऊटरवर ठेवलेली दारूची बाटली, ब्रिझर अशा वस्तू जबरदस्तीने घेऊन गेला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक पाटील पुढील तपास करीत आहेत.

## कार पलटी झाल्याने तरुण जखमी

**सोलापूर :** कारमधून पंढरपूर कडून शिखर शिंगणापूर कडे जाताना नातेपुते जवळ कारवरील नियंत्रण सुटल्याने कार पलटी झाली. यात दिनेश मुकुंद वावरे (वय २२, रा. बेलाटी, उत्तर सोलापूर) हा जखमी झाला आहे. त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना शुक्रवारी रात्री घडली. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## वळसंग जवळ धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर :** वळसंग येथून जात असताना एका दुचाकीस्वाराला धडक दिल्याने तो जखमी झाला आहे. मयूर प्रभुलिंग कुंभार (वय २५, रा. भवानी पेठ) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. ही घटना शुक्रवारी रात्री दहाच्या सुमारास झाली. यात तो गंभीर जखमी झाला असून त्याला १०३३ च्या ॲम्ब्युलन्सने शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# संतभेट भाग्योदयानेच होते : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२ ऑगस्ट-**

मानवी जीवनात संतांची भेट अत्यावश्यक असते. कारण जीवनातील सर्व दु:ख दूर करण्याचे सामर्थ्य फक्त संतांमध्येच असते. मात्र, अशा संतांची भेट होण्यासाठी भाग्य उजळलेले असावे लागते, असे पूजनीय श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रीभगवंत मंदिरात सुरु असलेल्या श्रावणमास प्रवचनमालेच्या आठव्या सत्रात सांगितले. यावेळी ते 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर निरुपण करत होते.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - ८

श्रीमद्भागवत कथा श्रवण करणे हे पूर्वजन्मीच्या पुण्याचे फल आहे. संपूर्ण मानवी जीवनाचे सार या भागवत कथेत सामावलेले आहे. म्हणूनच ही कथा अध्यात्मामध्ये सर्वोच्च मानली जाते. श्रीमद्भागवत कथेचे हे अद्वितीय महत्व डॉ. जयवंत महाराजांनी भाविकांसमोर प्रभावीपणे उलगडून सांगितले. या कथेमध्ये पुढे देवर्षी नारद व सनतकुमार यांची बद्रिकाश्रमात भेट होते. त्यांच्यात विचारविनिमय होतो. या संदर्भात 'नारद' या शब्दाचा अर्थ उलगडताना महाराज सांगतात की, 'नार' म्हणजे नारायणापासून प्राप्त झालेले ज्ञान, आणि 'द' म्हणजे ते ज्ञान दान करणारा. म्हणजेच ज्या व्यक्तीकडे स्वरुपज्ञान आहे व जो ते इतरांना देतत्, त्यांना नारद म्हणतात. नारदजी सनतकुमारांना विनवतात की, मी दीन आहे, कृपाकरुन माझ्यावर अनुग्रह करा. या विनंतीचे स्पष्टीकरण करताना महाराज म्हणतात, की अंतःकरणात श्रद्धा नसल्यास अनुग्रह होत नाही. म्हणजे, श्रद्धा असेल तरच अनुग्रह होतो, आणि अनुग्रह हवा असेल तर श्रद्धा हवीच. अनुग्रह व श्रद्धा यांचा परस्पर संबंध म्हणजे विवाह, आणि येथे 'विवाह' म्हणजे संस्कार. हे दोघे एकमेकांशिवाय राहू शकत नाहीत. त्यामुळे जिज्ञासूच्या ठिकाणी श्रद्धा असली पाहिजे, तेव्हाच अनुग्रह प्राप्त होतो. या विषयावर सामाजिक पातळीवर विस्तृत विवेचन करताना, विवाहसंस्काराचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले. सध्याच्या काळात विवाहात होणाऱ्या अनेक चुकीच्या प्रथा, कृती यावर त्यांनी स्पष्टपणे बोट ठेवले आणि अशा गोष्टी टाळाव्यात, असे आवाहनही भाविकांना केले. नारदांनी सनतकुमारांना केलेली प्रार्थना भक्ती, ज्ञान व वैराग्य याच्या प्राप्तीसाठी होती, हे विशेष महत्त्वाचे आहे. कारण आज समाज या तीन गोष्टींपासून दूर जात आहे. नारदांची इच्छा अशी आहे की, जीर्णावस्थेतील भक्ती, ज्ञान व वैराग्य पुन्हा तरुण व तेजस्वी स्वरूपात सर्व वर्णांमध्ये पुनर्स्थापित व्हावे. म्हणजेच, प्रत्येक व्यक्तीस याचा अधिकार प्राप्त व्हावा. या उद्देशाने नारद विचारतात की, हे कसे साध्य होईल? यावर सनतकुमार उत्तर देतात की, त्याकरिता भागवत श्रवण करावे. हरिद्वार हे अत्यंत पवित्र व शांत ठिकाण आहे. त्या वातावरणात वैर, काम, क्रोध, मत्सर, अहंकार अशी दुर्गुणे आपोआप निघून जातात. म्हणूनच, अशी कथा हरिद्वारमध्येच करावी, असे सांगण्यात येते. हरिद्वारच्या आनंद घाटावर सनतकुमार उच्चासनावर बसून भागवत सांगू लागतात. त्यावेळी सर्व देवता, ऋषी, नद्या, वेद, शास्त्रे, इतर पुराणे आणि भाविक यांचा महासंगम तिथे होतो. कथा पुढे सरकते आणि त्यात भक्ती आपल्या दोन पुत्रांना - ज्ञान व वैराग्य यांना घेऊन येते. भागवत श्रवणामुळे ते तेजस्वी होतात. या सर्वांनी साधूंच्या अंतःकरनामध्ये राहावे , असे सनतकुमार सांगतात. या सर्व निरुपणात डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी अनेक ओव्या व श्लोकांचा संदर्भ देत अभ्यासपूर्ण आणि कसोटीच्या मार्गाने विचार मांडले. ही कथा अत्यंत भावपूर्ण वातावरणात श्रीभगवंत मंदिरात सुरू आहे आणि हजारो भाविक स्तब्ध होऊन एकाग्रतेने तिचे श्रवण करत आहेत.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - |
| दि. ३ ऑगस्ट २०२५ | आदित्य पूजन |
| विक्रम संवत् २०८२ | |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. नवमी (०९.४१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अनुराधा (२६.३४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ब्रह्म (अहोरात्र) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - कौलव (०९.४१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील. मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ** : मुलांची काळजी राहील. आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल.

**मिथुन** : स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल.

**कर्क** : एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह** : हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कन्या** : मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा:

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु** : विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निमाण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर** : नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन** : मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत.

# झोन कार्यालयाच्या मक्त्याची निविदा कधी उघडणार ?

## काही मक्तेदारांवर 'मेहरनजर' साठीच निविदा दाबण्यात आल्याची चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

शहरातील सर्वच प्रभागातील छोटी-छोटी कामे करून घेण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रत्येक झोनमध्ये दरवर्षी वार्षिक मक्तेदार नेमले जातात. नव्या आर्थिक वर्षात नेमण्यात येणाऱ्या या मक्तेदारांसाठी आयुक्तांच्या सहीने शहरातील १ ते ८ झोनसाठी (विभागीय कार्यालय) जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात आले. मात्र या कार्यवाहीला तब्बल ५ महिने लोटले तरीही ही निविदा उघडण्यात आली नसल्याने नगर अभियंता कार्यालयाबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

शहरातील विविध प्रभाग हे त्या त्या झोन कार्यालयाला जोडण्यात आले आहेत. यानुसार काही झोनला प्रत्येकी चार वार्ड असलेले तीन आणि दोन असे प्रभाग यामध्ये समाविष्ट आहेत. या प्रत्येक प्रभागातील छोटी मोठी विविध बांधकामे, रस्ते, इतर कामे आणि छोटी मोठी देखभाल दुरुस्तीची कामे झोन कार्यालयात नेमलेल्या वार्षिक मक्तेदाराकडून करून घेण्यात येतात. मागील वर्षी मुदत संपलेल्या वार्षिक मक्तेदारांच्या नेमणुकीसाठी नगर अभियंता कार्यालयाकडून हालचाली झाल्या. तत्कालीन आयुक्त शितल तेली- उगले यांच्या सहीने दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी महापालिकेच्या एक ते आठ झोन कार्यालयात वार्षिक मक्तेदार नेमण्यासाठी जाहीर प्रसिद्धीकरण करण्यात आले होते. ही निविदा पद्धतीने मागविण्यात आलेल्या नोंदणीकृत नियमानुसार मक्तेदारांनी कामाच्या अंदाजीत मक्त्याच्या रकमेनुसार बयाना रक्कम, सुरक्षा रक्कम, आणि ई-निविदास संचाची १ हजाराची फी व इतर कागदपत्रांसह निविदा भरली होती. विभागीय कार्यालयांच्या वार्षिक मक्त्यासाठी प्रत्येक झोनमध्ये १० ते १२ अशा महापालिकेच्या नोंदणीकृत वीस लाख आणि त्यावरील मक्तेदारांनी निविदा भरली. यामधून महापालिकेकडे बयाना सुरक्षा रक्कम आणि निविदास संच यातून लाखो रुपये जमा झाले आहेत. सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागातील ड्रेनेज मेंटेनन्स कामासाठी वार्षिक मक्ता निश्चित करण्याबाबतची १ कोटी ५० लाखाची निविदा प्रक्रिया त्याच बरोबरीने राबविण्यात आली. या कामांचा वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. यामध्ये दहा जणांनी निविदा भरली होती. अशीच प्रक्रिया झोन कार्यालयातील वार्षिक मक्ता उघडण्यासाठी का करण्यात आली नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

**अशी आहे झोननिहाय अंदाजित निविदा रक्कम**

झोन क्रमांक १ - ८३ लाख ५० हजार
झोन क्रमांक २ - ७७ लाख
झोन क्रमांक ३ - ७७ लाख
झोन क्रमांक ४ - ६७ लाख २५ हजार
झोन क्रमांक ५ - ७३ लाख ५० हजार
झोन क्रमांक ६ - ७८ लाख
झोन क्रमांक ७ - ६८ लाख
झोन क्रमांक ८ - ९२ लाख आदी.

**विविध कामे आहेत ठप्पच**

झोन कार्यालयाकडे वार्षिक मक्तेदार नसल्याने नागरिकांच्या तक्रारींच्या माध्यमातून पुढे आलेल्या विविध अनेक कामे ही ठप्पच आहेत तर काही कामे ही झोन अधिकारी हे आपल्या मर्जीतील मक्तेदारांकडून ज्यादा रक्कम देऊन त्यांच्याकडून करून घेत असल्याचे सांगण्यात येत आहे. आर्थिक वर्षातील चार महिने लोटले. आता पुढे काय असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे.

# जिल्ह्यात १५ मृद परीक्षण केंद्रांना मान्यता

## कृषी विभागामार्फत १.५० लाखांचे अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम वर्ष २०२५-२६ अंतर्गत गाव पातळीवर ग्रामस्तरीय मृद परिक्षण प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. सोलापूर जिल्ह्यात एकूण १५ मृद परीक्षण केंद्रांची उभारणी केली जाणार असून यासाठी दहावी उत्तीर्ण युवकांना संधी देण्यात येणार आहे. प्रयोगशाळा उभारणीसाठी प्रत्येकी १ लाख ५० हजार रुपयांचे अनुदान शासनाच्या वतीने देण्यात येईल. जिल्ह्यातील युवकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजना कैफेटेरीया अंतर्गत मृद आरोग्य व सुपिकता कार्यक्रम सन २०२५-२६ साठी २ लाख २२ हजार मृद नमुने ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळेकडून तपासणी करण्याबाबत सन २०२५-२६ च्या राज्याच्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये मान्यता दिली आहे. सन २०२५-२६ चे राज्यस्तरीय वार्षिक कृती आराखड्यामध्ये राज्यासाठी एकूण ४४४ नवीन ग्राममस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा उभारणीसाठी मंजुरी मिळालेली आहे. कृषी संचालक (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषी आयुक्तालय, पुणे यांनी सोलापूर जिल्हात १५ ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. जिल्ह्यातील इच्छुकांनी कृषि उपसंचालक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडे दि ११ ऑगस्ट पर्यंत अर्ज सादर करावेत. प्रयोगशाळा उभारणीसाठी लाभार्थी हा विज्ञान व संगणक ज्ञानासहीत किमान १० वी उत्तीर्ण असावा, लाभार्थी युवक/युवती १८ ते २७ वयोगटातील असावा. स्वयंसहायता गट, शेतकरी उत्पादक संस्था, विविध कार्यकारी सहकारी संस्था हे अर्ज करू शकतात. लाभार्थ्यांनी शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र, आधार कार्ड व पॅन कार्ड अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अर्जदार /गटाची स्वतःची इमारत किंवा किमान ४ वर्षाचा भाडेकरार असलेली इमारत असणे आवश्यक आहे. सदर प्राप्त अर्जाची छाननी जिल्हास्तरीय निवड समितीद्वारे करून पात्र लाभाथ्यर्थ्यांची निवड करण्यात येईल. लक्षांक पैकी जास्त प्राप्त अर्जाची सोडत जिल्हास्तरीय समिती मार्फत करण्यात येईल.

## शेतीच्या वादातून दोघांना मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १ ऑगस्ट-**

शेतीच्या वादातून महिलेसह दोघांना मारहाण करण्यात आली. ही मारहाण गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास मंगळवेढा तालुक्यातील रेवेवाडी येथे झाली. अमोल शंकर लवटे (वय २३), विमल शंकर लवटे (वय ४२ , रा. रेवेवाडी ता. मंगळवेढा) असे मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. अमोल आणि विमल या गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास त्यांच्या राहत्या घराजवळ होते. त्यावेळी नारायण लवटे, सागर लवटे व सुमन लवटे यांनी दगड, कु-हाडीचा दांडयाने मारहाण केली. यात विमल यांच्या डोक्याला जखम झाली तर अमोल याच्या सर्वांगास मुकामार लागल्याने ते दोघे स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## 'आस्था'वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**



आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने पी.एम.श्री जिल्हा परिषद मुलींची शाळा देवगाव येथील गरजू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, संचालक देविदास चेळेकर, योगेश कुंदुर प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, मुख्याध्यापक प्रशांत लंबे सिद्धू बेऊर यांची उपस्थिती होती.

प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. शालेय शैक्षणिक साहित्यामध्ये वही, पॅड, कंपास, बॅग इत्यादी साहित्य वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन जयश्री मेलगे पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन वैशाली कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील मुख्याध्यापक प्रशांत लंबे शिक्षक वर्ग संगीता कुलकर्णी, वैशाली कोरे, शितल पाटील, प्रणाली जमादार यांनी परिश्रम घेतले. शैक्षणिक साहित्यासाठी दानशूर व्यक्ती काशिनाथ राठोड, माऊली तळीखेडे, नगरसेवक विनोद भोसले, समाजसेवक शिवम भैय्या सोनकांबळे यांचे सहकार्य लाभले.

# 'सिंहगड'च्या 'फॅन क्लिनिंग डिव्हाइस'ला पेटंट डिझाईन नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**



सिंहगड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'फॅन क्लिनिंग डिव्हाइस' या अभिनव यंत्रणेच्या डिझाइनची भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून अधिकृत नोंदणी करण्यात आली आहे. ही नोंदणी डिझाईन अधिनियम २००० आणि डिझाईन नियम २००१ अंतर्गत मंजूर झाली आहे.

ही यंत्रणा सिलिंग फॅन स्वच्छ करण्याची पारंपरिक, अडचणीची पद्धत अधिक सोपी, स्वस्त आणि सुरक्षित बनवते. यासाठी भारतीय डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाले. हा प्रकल्प शृष्टी नवले, साक्षांत धोत्रे, तेजस मेंते (मेकॅनिकल विभाग) आणि श्रावणी नवले, संजोग सोलंकर (इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभाग) या पाच विद्यार्थ्यांनी संयुक्तरित्या साकारला आहे. प्रा. अविनाश लावणीस यांच्या मार्गदर्शनाखाली साकारला आहे. कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. आर. टी. व्यवहारे, डॉ. विजय बिरादार, प्रा. प्रदीप तापकीरे, प्रा. शशिकांत हिप्परगी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

**डिझाईनचे वैशिष्ट्य आणि कार्यप्रणाली**

या डिव्हाइसमध्ये अॅडजस्टेबल लांब रॉड, विरुद्ध दिशेने फिरणारे दोन रोलर ब्रश, स्प्रे सिस्टिमसह पाण्याचा पंप, आणि स्वच्छता सुलभ करणारे डिटॅचेबल ब्रश देण्यात आले आहेत. वापरकर्त्याची उंची लक्षात घेता डिव्हाइस अॅडजस्ट करता येते. यामुळे धूळ, चिकट घाण सहज स्वच्छ होते. कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला या उपकरणाचा वापर करता येतो. हे डिव्हाइस कमी खर्चिक, टिकाऊ असून घरगुती आणि औद्योगिक वापरासाठी उपयुक्त आहे. पारंपरिक पद्धतीने फॅन साफ करताना होणाऱ्या अपघातांचा धोका आणि शारीरिक त्रास कमी करण्याचे सामर्थ्य या डिव्हाइसमध्ये आहे.

घरगुतीसह औद्योगिक क्षेत्रातील कोणतेही सिलिंग फॅन या डिव्हाईसद्वारे कमी वेळेत, कमी खर्चात आणि सर्वात महत्वाचे म्हणजे कसलीही दुखापतीची भीती न बाळगता स्वच्छ करता येतो.

**- श्रावणी नवले,**
विद्यार्थिनी

## पानमंगरूळ येथील तरुणाचा विहीरीत पडून मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी परिसरातील विहीरीत पडून तरुण मृत्यू झाला. हा प्रकार गुरुवारी दुपारी १.३० च्या सुमारास उघडकीस आला. अग्निशमन विभागाच्या मदतीने तरुणाला विहीरीतून बाहेर काढण्यात आले. यावेळी विहीरीच्या परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. हा तरुण अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ येथील आहे.

आकाश काशिनाथ केंगार (वय २४, रा. पानमंगरूळ ता. अ.कोट) असे मृत तरुणाचे नाव आहे. गुरुवारी दुपारी १.३० च्या सुमारास कुंभारी परिसरातील मुजावर वस्ती येथील मौला मुजावर यांच्या शेतातील विहीरीमधील पाण्यात आकाश हा बेशुध्द अवस्थेत मिळून आला. त्यास अग्निशमन दलाच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. वळसंग पोलीस ठाण्यातील हवालदार मोरे यांनी दुपारी २.३५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे. त्याच्या पश्चात पत्नी, वडील असा परिवार आहे.

# अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



## रिपब्लिकन पक्ष

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष पक्ष प्रमुख संजय भैया सोनवणे सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने अभिवादन करून मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राहुल शंके, शहर अध्यक्ष अमोल गोडसे, शहर चिटणीस बिभीषण लोंढे, जिल्हा युवक अध्यक्ष प्रेमनाथ सोनवणे, कार्याअध्यक्ष खंडू साबळे, संजय लांबतुरे, कोषाध्यक्ष बापु गोफणे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



## छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड

मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूर यांच्यावतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, माजी महापौर अरिफ शेख, राम गायकवाड, ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष म. शफीक रचभरे, माजी नगरसेवक हारुण शेख, युवराज पवार, अॅड. शैलेश पोटफोडे, इरफान बागवान, हारिस शेख, रियाज पैलवान, रिझवान शेख, शोएब चौधरी, हुजेर बागवान, फुरखान बागवान, ईलियास शेख उपस्थित होते.



## श्री मल्लिकार्जुन हायस्कूल

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक अण्णाराया तुप्पद होते. प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, गंगाराम घोडके, भारत राऊत या मान्यवरांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सत्यपा कोळी, भाग्यश्री स्वामी, समीक्षा सुतार, अभिनंदन कट्टीमनी, आराध्या कलबुर्गी, संजना बनसोडे, आदर्श जगदाळे, शिवम पाटील, वैष्णवी पाटील, संस्कृती ताकमोगे या विद्यार्थ्यांनी भाषणे केली. शिक्षकांमधून प्रिया पसारे, सुनीता गंगौडा यांनी मनोगत व्यक्त केले. अतिथी धरेप्पा हत्तुरे यांनी लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. प्रास्ताविक अनिलकुमारगावडे यांनी केले. दुर्गा सूर्यवंशी यांनी सूत्रसंचालन केले. अनिता हौदे यांनी आभार मानले.



## पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय

पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालयामध्ये जहालवादी नेते लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती संयुक्तपणे साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त यल्लादास गज्जम, रमा इप्पलपल्ली, वनिता कायत, काशीराज कोळी, कल्पना सल्ला उपस्थित होते. सूत्रसंचालन काशीराज कोळी यांनी केले



## मनपा मुलांची शाळा

मनपा मुलांची मराठी शाळा क्रमांक २९, भवानी पेठ येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दोन महान विभूतींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नवनाथ माळी होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कांचन गोपाळकर व कल्पना शिंदे यांनी सहकार्य केले.सूत्रसंचालन अविनाश हिंगणे यांनी केले.

# जिल्ह्यात लो.टिळकांसह लोकशाहीर अण्णाभाऊंना अभिवादन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२ ऑगस्ट-

**स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच ची उद्घोषणा करणारे लो. टिळक यांना पुण्यतिथीनिमित्त व दीड दिवस शाळेत जाऊनही साहित्यिकांना आपल्या लोकसाहित्याची भुरळ घालणाऱ्या साहित्यरत्न लेकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त जिल्ह्यातील विविध गावात विविध संघटना, संस्था, शाळा, महाविद्यालये तसेच विविध पक्षांतर्फे अभिवादन करण्यात आले.**



## दत्त व सोपल प्रशाला, बार्शी

दत्त प्राथमिक व दिलीपराव सोपल प्रशाला या शाळेत अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्त प्राथमिकच्या ज्येष्ठ शिक्षिका संगिता काळे तर प्रमुख पाहुणे म्हणून सोपल प्रशालेचे मुख्याध्यापक सचिन काळे व दत्त प्राथमिकचे मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे तर प्रमुख उपस्थिती म्हणून युवराज जगताप, सुनील लंगोटे, मंगेश मोरे, चंद्रकांत लोखंडे, राहुल ठोंगे, संतोष ठोंबरे तसेच अरुणा मठपती, ललिता चव्हाण, शितल पाटील, कसबे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांचे जीवन कार्य यावर आधारित इयत्ता ३ री ते ९ वी मधील विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. शिक्षक प्रतिनिधी कवी युवराज जगताप यांनी मनोगत व्यक्त केले. कुंभारे यांनी 'माझी मैना गावाकडं राहिली' ही छक्कड गाऊन दाखवली. सूत्रसंचालन व आभार युवराज जगताप यांनी केले.



## फॅबटेक पब्लिक स्कूल, सांगोला

स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती फॅबटेक पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सांगोला येथे उत्साहात साजरी करण्यात आली. लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य सिकंदर पाटील, सुपरवायझर वनिता बाबर, शिक्षक पंचाक्षरी स्वामी यांच्या हस्ते करून दीपप्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. तन्मय चंदनशिवे, सानवी कटप, वेदांत कवडे या विद्यार्थ्यांनी भाषण करून अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन केले. सूत्रसंचालन शिक्षिका भारती जुंदळे यांनी केले.



## शंकरराव निंबाळकर विद्यालय, बार्शी

शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक गुंड हे होते. कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे तसेच लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविक पाणढवळे यांनी केले. याप्रसंगी शिफा पठाण, नागटिळक संस्कृती, प्रतीक्षा सातपुते, नलगे चेतन, साक्षी बेदरे, साक्षी बारंगुळे, श्रावणी गरड, मयूर सातपुते, आरती चव्हाण यांनी विद्यार्थीनींनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी केला. आभार धनश्री पवार यांनी मानले. सूत्रसंचालन गोडसे व इंगोले यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. गायकवाड जे.पी.यांनी केले.



## सार्वजनिक वाचनालय, बार्शी

सार्वजनिक वाचनालय बार्शी येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती सुनिल बडवे (ज्येष्ठ वाचक) यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करुन साजरी करण्यात आली. यावेळी सहा. ग्रंथपाल सचिन यादव, बाल विभाग लिपिक गिरीजा काळे उपस्थित होते.



## पिलीव ग्रामपंचायत

साहित्यिक डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त माळशिरस तालुक्यातील पिलीव ग्रामपंचायतीच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिभेचे पूजन तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष जेष्ठ नागरिक दामोदर लोखंडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी उपसरपंच अरिफ खान पठाण, ग्रामपंचायत अधिकारी सदाशिवराव भंडलकर, माजी सरपंच अमोल मदने-पाटील, उमेश सरवदे, तानाजी लोखंडे, संतोष पडळकर, माजी सरपंच आप्पासाहेब लोखंडे, संदिपान बोडरे, अण्णासाहेब कोपनर, शिवाजी लोखंडे, संतोष सदेवाले, पोपट माळी, राजेंद्र रेळेकर, शिवाजी जावळे उपस्थित होते. ग्रामपंचायत अधिकारी सदाशिव भंडलकर यांनी आभार मानले.



## टेंभुर्णीत विविध संघटनातर्फे अभिवादन

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त टेंभुर्णी (ता.माढा) येथे शहरातील शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयामध्ये अण्णाभाऊंना अभिवादन करण्यात आले. टेंभुर्णी ग्रामपंचायत कार्यालयासमोरील अर्धपुतळ्यास सरपंच सुरजाताई बोबडे, भाजपाचे माढा तालुका अध्यक्ष योगेश बोबडे, उपसरपंच सतिश नेवसे, टेंभुर्णी आद्योगिक संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र ढेकणे, अमोल जगदाळे, राजू येवले, तळेकर यासह विविध सेंघटना, राजकीय पक्षाचे पदाधिकारी व हजारो नागरिक व महिलांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. टेंभुर्णीचे पोलिस निरीक्षक नारायण पवार, तंटामुक्त समितीचे दत्तात्रय देवकर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, मातंग आंदोलनचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ वाघमारे, राष्ट्रवादीचे माढा तालुका माजी अध्यक्ष औदुंबर भाऊ महाडिक, माढा तालुका शिवसेना उप प्रमुख सुरेश लोंढे, बहुजन संघर्ष समितीचे नागनाथ वाघमारे, माजी सरपंच अनिल जगताप, अखिल भारतीय वडार समाज संघटनेचे राजकुमार धोत्रे, सतीश जगताप, राहुल आरडे, रोहित आरडे, शेखर जगताप, बहुजन मुक्ती पार्टीचे ॲड तुकाराम राऊत, महेंद्र सोनवणे उपस्थित होते. मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाचे अध्यक्ष रोहित ढावरे, राम आरडे, राहुल कांबळे, शुभम जगताप, सनी जगताप, विशाल जगताप, योगेश दाखले, संतोष सोनवणे यांनी प्रश्रिश्रम घेतले.

## वेळापुरात आदरांजली



लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त (लहुजी चौक) वेळापूर येथे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा राष्ट्रीय उपाध्यक्ष व माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी अमृतराज माने-देशमुख, बाळासाहेब धाईंजे, मिलिंद सरतापे, गोपाळ घार्गे, शंकरराव काकुळे, मदन माने-देशमुख, काकासाहेब जाधव, पांडुरंग साठे, काशिनाथ आडत, भागवत गायकवाड, शंकर आडत, गणेश चव्हाण, विजय पवार, भैय्या कोडग, प्रा धनंजय साठे, संजय पनासे, विनायक भगत, ओंकार आडत, ओंकार खराडे, पिनु एडगे, हनुमंत सस्ते, मिलिंद गायकवाड, अनिल माने, अजय शिंदे, निखिल चव्हाण, दादासाहेब गालफाडे, शरद साठे, सतिश मेटकरी, निखिल शिंदे, चांगदेव साठे, तुकाराम साठे, अविराज अवघडे, कुमार साठे, बापु साठे, आण्णा मेटकरी, रणजीत साठे, प्रदीप साठे, निलेश नाईकनवरे, रोमन वाघमारे, सुरज वाघमारे, दत्ता मेटकरी, राहुल नाईकनवरे व मातंग समाज बांधव उपस्थित होते. आयोजन आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष महेश साठे, अजित साठे, प्रविण साठे, महादेव नाईकनवरे यांनी केले होते.



## वेळापुरात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंना अभिवादन

वेळापूर (ता. माळशिरस) येथे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त पालखी चौक, अण्णाभाऊ साठे चौक, साठे नगर, चव्हाणवाडी, शेरी या ठिकाणी अभिवादन करण्यात आले.

यावेळी माजी जि.प.सदस्य सतीशराव माने-देशमुख, धानोरे माजी सरपंच जीवन जानकर, वेळापूरचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, माजी उपसरपंच शंकरराव काकुळे, धनंजय माने देशमुख, संदीप माने देशमुख, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, ओबीसी सेल तालुका कार्याध्यक्ष साहिल आतार, विनायक माने, अमृतराव माने देशमुख, दीपक राऊत, हनुमंत वायदंडे, कैलास सुरवसे, दीपक चव्हाण, जवान माने-देशमुख, लक्ष्मण माने-देशमुख, प्रदीप सरवदे, डॉ.धनंजय म्हेत्रे, अप्पाराव कांबळे, समाधान जानकर, राहुल सराटे, गणेश साठे, बाबा तुपे, रणजीत साठे, अभिजीत साठे, स्वप्निल सरवदे, अमोल मंडलिक ग्रामस्थ तसेच समाजबांधव उपस्थित होते.

## उमा महाविद्यालय, पंढरपूर

उमा महाविद्यालयामध्ये लोकमान्य टिळक यांच्या स्मृतिदिनानिमित्त व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठचा २१ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहण प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच लोकमान्य टिळक व लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमप्रसंगी शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.विद्युलता पांढरे उपस्थित होते. प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. ए. व्ही. कुलकर्णी यांनी केले. आभार डॉ. एन.सी. सर्वगोड यांनी मानले.




## स्वेरीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांचे मार्गदर्शन झाले. शंकर कदम व प्रा.विलास शेळके यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी यशवंत माने, डिप्लोमचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ.करण पाटील, डॉ. सतीश लेंडवे, डॉ. एस.बी. भोसले, डॉ. एस. पी. पवार, डॉ. सुमंत आनंद, डॉ. बादलकुमार, प्रा. एस.ए.गरड, प्रा. बागल, प्रा. हल्लूर, प्रा. पारखे, इतर प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालकवर्ग उपस्थित होते.



## महात्मा फुले विद्यालय, टेंभूर्णी

टेंभुर्णी येथील महात्मा फुले विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी कविता, गीते व पोवाड्यांचे सादरीकरण केले. प्रशालेचे सहशिक्षक प्रतिक कुटे माहिती दिली. इयत्ता सातवी मधील दिया लोकरे, राजश्री जाधव, अंकिता तारळकर, देवराज देवकर, सानिका कदम आणि प्रणाली येवले यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष नारायण भानवसे यांचेही भाषण झाले. सूत्रसंचालन अंकिता बोराटे यांनी केले. रेखा डोके यांनी आभार मानले.

## महाळुंग येथाल शिबिरात ४५ जणांचे रक्तदान



महाळूंग (ता. माळशिरस) येथे शाहीर आण्णाभाऊ साठे तरुण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शिबिरात ४५ जणांनी रक्तदान केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या पटांगणात झालेल्या कार्यक्रमात युवा नेते शिवतेजसिंह मोहीते-पाटील यांचे हस्ते आण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे संचालक रामचंद्र सावंत-पाटील, नगरसेवक नानासाहेब मुंडफणे, रावसाहेब सावंत-पाटील, निनाद पटवर्धन, प्रकाश नवगिरे, डॉ. लाटे, मंडळाचे मार्गदर्शक पै. अशोक चव्हाण, डॉ. हरिश्चंद्र सावंत-पाटील, अमर गुंड-पाटील, विष्णूपंत रेडे-पाटील, शरद मुंडफणे, प्रा. नरेंद्र भोसले, मंडळाचे अध्यक्ष अमर चव्हाण, उपाध्यक्ष शुभम साठे आदी उपस्थित होते. मार्गदर्शक चव्हाण यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

याबरोबरच परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. रक्तसंकलन अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील ब्लड बँकेने केले. शुभम साठे, अमर चव्हाण, दत्तराज चव्हाण, पप्पू चव्हाण, दादा चव्हाण, भगवान भोसले, अक्षय चव्हाण, महावीर चव्हाण, मसू चव्हाण, मारुती चव्हाण, रघुनाथ चव्हाण, राजू चव्हाण यांनी परिश्रम घेतले.



## घारीत अण्णाभाऊ साठेंना अभिवादन

जनस्वराज्य फाऊंडेशन आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त घारी (ता. बार्शी) येथे अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. राहुल पालके, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, जनस्वराज्य फाऊंडेशनचे संचालक दशरथ उकिरडे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक योगदानावर प्रकाश टाकला. आरोही शहाणे हिने अण्णाभाऊंची माझी मैना गावाकडे राहिली.. ही छक्कड गाऊन उपस्थितांचे लक्ष वेधले. विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी उपस्थित होते.

# शिवसेनेच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांना विधानसभेत पाठवा

## चंद्रकांत खैरे यांचे प्रतिपादन; वाढदिवसानिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ ऑगस्ट-**

अस्मिता गायकवाड यांच्या कामाचा आवाका मोठा आहे त्यामुळे त्यांना विधानसभेत पाठवण्याचे आवाहन शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केले.

शिवसेनेच्या उपनेत्या गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. खैरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी संपर्क प्रमुख अनिल कोकीळ, महाराष्ट्र राज्य संघटक उद्धव कदम, उपनेते शरद कोळी उपस्थित होते. प्रास्ताविक जिल्हा प्रमुख संतोष पाटील यांनी केले. यावेळी अस्मिता गायकवाड यांनी अखेरच्या श्वासापर्यंत मातोश्रीच्या विचार सरणीशी व ठाकरे परिवाराशी प्रामाणिक राहणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी जिल्हा परिषद सोलापुरचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता तुकाराम देवकर, जनसेवक ॲड. जयंत शिंदे, १२ वी परिक्षेत पहिली आलेली ऐश्वर्या अंबलगी, समाजसेवक धोंडिबा नारायणकर, नागपूर महानगरपालिकेत स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झालेले शिवम अल्ली यांचा विशेष गौरव करण्यात आला.



यावेळी महाराष्ट्र राज्य संघटक उध्दव कदम, जिल्हाप्रमुख गणेश वानकर, दत्ता माने, मनसे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, तसेच मनोरमा मल्टीस्टेट च्या चेअरमन शोभा श्रीकांत मोरे, कविता कुलकर्णी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. आभार ॲड. सुरेश गायकवाड यांनी मानले तर सुत्रसंचालन दशरथ वडतिले व वृत्तनिवेदिका पल्लवी पवार हिने केले. यावेळी सप्तरंग निर्मित प्रा. अनिल लोंढे यांच्या बहारदार गिताचा कार्यक्रम झाला. बाळासाहेब गायकवाड, सुरेश काळंगे, परीस गायकवाड विश्वास शिंदे, विराज गायकवाड ऋषिकेश गायकवाड, योगीराज चिवडशेट्टी, नागेश शिरूर,संजय अलकुंटे, जयंत कदम, शिवाजी कोळी राहुल सावंत, उमेश कलशेट्टी, महावीर परदेशी यांनी परिश्रम घेतले.

## सुनिल काळे पुणे प्रादेशिक संघटकपदी बिनविरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ ऑगस्ट-**



विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन (१०२९) पुणे प्रादेशिक कार्यकारिणी निवडीची बैठक संघटनेचे केंद्रीय उपाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व संघटनेचे केंद्रीय सरचिटणीस रविंद्र देवकांत यांच्या प्रमुख उपस्थितीत बारामती येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये सुनिल काळे यांची पुणे प्रादेशिक संघटकपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

याप्रसंगी रविंद्र देवकांत, बाळासाहेब गायकवाड, कल्याण धुमाळ, तानाजी चटके, उत्तरेश्वर स्वामी, अजीम चौधरी, वसंत कुंभार, शरणबसप्पा सोनकांबळे, शुकुर शेख, आप्पासाहेब घायतिडक, हणमंत जाधव, बशीर तांबोळी, दत्तात्रय खुडे, राम चव्हाण, बाबासाहेब शिंदे, सूर्यकांत मिरजे, दत्तात्रय माहूरकर, भरत लोखंडे, विनायक साळुंखे, जैनुद्दीन आत्तार, सुनिल गडकरी यांच्यासह पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, बारामती, कराड येथील इतर पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## हास्यजत्रा कलाकार नम्रता संभेराव यांचा वटवृक्ष मंदीरात सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २ ऑगस्ट-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे समर्थांचे मूळस्थान असून आम्हा संभेराव कुटुंबीयांचेही मुख्य श्रद्धास्थान असल्याचे मनोगत स्वामी दर्शनानंतर हास्यजत्रा कलाकार नम्रता संभेराव यांनी व्यक्त केले. येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देवून श्री.स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी नम्रता संभेराव यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी श्रीशैल गवंडी, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, श्रीकांत मलवे, प्रसाद सोनार, व स्वामी भक्त उपस्थित होते.

# स्व.आलूरे गुरुजींची पुण्यतिथी विविध कार्यक्रमाने संपन्न

### दै. 'तरुण भारत'च्या कर्मयोगी दीपस्तंभ पुरवणीचे प्रकाशन

### स्मृतीस्थळाला हजारो विद्यार्थ्यांची आदरांजली





**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २ ऑगस्ट-**

मराठवाड्याचे प्रती साने गुरुजी म्हणून ओळखले जाणारे, ज्यांनी तुळजापुर तालुक्यात, शिक्षणगंगा गोरगरिबांच्या अंगणी आणली असे शिक्षणमहर्षी सि.ना.आलुरे गुरुजी यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त विविध धार्मिक, सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. त्यांच्या समाधीला अभिवादन करण्यासाठी शेकडो, माजी विद्यार्थी, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती. गुरुजींच्या चतुर्थ पुण्यस्मरण दिनानिमित्त सोलापूर तरुण भारत ने काढलेल्या 'कर्मयोगी दीपस्तंभ'पुरवणी चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

दि. २ ऑगस्ट रोजी जवाहर महाविद्यालयाच्या प्रांगणात शिक्षण महर्षी सि.ना. आलुरे गुरुजी यांच्या ४ थ्या व कै.नीलकंठप्पा आलूरे यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले तसेच त्यांच्या समाधीला विनम्र अभिवादन करण्यात आले .येथील नीलकंठेश्वर मठाचे मठाधिपती श्री. ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात बसवराज शास्त्री यांच्या मंत्रपठणाने विधिवत पूजा करून अभिवादन करण्यात आले. महादेवपा आलूरे, नीलकंठपा नरे गुरुजी, धीरज पाटील, ज्येष्ठ नेते सुनील चव्हाण, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.लक्ष्मीकांत पाटील, प्रा. भालचंद्र बिराजदार, संस्थेचे सचिव रामचंद्र दादा आलूरे, दिपक आलूरे ,श्याम नाना आलूरे, विक्रम आलूरे, ड.नागनाथ कानडे, कल्याणी मुळे, निलकंठ कबाडे, डॉ जितेंद्र कानडे,उपसरपंच डॉ.नागनाथ कुंभार, बाळकृष्ण घोडके सिनेट सदस्य बस्वराज मंगरुळे, आपू धमुरे, धनराज मूळे, डॉ.अशोक चिंचोले, डॉ. सिद्रामपा खजूर,पी.आय.विनोद घुगे,प्राचार्य डॉ.उमाकांत चनशेट्टी, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, उपप्रचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, शिवाजी कांबळे, बालाजी घुगे, बालाजी कुलकर्णी, विनायक अहंकारी, प्रवीण घोडके, आण्णा महाराज घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती .जवाहर विद्यालयाच्या एन.सी.सी. विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

गुरुजींना आवडणाऱ्या खरा तो एकची धर्म, या भारतात बंधुभाव नित्य वसु दे ,बलसागर भारत होवो हे गीत गाऊन विद्यार्थ्यांनी विनम्र अभिवादन केले. विज्ञान शाखेत प्रथम आलेल्या विद्यार्थ्याला प्रविण मोकाशे यांच्या कडून २ हजार एक रुपये बक्षीस देऊन, गौरवण्यात आले,जवाहर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात यश संपादन केल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री समुपदेशन केंद्राचे संचालक बसवराज निसरगुंडे यांच्याकडून एलईडी कलर टी.व्ही. पन्नास इंची विद्यालयास भेट देण्यात आले. कर्मयोगी दीपस्तंभ दै.तरुण भारत पुरवणी चे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, लक्ष्मण चौगुले यांच्याकडून विद्यार्थ्यांना पंधरा ड्रेस वाटप करण्यात आले.या कार्यक्रमास परिसरातील आजी-माजी विद्यार्थी, शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्व शाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक ,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयाचे पंढरपुरात स्वागत

### अधिवक्ता संघाने पेढे, जिलेबी वाटून केला आनंदोत्सव



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२ ऑगस्ट -**

मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे सुरू व्हावे यासाठी गेली ३५ ते ४० वर्षांहून अधिक काळापासून सुरू असलेल्या वकिलांच्या लढ्याला अखेर यश आले असून शुक्रवारी रात्री अधिसूचना जारी झाली आहे. त्यामुळे या लढ्यात मोलाचे योगदान दिलेल्या पंढरपूर अधिवक्ता संघाने शनिवारी (दि.२) येथील श्री विठ्ठल - रूक्मिणी मंदिरासमोर पेढे, जिलेबी वाटून आनंदोत्सव साजरा केला.

उच्च न्यायालयातील विविध प्रकरणांच्या कामकाजासाठी मुंबईला ये - जा करणे वकील, पक्षकार यांच्यासाठी वेळखाऊ आणि खर्चिक ठरत होते. भौगोलिकदृष्ट्याही गैरसोयीचे होत होते. त्यामुळे कोल्हापूर येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, अशी मागणी होत होती. याकरिता गेली ४० वर्षांपासून विविध मार्गांनी आंदोलने तसेच पाठपुरावा सुरू होता. पंढरपूर अधिवक्ता संघाने या लढ्यात सातत्याने पुढाकार घेतला होता. ५५ दिवस कामकाजापासून अलिप्त राहून या विषयाकडे वकिलांनी राज्याचे लक्ष वेधले होते. तसेच कांही दिवसांपूर्वी पंढरपूर ते कोल्हापूर रथ यात्रा काढली होती. कोल्हापूर खंडपीठासाठी अधिसूचना जारी झाली असून या निर्णयाचे अधिवक्ता संघाने जोरदार स्वागत केले. श्री संत नामदेव पायरी येथे अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ड.विकास भोसले यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, सदस्यांनी भाविक, वारकऱ्यांना पेढे वाटत आनंदोत्सव साजरा केला. त्यानंतर मोटारसायकल रॅलीद्वारे येथील जिल्हा सत्र न्यायालयासमोर येऊन फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. तसेच सर्व न्यायाधीश, न्यायालयीन कर्मचारी, वकील, पक्षकार अशा सर्वांना पेढे, जिलेबी वाटप करण्यात आली. यावेळी अधिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड.विकास भोसले, माजी अध्यक्ष वसंत भादुले, ॲड. अर्जून पाटील, ॲड.राजेश चौगुले, ॲड. किरण घाडगे, ॲड. धनंजय पवार, ॲड. दत्तात्रय पाटील, ॲड.शशीकांत घाडगे, ॲड. दादासाहेब देशमुख, ॲड.एम.बी. शिंदे, ॲड. संजय व्यवहारे, ॲड. शरद पवार, ॲड.गणेश चव्हाण, ॲड.एस. एच. गायकवाड, ॲड. वर्षा हिरणवाले, ॲड. धनश्री घाडगे, ॲड. विकास सरवळे, ॲड. संजय रोंगे, ॲड. संतोष नाईकनवरे आदी उपस्थित होते. दुपारी वकील कक्षात या लढ्यासाठी योगदान दिलेल्या ज्येष्ठ वकिलांचा गौरव करण्यात आला. यावेळी अनेकांची भाषणे झाली.

> कोल्हापूर उच्च न्यायालयाचे खंडपीठ सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय झाला आहे. वकील व पक्षकारांचे मुंबईतील हेलपाटे वाचतील. खर्चाची, वेळेची बचत होईल. प्रलंबित खटले तातडीने चालविले जाऊन न्याय सुलभ, जलद मिळू शकेल. नवोदित वकील मंडळींसाठी कोल्हापूर खंडपीठ ही एक फार मोठी संधी म्हणावी लागेल. आपल्या पंढरपूर तालुक्यासाठी जनतेला याचा निश्चितच फायदा होणार आहे.
>
> **- ॲड. विकास भोसले, अध्यक्ष**

> **न्याय सुलभ होणार**
>
> मुंबईसारख्या शहरात जाऊन न्याय मिळवणे वकिलांसह सामान्य पक्षकारांसाठी नेहमीच खर्चिक व कठीण ठरत होते. आता कोल्हापूर बेंचच्या माध्यमातून प्रलंबित प्रकरणांची सुनावणी स्थानिक पातळीवर होणार असून न्यायप्रक्रिया अधिक वेगवान, सुलभ आणि सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणारी ठरेल. अनेक वकिलांसाठी यासाठी संघर्ष केला असून त्याला मिळालेले हे यश म्हणजे वकिलांच्या चिकाटी, संयम आणि एकजुटीचा विजय आहे.
>
> **- ॲड. वसंत भादुले, ज्येष्ठ वकील**

# ५२ जेसीबीतून उधळला फुलांचा वर्षाव

### आ. अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जल्लोष



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२ ऑगस्ट -**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तथा माढा मतदारसंघाचे आ. अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल प्रतिष्ठानच्या वतीने ५२ जेसीबीतून फुलांची उधळण करत क्रेनद्वारे मोठा हार घालून वाढदिवस साजरा करण्यात आला. जनसंपर्क कार्यालयात जल्लोष करण्यात आला.

यावेळी ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी अभिजीत पाटील यांचे सर्वच क्षेत्रात मोठं कार्य आहे. ज्यांनी विठ्ठलाच्या मूर्तीचे संरक्षण केले त्यांचा आशीर्वाद आमदार पाटील यांच्या कुटुंबाला असल्याचे सांगितले. वाढदिवसानिमित आयोजित सत्काराला उत्तर देताना आ. पाटील म्हणाले की; मागील वाढदिवसाचे वेळी काही जणांनी आमच्यावर टीका टीपणी केली. स्वतः जेसीबी आणायचा स्वतःच फुल उधळून घ्यायची. परंतु तुम्हाला माणसं कुठून येणार? हा प्रश्न तुमच्यासमोर आहे. मात्र मी माझ्या जिवाभावाची माणसं जोडलेली आहेत. त्यांच्याच जोरावर मतदाररूपी आशीर्वाद देऊन आज विधानसभेमध्ये निवडून आलो आहे. त्यामूळे तुम्ही सर्वांनी मला निवडून दिले असताना, विधानभवनात पहिल्यांदा जात असताना, विधानसभेच्या पहिल्या पायरीवर डोकं ठेवून, मंदिराप्रमाणे प्रवेश केला. तीन अधिवेशनामध्ये पहिल्या अधिवेशनामध्ये पंचावन्न, दुसऱ्या अधिवेशनात साठ तर पावसाळी अधिवेशनात एकशे सतरा प्रश्न विचारले. मागील वाढदिवसाला चार महिन्यात आमदार होतो म्हणून सांगितलं परंतु आमदार झालेल्यांना एका वक्तव्यामुळे दीड वर्ष विधानभवनाच्या बाहेर बसावं लागलं. म्हणून वक्तव्य जबाबदारीने करावे लागते. अशी खोचक टीकाही आ. पाटील यांनी केली. प्रा.तुकाराम मस्के यांनी प्रस्ताविक केले. यावेळी विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सदस्य संभाजीराजे शिंदे, अनिल सावंत, माजी जिल्हाधिकारी गोकुळ मवारे, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, राहुल शहा, डॉ.बी.पी रोंगे, विठ्ठल कारखान्याच्या व्हाईस चेअरमन प्रेमलाताई रोंगे, बालाजी मलपे, अरूण कोळी, सतीश शिंदे, किरण घाडगे, धनंजय कोताळकर, प्रशांत शिंदे, श्रीनिवास बोरगावकर, राहुल साबळे, राजन थोरात, महादेव धोत्रे, आदित्य फत्तेपुरकर, देवानंद गुंड पाटील, सुधीर भोसले, दिगंबर सुडके, सतीश चव्हाण, प्रथमेश पाटील, अमर सुर्यवंशी, मदनसिंह पाटील, युवती अध्यक्ष चारुशीला कुलकर्णी, अनिता पवार, सावली बंगाळे आदी उपस्थित होते.

## रसायन प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २ ऑगस्ट -**

सोलापूर : अज्ञात कारणातून तरुणाने रानात औषध पिल्याने निलेश ज्ञानदेव गायकवाड (वय ३९, रा. शेळगाव, बार्शी) याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना शनिवारी घडली. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## पैशाच्या कारणावरून तरुणाला उचलून आपटले

**सोलापूर :** पैशाच्या कारणातून नवनाथ निवृत्ती काळे ( वय ४०, रा. दादापूर, ता. मोहोळ) याला एकाने उचलून आपटल्याने त्याच्या हाताला मार लागला. यामुळे त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

